# १

## महाराष्ट्र-पंचायत राजशी संबंधित कायदे - I

**घटक** रचना


१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ पंचायतराज ऐतिहासिक पार्श्वभूमी

१.३ महाराष्ट्र पंचायतराज व्यवस्थेची ऐतिहासिक पार्श्वभूमी

१.४ ग्रामपंचायत ऐतिहासिक पार्श्वभूमी

१.५ मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८

१.६ सारांश

१.७ स्वाध्याय

१.८ संदर्भग्रंथ


### १.० उद्दिष्टे

१) पंचायतराज व्यवस्थेची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासणे.

२) ग्रामपंचायत अधिनियम १९५८ पार्श्वभूमी अभ्यासणे.

३) ग्रामपंचायत ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासणे.

४) ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील ग्रामपंचायती कारभारासंबंधीच्या तरतुदींचा अभ्यास करणे.

### १.१ प्रस्तावना

भारतामध्ये प्राचीन कालखंडापासून स्थानिक स्वराज्य संस्था अस्तित्वात आहेत प्राचीन काळामध्ये गावाचा कारभार पंचायत मार्फत होत असे. वेदिक काळामध्ये गावचा कारभार ग्रामसभा पाहत असे व अश्या ग्रामसभेची निवड जनतेमार्फत केली जाते. तसेच गावच्या प्रमुखाला ग्रामिणी या नावाने संबोधले जायचे. तसेच रामायण व महाभारतामध्ये गावसभा व जनपद या शब्दांचा उल्लेख आढळतो. बुद्ध कालीन जातक कथामध्ये भारतातील शिलालेखावरील गाव हे स्वयंशासित होते असा उल्लेख आढळतो. त्याचप्रमाणे कौटिल्याच्या “अर्थशास्त्र” या ग्रंथामध्ये सुद्धा ग्राम प्रशासनाचा स्पष्ट उल्लेख आढळतो. तसेच प्राचीन कालखंडालाच पंचायत राजचे सुवर्ण युग मानले जाते. ग्रीस मधून आलेल्या

"मॅगेस्थेनिस" या प्रवाशाने आपला प्रवास वर्णनात ग्रामपंचायतीचे सविस्तर वर्णन केले आहे. मोगल कालखंडामध्ये पंचायत राज संस्थांना हळू हळू उतरती कळा लागली. याच कालखंडात शहरीकरणावर लक्ष केंद्रित करण्यात आले व गावातील प्रशासन चालविण्यासाठी कोतवाल, सरपंच व मुखिया हि पदे निर्माण करण्यात आली.

ब्रिटिश कालखंडामध्ये सत्तेचे विकेंद्रीकरण होऊन स्थानिक स्वराज्य संस्था जवळपास नष्ट झाल्या. परंतु याच कालखंडामध्ये १६८७ ला देशातील पहिली महानगरपालिका मद्रास येथे स्थापन करून या संस्थांना उजाळा देण्यात आला. १८७० ला लॉर्ड मेयो यांनी आर्थिक विकेंद्रीकरणाच्या ठराव मांडला; त्यामुडेच त्याना आर्थिक विकेंद्रीकरणाचे जनक म्हणतात. १८८२ ला लॉर्ड रिपन यांनी पंचायत राज संबधी कायदा केला. त्यामुळे त्यांना स्थानिक स्वराज संस्थेचे जनक म्हणतात.

## १.२ पंचायतराज ऐतिहासिक पार्श्वभूमी

भारताला स्वतंत्र मिळाल्यानंतर सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांना महत्वाचा घटक म्हणून ग्रामपंचायतींना मान्यता देऊन घटनेचे कलम ४० मध्ये ग्रामपंचायतीचा उल्लेख करण्यात आला व त्याच्या माध्यमातूनच महात्मा गांधी यांनी बघितलेले, ग्राम स्वराज्याचे स्वप्न पूर्ण करण्याच्या दिशेने वाटचाल सुरु केली. सहभागातून लोकांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी अमेरिकेच्या सहकार्याने २ ऑक्टोबर १९५२ ला सामुदायिक विकास योजना तयार करण्यात आली व या योजनेला अनुसरूनच २ ऑक्टोबर १९५३ला राष्ट्रीय विस्तार योजना तयार करण्यात आली. परंतु या योजनेचा लोकांचा अपेक्षित असा पाठिंबा न मिळाल्यामुळे या दोन्ही योजना अपयशी ठरल्या. नंतर या योजनेचे मूल्यमापन करण्यासाठी केंद्रसरकारच्या पुढाकाराने १९५७ ला बलवंतराय मेहता याच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करण्यात आली. या समितीने या अहवाल १९५७ ला सादर केला व यामध्ये **त्रिस्तरीय पंचायत राजची** स्थापना करण्याची शिफारस केली. याचं शिफारशींच्या आधारावर २ ऑक्टोबर १९५९ ला राजस्थान मधील **नागौर** या ठिकाणी देशातील पहिली ग्राम पंचायत पंडित नेहरू यांच्या हस्ते स्थापन करण्यात आली. त्यामुळे पंचायत राज स्वीकारणारे राजस्थान हे देशातील पहिले राज्य ठरले. आंध्रप्रदेश दुसरे तर महाराष्ट्र हे ९ वे राज्य आहे. १९९२-९३ साली झालेल्या ७३ व्या घटना दुरुस्तीमुळे पंचायत राज संस्थांना घटनात्मक दर्जा मिळून राज्यघटनेच्या कलम २४३ मध्ये तरतूद करण्यात आली व भारतीय राज्य घटनेला ११ वे परिशिष्ट जोडण्यात आले. या घटना दुरुस्तीमुळे महात्मा गांधी यांनी बघितलेले ग्रामस्वराज्याचे स्वप्न काही अंशी का होईना पूर्ण होताना दिसून येते.



२१ व्या शतकामध्ये लोकशाही विकेंद्रीकरण व लोकसहभाग वाढविण्याच्या दृष्टीने पंचायत राज व्यवस्थेला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. पंचायतराज व्यवस्थेतील ग्रामपंचायत हा सर्वात कनिष्ठ स्तर असून तो पंचायत राज व्यवस्थेचा पाया आहे. हे लक्षात घेता पंचायराज व्यवस्थेत ग्रामपंचायतींना महत्त्वाचे स्थान आहे. भारताची निर्मिती ही खेड्यांपासून झाली असून खेड्यांचा विकास म्हणजे पर्यायाने देशाचा विकास हे तत्त्वज्ञान महात्मा गांधींना अवगत होते. म्हणून महात्मा गांधींनी जनतेला खेड्यांकडे चला' असा नारा दिला.

भारतीय लोकशाही व्यवस्थेत पंचायत राज संस्थांमध्ये काळानुरूप महत्त्वपूर्ण अनुकूल परिवर्तन घडून येत आहे. ही लोकशाही व्यवस्थेची सकारात्मक विचारशैली असून या विचारशैलीतून ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेला २१ व्या शतकात वेग आला आहे. महाराष्ट्रात पंचायतराज व्यवस्थेतील तरतुदी या १९५८ च्या मुंबई ग्रामपंचायत कायदा आणि १९६१ चा महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद आणि पंचायत समिती कायदा समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

या दृष्टिकोनातून ग्रामीण विकासाकरिता हे दोन्ही कायदे अभ्यासणे महत्त्वपूर्ण ठरेल यात शंका नाही. तसेच, पंचायत राज लोकांचे होण्यासाठी १९९२ साली ७३ वे घटना दुरुस्ती विधेयक पास करण्यात आले. या विधेयकानुसार वरील दोन्हीही कायद्यामध्ये दुरुस्ती करण्यात आली आहे. ७३ व्या घटना दुरुस्तीमुळे पंचायतराज व्यवस्थमध्ये आमूलाग्र बदल झाले आहेत.

## १.३ महाराष्ट्र पंचायतराज व्यवस्थेची ऐतिहासिक पार्श्वभूमी

स्वातंत्र्योत्तर काळातील मुंबई राज्याची पुनर्रचना १७ ऑक्टो.१९५६ रोजी द्विभाषिक राज्य म्हणून केली गेली. त्यात कच्छ, सौराष्ट्र आदी गुजराती भाषिक तर मुंबई, कोकण, पश्चिम व उत्तर महाराष्ट्र तसेच हैद्राबाद संस्थानातील मराठी भाषिक मराठवाड्याचा प्रदेश व मध्य प्रदेशातील विदर्भाचा किंवा वहाडाचा भूभाग समाविष्ट करण्यात आला. तर बेळगाव, विजापूर, कानडा आणि धारवाड हा कन्नड भाषिक प्रदेश अलग करून म्हैसूर (कर्नाटक) राज्यास जोडण्यात आला. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्मितीसाठी आणि गुजरात निर्मितीसाठी आंदोलन सुरू झाली. द्वैभाषिक मुंबई राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी केंद्र शासनास संयुक्त महाराष्ट्र निर्माण करण्यामागील भूमिका पटवून दिली. परिणामी १ मे १९६० रोजी मराठी भाषिकांचे महाराष्ट्र राज्य स्थापन झाले.

श्री.बलवंतराय मेहता समितीच्या शिफारसीनुसार महाराष्ट्र राज्यात लोकशाही विकेंद्रीकरण तथा पंचायत राज्य निर्मितीकरीता त्यावेळचे महसूलमंत्री श्री. वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती २७ जून १९६० रोजी नियुक्त करण्यात आली. या समितीमध्ये ग्रामीण विकासमंत्री श्री भगवंतराव गाठे,, शिक्षणमंत्री दौलतराव देसाई,, अर्थखात्याचे सचिव श्री. मधुकरराव यार्दी,, सहकार व ग्रामीण विकास खात्याचे सचिव दिनकरराव साठे,,,,,, उपविकास आयुक्त पी.जी.साळवी आदी मंडळी या समितीमध्ये होती.एकूण २९६ शिफारसी असलेला अहवाल समितीने १५ मार्च १९६१ रोजी सादर केला. यात समितीने आपल्या मौलिक शिफारसी मांडून पंचायत राजची त्रिस्तरीय रचना प्रतिपादन केली. यामध्ये ग्रामपातळीवर ग्रामपंचायत, तालुका स्तरावर पंचायत समिती व जिल्हा स्तरावर

जिल्हा परिषद होय. वसंतराव नाईक समितीच्या शिफारसी काही किरकोळ फेरबदलासह महाराष्ट्राच्या विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी दिनांक ८ सप्टेंबर १९६१रोजी मंजूर केल्या. महाराष्ट्र राज्याच्या दुसऱ्या वर्धापनदिनी म्हणजे १ मे १९६२ पासून त्याची अंमलबजावणी सुरू केली आणि महाराष्ट्र राज्य स्थापन झाले. १५ ऑगस्ट १९६२ पर्यंत जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका पूर्ण होऊन महाराष्ट्रात पंचायत राज यंत्रणा कार्यरत झाली. मुंबई ग्रामपंचायत कायदा, १९५८ नुसार ग्रामपंचायतींची स्थापना प्रथम झालेली होतीच.

## १.४ ग्रामपंचायत ऐतिहासिक पार्श्वभूमी

वैदिक काळापासून ग्राम प्रशासनच कार्य '**ग्रामसभा'** ही गावातील कुलप्रमुखांची सभा लोकशाही पद्धतीने करीत असे. ग्रामसभेत कुलप्रमुख एकत्र येऊन गावासंबंधी निर्णय घेत असत. ग्रामप्रमुखाला 'ग्रामणी' म्हटले जात असे. ग्रामसभेत कुलप्रमुख एकत्र येऊन गावासंबंधी निर्णय घेत असत. रामायण-महाभारत, स्मृतिग्रंथ, बौद्ध जातक कथा, प्राचीन शिलालेख, कौटिल्याचे अर्थशास्त्र यात ग्रामपंचायतीचा उल्लेख आलेला आहे. मौर्य साम्राज्य काळात यादवकालीन महाराष्ट्रात ग्रामपंचायती विकसित झालेल्या होत्या आणि त्यागावातील लोकांचे जीवन सर्वार्थाने संरक्षित-नियंत्रित करीत होत्या. म्हणजेच भारतात ग्रामपंचायतींना खूप जुना इतिहास आहे हे स्पष्ट होते. प्राचीन काळापासून ग्रामपंचायत ही भारतव्यापी संस्था आपले अस्तित्व टिकवून आहे. भारतीय स्वयंपूर्ण खेडी याच धर्तीवर अवलंबून होती. मोगल साम्राज्याच्या अंतिम काळात व भारतात ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या सत्ता काळात ग्रामपंचायतींची कामे व अधिकार संकुचित झाले व त्या कमकुवत झाल्या.

इ.स. १८३२ मध्ये ग्रामपंचायती आणि ग्राम याबद्दल सर चार्ल्स मेरकॉल्फ यांनी म्हटले आहे की, "ग्रामीण समुदाय हे छोटी प्रजासत्ताकेच होती. त्यांना आवश्यक असणाऱ्या सर्व बाबी त्यांच्यात अस्तित्वात होत्या. ते कोणत्याही परकीय संबंधापासून स्वतंत्र होते.काळाच्या ओघात अनेक गोष्टी नष्ट झाल्या, पण त्यांचे अस्तित्व टिकले. एका राजघराण्याच्या मागोमाग दुसऱ्या राजघराण्याची सत्ता आली. एका क्रांतीपाठोपाठ दुसरी राज्यक्रांती आली पण ग्रामीण समुदाय आपले अस्तित्व टिकवून राहिला."

इस. १८७१ मध्ये भारतातील ब्रिटिश प्रशासक सर हेन्री मेन यांनीही म्हटले आहे की,"भारतीय खेड्यात संघटित अधिकारयुक्त संस्था होत्या. ज्या नागरी सुव्यवस्था टिकविणे, वाद मिटविणे, जनतेचे संरक्षण करणे यासाठी कार्यरत होत्या. ग्रामीण पोलीस यंत्रणा ही अस्तित्वात होती." थोडक्यात ग्रामीण समाजाच्या आर्थिक आणि राजकीय जीवनाचे नियंत्रण करणारी जगातील सर्वात प्राचीन संस्था ग्रामपंचायत (ग्रामसभा) भारतात व पर्यायाने महाराष्ट्रात अस्तित्वात होती.

**आपली प्रगती तपासा -**

प्रश्न१ - ग्रामपंचायतीच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर टिपण लिहा.

## १.५ मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८

**प्रस्तावना:**

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ हा भारताचे राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर मुंबई सरकारच्या राजपत्रात ता २३ जानेवारी १९५९ रोजी प्रथम इंग्रजीत प्रसिद्ध झाला.प्रत्येक गावासाठी किंवा गावाच्या गटासाठी एक ग्रामपंचायत स्थापन करण्याच्या आणि स्थानिक स्वयंशासनाचे आणि ग्रामीण क्षेत्रातील विकासकार्याचे घटक म्हणून काम करणे,,, त्यांना शक्य व्हावे यासाठी आवश्यक असतील अशा शक्ती व अधिकार त्यांना प्रदान करण्याच्या दृष्टीने आणि इतर अनेक बाबींसाठी महाराष्ट्र राज्यात ग्रामपंचायत स्थापना झालेली आहे.

भारताचे संविधान अनुच्छेद ४० नुसार राज्य सरकारने ग्रामपंचायतीची स्थापना करून स्वराज्याचे घटक म्हणून काम करणे त्यांना शक्य व्हावे, यासाठी आवश्यक असे अधिकार व सत्ता त्यांना द्यावी, असा राज्य सरकारांना आदेश देण्यात आला.

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ अन्वये ग्रामपंचायतीला दिलेल्या अधिकाराचा योग्य त-हेने वापर झाला व तिला मिळणारी सरकारी आर्थिक मदत व इतर करांचे उत्पन्न यांचा योग्य रीतीने विनियोग झाल्यास खेड्यांची सर्वांगीण सुधारणा होईल यात शंका नाही.

पूर्वीच्या मुंबई प्रांतात ग्रामपंचायती स्थापन करण्यासाठी सन १९२० साली प्रथम कायदा करण्यात आला. परंतु काही लहान प्रदेशातील जनतेला स्थानिक स्वराज्यात लक्ष घालावे याकरिता, अशा क्षेत्रात पाणीपुरवठा, आरोग्य, सार्वजनिक सुविधा व इतर काही उपयुक्त गोष्टींची तरतुद करण्याची त्यांना योग्य संधी देणे असा संकुचित हेतू, सन १९२० च्या ग्रामपंचायत कायद्याचा होता. मुंबई सरकारने पुढे ग्रामपंचायतीचे अधिकार वाढविण्याच्या उद्देशाने मुंबई ग्रामपंचायत कायदा १९३३ केला. या कायद्यात ग्रामपंचायतींना कर बसविण्याचा अधिकार, स्त्रियांना मतदानाचा अधिकार, किरकोळ दिवाणी व फौजदारी कायद्याचे स्वरूप होते. पुढे ग्रामपंचायतींना अधिक शक्ती व सत्ता प्राप्त व्हावी याकरिता मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ पारीत झाला. मुंबई राज्यातील ग्रामपंचायतींची रचना व त्यांचे प्रशासन यासंबंधीच्या विधीत दुरुस्ती करून मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ पारीत करण्यात आला आहे. कलम क्रमांक १ ते कलम क्रमांक १८८ पर्यंत ग्रामपंचायत स्थापनेपासून ते तिच्या रचनेसंबंधी व कार्यासंबंधीच्या तरतुदींची माहिती अधिनियम------ १९५८ दिलेली आहे.त्या सर्व **कलमांचे पुढीलप्रमाणे संक्षिप्त विवरण करता येईल,.**

**प्रारंभिक**

**कलम १:** -कलम १ अन्वये या अधिनियमास, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ असे म्हणता येईल.

**कलम २**: -कलम २ अन्वये, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ ची व्याप्ती व प्रारंभी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये किंवा तद्नुसार स्थापन केलेल्या महानगरपालिकेच्या, नगरपालिकेच्या किंवा छावणीच्या सीमेतील क्षेत्राव्यतिरिक्त संपूर्ण महाराष्ट्र राज्याला लागू आहे.

**कलम ३-** कलम ३ अन्वये, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ विषयी व्याख्यांची माहिती दिली आहे.

ग्रामसभा, पंचायतींची स्थापना व रचना.

**कलम ४ -**कलम ४ अन्वये गाव जाहीर करणे, ग्रामपंचायतींचे विभाजन/एकत्रीकरण करणे किंवा त्रिशंकू भागासाठी स्वतंत्र ग्रामपंचायतीची स्थापना करणे. त्याचप्रमाणे गावचौकशी पद्धत, पूर्वीच्या कायद्याखालील ग्रामपंचायती आदींसंदर्भात तरतुदी आहेत.

**कलम ५ -** कलम ५ अन्वये प्रत्येक गावात एक ग्रामपंचायत स्थापनेची तरतुद आहे. भारताचे संविधान अनुच्छेद ४० प्रमाणे ग्रामपंचायती स्थापन करण्याचे काम राज्य सरकारने करावयाचे आहे.

**कलम ६-** मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधून कलम ६ वगळण्यात आले आहे.

**कलम ७ -** कलम ७ अन्वये, ग्रामसभेच्या बैठकीसंदर्भात तरतुद केली आहे. ग्रामपंचायतींच्या प्रत्येक वर्षाला सहा वेळा ग्रामसभा घेण्यात येतील आणि सरपंच, उपसरपंच किंवा सदस्यांनी अशी सभा बोलवण्यास कोणतीही कसूर केल्यास व प्रथमदर्शी जबाबदार आढळून आले तर या कलमान्वये कारवाई केली जाईल अशी तरतुद केली आहे. तसेच सरपंचावर अपात्रतेची कारवाई, जादा बैठकी, बैठकीचा अध्यक्ष, ग्रामसभेची बैठक, बैठकीची नोटीस, बैठकीचा अध्यक्ष त्याचे अधिकार व कर्तव्य इत्यादीसंदर्भात तरतुदी आहेत.

**कलम ८ -** कलम ८ अन्वये पंचायतीची लेखा विवरणपत्रे, ग्रामसभेची कर्तव्ये, वर्षआरंभाची बैठक, बैठकीपुढील कामकाज, ग्रामसभेचे नोंदबुक, मागील वर्षाचा अहवाल इत्यादी संदर्भात पोटकलमे दिलेली आहेत.

**कलम ८अ** - ग्रामसभेचे अधिकार व कर्तव्ये यात समाविष्ट आहेत (प्रत्येक ग्रामसभा) तसेच सन २००३ चा बदल महाराष्ट्र अधिनियम क्र.३ कलम ३ अन्वये समाविष्ट करण्यात आले.

**कलम ९ -** या कलमान्वये पंचायतींचे विधि संस्थापन केले आहे. निगम निकाय संस्था, पंचायतीचे नाव, मुद्रा, मालमत्ता संपादन अधिकार, पंचायतीच्या mनावाने दावा याबाबत तरतुदी केल्या आहेत.

**कलम १० -** कलम १० अन्वये ग्रामपंचायतीची रचना राज्य शासनाने विहित केल्याप्रमाणे कमीत कमी ०७ व जास्तीत जास्त १७ सदस्य असलेली असेल. तसेच विभाग व सदस्य, पोट-कलमान्वये राखीव जागा, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, मागासवर्गीय, स्त्रीसदस्य राखीव जागा, मुदत, यासंदर्भात तरतुदी दिल्या आहेत.

**कलम १०-१** -या कलमान्वये राखीव जागेकरिता निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनिमय) सादर करणे विषयक तरतुदी आहेत.

**कलम १० अ** -या कलमान्वये ग्रामपंचायतीच्या निवडणुका घेणे, मतदार याद्या तयार करणे, त्याचबरोबर राज्य निवडणूक आयुक्ताचे अतिरिक्त अधिकार, इत्यादी राज्य निवडणूक आयोगविषयक तरतुदी आहेत.

**कलम ११** - कलम ११ अन्वये, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८. कलम ११ मध्ये निवडणूक व राज्य निवडणूक आयोगाचे अधिकार रिक्त झालेल्या जागा भरणे, निवडणुकीच्या तारखा, निवडणूक पद्धती व नियमांविषयी तरतुदी दिल्या आहेत.

**कलम १२.** - १२ अन्वये, मतदारांची यादी तयार ठेवील, त्यासंदर्भातील नियम याबाबत तरतुदी आहेत.

**कलम १३** - या कलमान्वये मत देण्यास व निवडून येण्यास अर्हताप्राप्त व्यक्ती, मतदाराची पात्रता, उमेदवाराची पात्रता विषयक तरतुदी आहेत. जर एखादी व्यक्ती ग्रामपंचायतीत एकापेक्षा अधिक जागांवर निवडून आली असेल, तर तिने विहित केलेल्या कालावधीत आपली सही केलेल्या व राज्य निवडणूक आयोगास उद्देशून पाठविलेल्या लेखी नोटिशीद्वारे एक जागा सोडून अन्य सर्व जागांचा राजीनामा दिलेला नसेल तर सर्व जागा रिकाम्या होतील.

**कलम १४** - १४ अन्वये कोणत्या प्रकारची व्यक्ती पंचायतीच्या सदस्य असणार नाही किंवा सदस्य म्हणून असण्यास पात्र राहणार नाही याबाबत तरतुदी केल्या आहेत. उदा: गुन्हेगार, वेडा, दोनपेक्षा अधिक मुले असणे, जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीच्या सदस्य, परराज्याचा नागरिक, करबाकीदार इत्यादी.

**कलम १४अ** - या अधिनियमाखालील विवक्षित दोषसिद्धी व भ्रष्टाचार यामधून उद्भवणारी अनर्हता असलेली कोणतीही व्यक्ती.

**कलम १४ ब** - या कलमान्वये राज्य निवडणूक आयोगाकडून निरर्ह ठरलेली कोणतीही व्यक्ती.

**कलम १५** -या कलमान्वये पंचायतीच्या सदस्याच्या कोणत्याही निवडणुकीच्या वैधतेविषयी निवडणुकीतील कोणत्याही उमेदवाराने किंवा निवडणुकीत मत देण्यास पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीने आक्षेप घेतला असेल तर निवडणुकांच्या वैधतेविषयी निर्णय देणे व न्यायाधीशाने चौकशी करणेची कार्यपद्धतीविषयी तरतुद आहे.

**कलम १५अ** - या कलमांन्वये निवडणूकविषयक बाबींमध्ये हस्तक्षेप करण्यास न्यायालयांना प्रतिबंध विषयक तरतुद आहे.

**कलम १६** - या कलमांन्वये सदस्य म्हणून चालू राहण्यास असमर्थ होणेबाबत तरतुद आहे.

**कलम १७** - वगळण्यात आले आहे. (कलम सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३६ च्या कलम ११ अन्वये)

**कलम १८** -कलम १८ अन्वये, मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राजवळ प्रचार करण्यास मनाई आहे.

**कलम १९-** १९ अन्वये, मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राजवळ गैरशिस्त वर्तन केल्याबद्दल शिक्षेस पात्रची तरतुद आहे.

**कलम २० -** २० अन्वये मतदान केंद्रात गैरवर्तन केल्याबद्दल शास्ती आहे.

**कलम २१ -**या कलमान्वये मतदानाची गुप्तता राखणेविषयक तरतुद आहे.

**कलम २२ -** या कलमान्वये निवडणुकीतील अधिकारी इत्यादींनी उमेदवारांसाठी काम न करणे किंवा मतदानाच्या बाबतीत वजन खर्च न करणेबाबत तरतुद आहे.

**कलम २३ -** कलम २३ अन्वये, निवडणुकांच्या संबंधातील अधिकृत कर्तव्यांचा भंग केल्याबद्दल शास्ती तरतुद आहे.

**कलम २४ -**या कलमान्वये जी कोणतीही व्यक्ती मतदान केंद्रातून मतपत्रिका लबाडीने घेईल किंवा घेण्याचा प्रयत्न करेल किंवा असे कोणतेही कृत्य अपराध असेल. मतदान केंद्रातून मतपत्रिका हलवणे हा अपराध असणे बाबत तरतुद आहे.

**कलम २५ -** २५ अन्वये इतर अपराध व त्याबद्दल शास्तीची तरतुद आहे.

**कलम २६ -** या कलमान्वये विवक्षित अपराधांच्या बाबतीत खटला भरणेची तरतुद आहे.

**कलम २७ -** २७ मध्ये सदस्यांची पदावली आहे. सदस्यांच्या पदाची मुदत-पोटनिवडणुकीबाबत तरतुद आहे.

**कलम २८ -**कलम २८ अन्वये, पदावधीची सुरुवात कधी व कशी असावी याबाबत तरतुद आहे.

**कलम २९ -**कलम २९ अन्वये सदस्यांचा राजीनामा आणि राजीनाम्या संबंधातील विवाद याबाबत तरतुद आहे.

**कलम३०-** कलम ३० अन्वये, सरपंचाची निवडणूक, सरपंच म्हणून पदावर राहण्यास अपात्र, सरपंचपदासाठी राखीव जागा, अनुसूचित जाती व जमातीकरिता राखीव जागा, मागासवर्गीय राखीव जागा, स्त्रियांसाठी राखीव जागा, राखीव जागांची मुदत याबाबत तरतुदी आहेत.

**कलम ३०-१अ -** या कलमान्वये सरपंचाच्या राखीव पदाकरिता निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र सादर करणे बाबत तरतुद आहे.

**कलम ३०-अ -** ग्रामपंचायतीतील उपसरपंचाची निवडणूक या संदर्भात तरतुद आहे.

**कलम ३१]-** कलम ३१ अन्वये सरपंच व उपसरपंच यांचा पदावधी (मुदत) या संदर्भात तरतुद आहे.

**कलम ३२ -** कलम ३२ वगळण्यात आले आहे.

munotes.in

**कलम ३३ -** या कलमान्वये सरपंच व उपसरपंच यांच्या निवडणुकीसाठी कार्यपद्धतीची तरतुद दिली आहे.

**कलम ३३-अ -** या कलमांन्वये सरपंचाला आतिथ्य भत्ता देणेबाबत तरतुद आहे.

**कलम३४** -कलम ३४ अन्वये, सरपंच किंवा उपसरपंच यांच्या राजीनाम्याची तरतुद दिली आहे

**कलम ३५. -** कलम ३५ अन्वये त्या त्या वेळी पंचायतीच्या कोणत्याही सभेस उपस्थित राहण्याचा व मतदानाचा हक्क असणाऱ्या सदस्यांच्या एकूण संख्येच्या एकतृतीयांशपेक्षा कमी नसतील इतके सदस्य अशी नोटीस तहसीलदारास दिल्यानंतर सरपंच व उपसरपंच यांच्याविरुद्ध अविश्वासाचा प्रस्ताव मांडण्याची तरतुद आहे.

**कलम ३६** -या कलमान्वये पंचायतीच्या बैठकीची वेळ व जागा आणि सभेतील कार्यपद्धती याबाबत तरतुद आहे.

**कलम ३७ -** कलम ३७ अन्वये, पंचायतीत झालेल्या ठरावांमध्ये फेरबदल करणे किंवा ते रद्द करणे याबाबत तरतुद आहे.

**कलम ३८ -** कलम ३८ अन्वये, पंचायतीचे कार्यकारी अधिकार, सरपंच व उपसरपंच यांची कार्ये याबाबत तरतुद आहे

**कलम ३९** - कलम ३९ अन्वये सरपंच किंवा उपसरपंच यांना पदावरून काढून टाकणे, चौकशी व बाजू मांडण्याची संधी देणे, निवडणुकीस अपात्र ठरविणे, अपील कोर्ट फी याबाबत तरतुद आहे.

**कलम ३९ अ -** या कलमान्वये चौकशीचे निदेश देण्याचा शासनाचा अधिकार आहे.

**कलम ४० -** या कलमान्वये पंचायतीतील सदस्यांना अनुपस्थितीत राहण्यास परवानगी या संदर्भात तरतुदी आहेत.

**कलम ४१** - वगळण्यात आले आहे.

**कलम ४२** - कलम ४२ अन्वये विवक्षित सदस्यांची पुन्हा निवडून येण्याची पात्रता याबाबत तरतुद आहे.

**कलम ४३ -** कलम ४३ अन्वये रिकाम्या झालेल्या जागा भरणे संदर्भात तरतुद आहे.

**कलम ४४** - जागा रिकामी असल्यामुळे पंचायतीच्या कामकाजास बाधा न येण्याबाबत तरतुद आहे.

प्रशासकीय अधिकार व कर्तव्य

**कलम ४५** - कलम ४५ अन्वये पंचायतीचे प्रशासकीय अधिकार व कर्तव्य याबाबत तरतुदी आहेत.

munotes.in

**कलम ४५अ -** वगळण्यात आले आहे.

**कलम ४६** -संस्थेची व्यवस्था किंवा कामे पार पाडण्याच्या किंवा ती चालू ठेवण्याच्या जबाबदारीचे हस्तांतरण करण्याचे परिषदांचे व समित्यांचे अधिकार या संदर्भात तरतुद आहे.

**कलम ४७**. - ४७ अन्वये राज्यसरकारने सोपविलेली इतर कामांची अंमलबजावणी हस्तांतरित करण्याचे राज्य सरकारचे अधिकार याबाबत तरतुद आहे.

**कलम ४८ -** कलम ४८ अन्वये इतर कर्तव्यांची तरतुद आहे.

**कलम ४९ -** कलम ४९ मध्ये ग्रामविकास समित्यांबाबत तरतुद आहे.

**कलम ४९ अ -** कलम ४९ अ अन्वये लाभार्थी स्तर उपसमितीबाबत तरतुदी आहेत.

**कलम ५० -** कलम ५० अन्वये दोन किंवा अधिक स्थानिक संस्थांच्या संयुक्त समित्यांबाबत तरतुदी दिल्या आहेत.

**कलम ५१ -** सरकारने निहित केलेल्या गावातील खुल्या जागा, पडीक, रिकामी जागा, गायराने, सार्वजनिक रस्ते, सडका, पूल, खंदक, बांध, कुंपणे, विहीर, नदीच्या पात्रातील जागा, तळी, ओढे, सरोवरे, नाले, कालवे,झाडे किंवा इतर कोणतीही मालमत्ता राज्य सरकारला ज्या शर्ती व निबंध घालणे योग्य वाटेल त्या शर्तीच्या व निबंधाच्या अधी पंचायतीकडे निहित करता येतील.

**कलम ५२ -** कलम ५२ अन्वये इमारती बांधण्यावर नियंत्रणाची तरतुद आहे. अशी परवानगी अटीसह किंवा अटीशिवाय देता येईल किंवा नाकारता येईल.

**कलम ५३ -** कलम ५३ अन्वये सार्वजनिक रस्ते व खुल्या जागा यावर अडथळे व अतिक्रमणे यासंदर्भात तरतुदी आहेत.

**कलम ५४ -** पंचायतीला वेळोवेळी लेखी नोटिशीद्वारे कोणत्याही जागेच्या किंवा भागाच्या मालकाला अशा नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल. या संदर्भात तरतुद आहे. जागांना क्रमांक देण्याची तरतुद आहे.

अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभा व पंचायत यासाठी विशेष तरतुदी

**कलम ५४ अ -** कलम ५४ अ अन्वये, अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभेचे अधिकार व कर्तव्य याबाबत तरतुदी आहेत.

**कलम ५४ ब -** कलम ५४ ब अन्वये, अनुसूचित क्षेत्रातील पंचायतीचे अधिकार व कर्तव्ये या संदर्भात तरतुद आहे.

**कलम ५४ क -** कलम ५४ क अन्वये, ग्रामसभेच्या सभेसंदर्भात तरतुदी दिल्या आहेत.

**कलम ५४ ड** -ग्रामपंचायतीतील ग्रामसभेत सरपंच व उपसरपंच बाबत अविश्वासाचा ठराव मांडण्याची तरतुद आहे.

**पंचायत मालमत्ता व निधी**

**कलम ५५** -कलम ५५ अन्वये, पंचायतआपल्याकडील निहित मालमत्ता परवाने देण्याची, तिची विक्री करण्याची किंवा ती हस्तांतरित करण्याचीपंचायतीची तरतुद दिलेली आहे.

**कलम ५६** कलम ५६ अन्वये पंचायतीच्या मालमत्ते संदर्भात तरतुदी दिल्या आहेत.

**कलम ५७** ग्रामपंचायतीमधील प्रत्येक गावाचा निधी ग्रामपंचायतीबाबत तरतुददिली आहे.

**कलम ५७** अ =अन्वये, ग्रामपंचायतीला आपली कामे पार पाडण्याकरिताकर्ज घेण्याचे अधिकाराबाबत तरतुद आहे.

कलम ५८ कलम ५८ अन्वये ग्रामनिधी व मालमत्तेचा विनियोग या संदर्भात तरतुदी दिल्या आहेत.

कलम ५९ कलम ५९ अन्वये, पंचायतीने केलेल्या किंवा पंचायती विरुद्ध केलेल्या मालमत्तेवरील दाव्यांचा निर्णय याबाबत तरतुदी आहेत. आस्थापना, अर्थसंकल्प व लेखे.

कलम ६० कलम ६०अन्वये पंचायतीच्या सचिवाबाबत तरतुदी आहेत.

कलम ६० अ. कलम ६० अ अन्वये सचिवाची विवक्षित कर्तव्य याबाबत तरतुद आहेत.

कलम ६१- कलम ६१ अन्वये ग्रामपंचायतीला आपली कर्तव्य योग्यरीत्या पार पाडता यावी यासाठी आवश्यक अशा सेवकांची नेमणूक करणेविषयी तरतुदी दिल्या आहेत.

कलम ६२ - कलम ६२ अन्वये, ग्रामपंचायतीचे अर्थसंकल्प व लेखे, अंदाजपत्रक,हिशेब याबाबत तरतुद केली आहे.

कलम ६२ अ - कलम ६२ अ मध्ये सुधारित किंवा पूरक अर्थसंकल्पाबाबत तरतुद दिली आहे. न्याय पंचायतीची रचना व त्यांचे अधिकार कलम ६३ ते ८९ महाराष्ट्र अधिनियम क्र १३ सन १९७५ चे कलम १७ ने वगळण्यात आली आहेत. तसेच दावे व खटले यांमध्ये न्यायपंचायतींची कार्यपद्धती

कलम ९० ते ११२ आणि अंमलबजावणी कलम ११३ ते १२३ ही प्रकरणे महाराष्ट्र अधिनियम कलम १३ सन १९७५ चे कलम १७ ने वगळण्यात आली आहेत. कर आकारणी व दाव्यांच्या रकमांची वसुली.

**कलम १२४ -** कलम १२४ अन्वये पंचायतीने कर व फी आकारणे याबाबत राज्यशासनाकडून किमान व कमाल दर निश्चित केले आहेत. याबाबत तरतुद आहे. यामध्ये इमारत व जमिनीवरील कर, जकात, यात्रा कर, करमणूक कर, सायकल, बैलगाडी, घोडागाडी कर, धंदा व नोकरी कर, सामान्य आरोग्य रक्षण कर, पाणीपट्टी कर, इत्यादीबाबत तरतुदी दिल्या आहेत.

**कलम १२५** -पंचायर्तीनी बसविलेल्या करांऐवजी कारखान्यांनी ठोक रकमेच्या स्वरूपात अंशदान देणे संदर्भात जसे, कारखान्याकडून ठोक रक्कम ग्रामपंचायत ठरावास मान्यता देणे, कारखान्याकडील वसुलीबाबत तरतुदी आहेत.

**कलम १२६ -** कलम १२६ अन्वये, बाजारांवरील फी वगैरेचा मक्ता देणे ग्रामपंचायतमधील बाजार, आठवडे बाजार जाहीर लिलावाने किंवा खाजगी लिलावाने कराराने मक्ता देणे संबंधात तरतुद.

कलम १२७ - कलम १२७ अन्वये, ग्रामपंचायत जमीन महसुलाच्या प्रत्येक रुपयावर उपकर बसवणे य तो वसूल करणे याबाबत तरतुदी आहेत.

कलम १२८ - कलम १२८ अन्वये ग्रामपंचायतीच्या करात वाढ करण्याचे पंचायत समितीचे अधिकार याबाबत तरतुद आहे.

कलम १२९ - कलम १२९ अन्वये, कर व अन्य येणे रकमांची वसुलीबाबत कर वसुलीची पद्धत, कर किंवा फीचे बिल, मागणीचा लेख, जंगम जप्ती वॉरंट, आजारी (sick) कारखाने आदीबाबत तरतुदी आहेत.

कलम १३०- कलम १३० अन्वये वसूल न होण्याजोग्या रकमा निर्लेखित करण्याविषयी निर्देश देण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे अधिकार, थकबाकी बुडीत लिहिण्याचा हुकूम आदीबाबत तरतुद आहे. पंचायतींना वित्तीय साहाय्य.

कलम १३१- कलम १३१ अन्वये, १ एप्रिल १९६४ पासून सरू होणाऱ्या प्रत्येक पाच वर्षांच्या मुदतीत मिळालेल्या जमीन महसूल रकमांच्या सरासरी इतकी रक्कम अनुदान म्हणून देणेबाबत तरतुद आहे.

कलम १३२ - कलम १३२ अन्वये, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ नियमात अधीन राहून या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी जिल्ह्यातील पंचायतीस कर्ज देण्याबाबत तरतुद आहे.

कलम १३२-अ - कलम १३२ अ अन्वये जिल्हा परिषदेला निरनिराळी ८ त-हेची अनुदाने सरकारने देण्याची तरतुद केली आहे. ग्रामपंचायतीला लोकसंख्येइतकीज्ञनिदान जमून महसुलाची रक्कम मिळाली पाहिजे या संदर्भात तरतुद यात केली आहे.

कलम १३२ -ब- अन्वये ग्रामपाणीपुरवठा निधी याबाबत, प्रत्येक गावाचा ग्राम पाणीपुरवठा निधी या नावाचा स्वतंत्र पाणीपुरवठा निधी पण असेल याबाबत तरतुद आहे.

कलम १३३ -अन्वये ग्रामविकास निधी संदर्भात पंचायतींनी दिलेल्या अंशदानातून प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा ग्रामविकास निधी या नावाचा निधी स्थापन केला जाईल याबाबत तरतुदी आहेत.

**नियंत्रण**

कलम १३४- हे कलम वगळण्यात आले आहे (जिल्हा ग्रामपंचायत मंडळाची स्थापना)

कलम १३४ अ-(मुंबई पुनर्रचना अधिनियम, १९६० याच्या परिणामभूत विशेष तरतुदी)हे कलम वगळण्यात आले आहे.

**कलम १३५-** कलम १३५ अन्वये, जिल्हा परिषदांची व पंचायत समित्यांची कर्तव्ये या संदर्भात तरतुदी आहेत.

**कलम १३६ -** कलम १३६अन्वये, जिल्हा ग्रामपंचायत अधिकाऱ्यांची नेमणूक याबाबत तरतुदी आहेत.

**कलम १३७** - कलम १३७ अन्वये पंचायतीने कोणतेही कामकाज वगैरे मागविण्याचे अधिकारांबाबत तरतुदी यात दिल्या आहेत.

कलम १३८ - कलम १३८अन्वये जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आपल्या कोणत्याही पीठासीन प्राधिकाऱ्यांस किंवा कोणत्याही अधिकाऱ्यास कर्तव्य सोपविणे वगैरे बाबत तरतुदी आहेत.

कलम १३९ -कलम १३९अन्वये कोणत्याही ग्रामपंचायतीच्या भोगवाटपात असलेल्या कोणत्याही स्थावर मालमत्तेत किंवा तिच्या निदेशानुसार जिल्हा परिषद व पंचायत समिकलमतीस तपासणीबाबत अधिकार तरतुद आहे.

कलम १३९-अ-ग्रामपंचायतीने हाती घेतलेल्या कोणत्याही कामांचा किंवा विकास योजनांचा कार्यक्षमरीत्या व काटकसरीने अंमलबजावणी करण्यासाठी किंवा त्यांची व्यवस्था ठेवणयासाठी तपासणी करण्याचे आणि तांत्रिक मार्गदर्शन वैगेर करण्याचे प्राधिकृत अधिकाऱ्याचे किंवा व्यक्तीचे अधिकाराबाबत तरतुदी आहेत.

कलम १३९ ब -कलम १३९ बअन्वये ग्रामपंचायतीच्या कार्यालयांची तपासणी करण्याचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे किंवा कोणत्याही अधिकाऱ्याचे अधिकारांबाबत तरतुद आहे.

कलम १४०-कलम १४०अन्वये पंचायतींच्या लेख्यांची तपासणी जसे हिशेब तपासणी, महत्त्व, पंचायतीचा खुलासा, दंडादाखल वसुली आदि बाबींच्या तरतुदी दिल्या आहेत.

कलम १४१-कलम १४१अन्वये आस्थापना कमी करणे जसे, सेवकांवरील खर्च कमी करणेबाबत तरतुद दिली आहे.

कलम १४२- कलम १४२अन्वये जर पंचायतीच्या मते कोणताही आदेश किंवा ठराव अमलात आणल्याने त्यामुळे लोकांना हानी पोहोचणे, त्रास होणे किंवा संभव असणे, शांततेचा भंग होण्याचा संभव असेल, तर आदेशाची अंमलबजावणी तहकूब करणेची तरतुद आहे.

कलम १४३ -कलम १४३अन्वये, निकडीच्या परिस्थितीत काम पार पाडण्याची तरतुद केली आहे.

कलम १४४ - कलम १४४अन्वये कर्तव्य पार पाडण्यास कसूर याबाबत तरतुद दिली आहे.

कलम १४४ अ - कलम १४४ अ अन्वये ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याच्या योजना हाती घेण्यात किंवा त्यांची देखभाल करण्यात पंचायतीने कसूर केल्यास कारवाई करण्याचा अधिकार तरतुदीत आहे.

munotes.in

कलम १४५- कलम १४५ अन्वये जर पंचायत तिच्या अधिकारांचा अतिक्रम किंवा दुरुपयोग करत आहे किंवा इतर कोणत्याही कायद्यान्वये किंवा तद्नुसार तिच्यावर लादलेली कर्तव्ये किंवा तिच्याकडे सोपविलेली कामे पार पाडण्यास अक्षम आहे, तर पंचायतीचे विघटन (विसर्जन) करणे संबंधी या कलमात तरतुद आहे.

**कलम १४६** - कलम १४६ अन्वये, गावाच्या सीमेत फेरफार केल्यावर पंचायतीचे विघटन व तिची पुनर्रचना करणे संदर्भात तरतुद या कलमात दिली आहे.

**कलम १४७** - कलम १४७ अन्वये विघटित करून पुनर्रचना किंवा स्थापना केलेल्या पंचायतीची मालमत्ता वगैरे निहित असणेबाबत तरतुद केली आहे.

**कलम १४८ -** कलम १४८ अन्वये, एखाद्या गावाचा भाग म्हणून, असलेले कोणतेही स्थानिक क्षेत्र अशा गावातून वगळण्यात आले असेल आणि क्षेत्र गावात समाविष्ट करण्यात आले नसेल तर क्षेत्र गावातून वगळल्याचा परिणामाबाबत तरतुद आहे.

**कलम १४९** - कलम १४९ अन्वये, एखादे क्षेत्र गाव म्हणून असल्याने बंद झाल्याचापरिणामाबाबत तरतुद आहे.

कलम १५० - वगळले आहे.

**कलम १५१ -** कलम १५१ अन्वये, वैधरीत्या रचना करण्यात न आलेल्या पंचायतीचेज्ञअधिकारअधिकार व कर्तव्ये सरकारने नियुक्त केलेल्या व्यक्तीने पार पाडणेबाबत तरतुद कलम १५१ मध्ये आहे.

कलम १५२ - या कलमान्वये पंचायतीला आपली कर्तव्ये व कामे पार पाडताना तिला जिल्हा परिषदेकडून किंवा पंचायत समितीकडून किंवा दोहोंकडून वेळोवेळी देण्यात येतील, अशा कोणत्याही सूचनांचे पालन करणे संदर्भात तरतुद केली आहे.

कलम १५३-कलम १५३ अन्वये पंचायतीच्या कारभाराची चौकशी करणे संदर्भात राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांनी करावयाची चौकशीची तरतुद आहे.

कलम १५३ अ - पंचायतींना सूचना आणि निर्देश देण्याचे राज्य सरकारचे अधिकार आहेत.

कलम १५३ ब - अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभा किंवा पंचायत यांना सूचना व निर्देश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार आहे.

कलम १५४ - कलम १५४ अन्वये, सामान्य व महसुलाच्या कारभारात राज्य सरकार,आयुक्त आणि जिल्हाधिकारी प्राधिकाराबाबत तरतुद आहे.

कलम १५५ -कलम अन्वये राज्य सरकारला कोणत्याही आदेशाच्या वैधतेविषयी किंवा औचित्याविषयी स्वतःची खात्री करून घेण्यासाठी जिल्हा परिषद,पंचायत समिती, स्थायी समिती यांच्या किंवा कोणत्याही अधिकाऱ्याच्या कामकाजाचे कागदपत्र मागवता येतील व त्याची तपासणी करता येईल अशी तरतुद आहे.

**नगरपालिकेचे पंचायतीत रुपांतर करण्यासंबंधी व पंचायतीचे एकत्रीकरण व विभागणी करण्यासंबंधी उपबंध**

कलम १५६ - कलम १५६ अन्वये या संदर्भात निर्वचन दिले आहे.

**कलम १५७-** नगरपालिकेचे पंचायतीत रूपांतर झाल्याच्या परिणामासंबंधी तरतुदीदिल्या आहेत.

**कलम १५८** - कलम १५८ अन्वये अंतरिम पंचायतीच्या सदस्यांचा पदावधी व त्यांचे अधिकार याबाबत तरतुद केली आहे.

कलम १५९ - कलम १५९ अन्वये "एकत्रीकृत गाव" गावाच्या एकत्रीकरणाच्यापरिणामाबाबत तरतुद केली आहे.

कलम १६० - कलम १६० अन्वये, गावाच्या विभागणीच्या परिणामाबाबत तरतुद केली आहे.

कलम १६१ - कलम १६१ अन्वये, गुरांच्या अपप्रवेशाबाबत अधिनियम लागू असण्याचे

बाबत तरतुदी आहेत.

कलम १६२ - कलम १६२ अन्वये, पंचायतीस कोंडवाडे स्थापन करण्याचे व कोंडवाड्यांवर रक्षक नेमण्याचे अधिकार आहेत.

कलम १६३ - रस्त्यावर गुरे भटकू देण्याबद्दल किंवा खाजगी किंवा सार्वजनिक मालमत्तेवर त्यांना व अपप्रवेश करू देण्याबाबत शास्ती.

**कलम १६४** - पंचायतीस गुरे कोंडवाड्यात घालणेसंबंधी अधिकार आहे.

**कलम १६५** - कलम १६४ अनुसार कोंडवाड्यात घातलेली गुरे, गुरांचा मालक किंवा अभिकर्ता हजर होऊन गुरांची मागणी करील तर कलम १६७ अन्वयेm गुरांची फी व खर्च दिल्यावर गुरे मालकास स्वाधीन करणेची तरतुद आहे.

**कलम १६६** - कलम १६६ अन्वये कोणत्याही गुरास कोंडवाड्यात घातल्यानंतर दहा दिवसांच्या आत कोणत्याही व्यक्तीने अशा गुरांचा मालक म्हणून हजर होऊन कलम १६७ अन्वये आकारण्यात येणारी कोंडवाड्याची फी व खर्च देण्याची तयारी दर्शविली नाही तर विहित केल्याप्रमाणे गुरांचा लिलाव करून ते ताबडतोब विकण्यात येतील.

**कलम १३७** - आकारण्यात येणारी कोंडवाड्याची फी व खर्च ठरविण्याची तरतुद आहे.

**कलम १३८** - अवैधरीत्या ताब्यात घेतल्याबद्दल किंवा अटकावून ठेवल्याबद्दल तक्रारी संदर्भात तरतुद केली आहे.

कलम १६८ अ - कोंडवाड्यात घातलेल्या गुरांच्या बाबतीत तारणाची तरतुद.

कलम १६८ ब - विनिर्दिष्ट केलेल्या ठिकाणी गुरे हलवणे.

### नियम व उपविधी

१७६ नियम व १७७ उपविधी या संदर्भातील नियम व उपविधीबाबत शासकीय राजपत्रात सूचित केल्याप्रमाणे असतील.

### संकीर्ण

कलम १७८ - पंचायतीच्या कोणत्याही मालमत्तेची, पैशाची इतर मालमत्तेची हानी उपव्यय, दुरुपयोग झाला असेल किंवा त्याबाबत तरतुद केली आहे.

कलम १७९ - पंचायतीतील सरपंच, उपसरपंच, सदस्य, अधिकारी, कर्मचारी किंवा सचिव या नात्याने कोणत्याही कारणाने तिने पद सोडल्यावर किंवा आपले पद धारण करणे बंद केल्यावर अभिलेख परत मिळण्याचे आणि पैसे वसूल करण्याचे जिल्हाधिकाऱ्याचे अधिकाराबाबत तरतुद आहे.

कलम १८० - कलम १८० अन्वये पंचायत इत्यादी विरुद्ध कारवाईस विरोध (दावा) दाखल करण्यापूर्वी पूर्व नोटीस देणेबाबत तरतुद आहे.

कलम १८१ - कलम १८१अन्वये जिल्हा परिषद, स्थायी समिती किंवा पंचायत समिती इत्यादी विरुद्ध कारवाईस विरोध (दावा) दाखल करण्यापूर्वी पूर्वनोटीस देणेबाबत तरतुद केली आहे.

कलम १८२ - या अधिनियमान्वये राज्य सरकार, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे राज्य सरकारला ज्या अधिकारांचा वापर करता येईल त्यापैकी कोणत्याही अधिकारांचा वापर करण्यास आयुक्ताला किंवा इतर कोणत्याही अधिकाऱ्याला प्राधिकृत करू शकेल.

कलम १८३ - या अधिनियमान्वये दंडाधिकाऱ्यास पंचायतीकडून स्थानिक चौकशी व अहवाल मागविण्याची तरतुद आहे.

कलम १८४ - या अधिनियमान्वये पंचायतीचे सदस्य हे लोकसेवक असतील अशी तरतुद आहे.

कलम १८४ अ -पंचायत समितीने तिच्या क्षेत्राच्या कक्षेतील पंचायतींच्या बाबतीत कर्तव्ये पार पाडण्याबाबत तरतुद आहे. या अधिनियमान्वये पोलीस अधिकाऱ्यांबाबत अधिकार दिले आहेत.

कलम १८५ - या अधिनियमान्वये मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९३३, सौरा ष्ट्रग्रामपंचायत अध्यादेश १९४९, हैद्राबाद ग्रामपंचायत अधिनियम १९५६ मध्यप्रांत व वहाड पंचायत अधिनियम १९४६ हे या द्वारे निरसित करण्यात येत आहेत.

कलम १८६ - या अधिनियमान्वये व्यावृत्तीची तरतुद आहे.

कलम १८७ - या अधिनियमान्वये राज्य सरकार ग्रामपंचायतीमध्ये काही अडचणी आल्यास त्या दूर करण्याची तरतुद आहे.

कलम १८८ - या अधिनियमात विवक्षित अधिनियमांची दुरुस्ती करणेची तरतूद आहे.

munotes.in

## १.६ सारांश

महाराष्ट्र राज्यात पंचायत राज मध्ये मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ नुसार ग्रामपंचायतीची रचना करण्यात आली आहे. या कायद्यात १८८ कलमांचा आणि नऊ प्रकारांचा समावेश करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्यात वेळोवळी पंचायत राजमध्ये विशेष समित्या नेमून दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत. दुरुस्त्या स्वीकारून सातत्याने पंचायत राजच्या कामकाजात सातत्याने बदल व सुधारणा करण्यात आल्या आहेत. विशेषतः ७३ व्या घटना दुरुस्ती विधेयकानंतर ग्रामपंचायतीच्या कारभारात आमूलाग्र अशा स्वरूपाचा बदल झाला आहे.

## १.७ स्वाध्याय

१) मुंबई ग्रामपंचायत अधिनियमातील ग्रामसभा पंचायतीची स्थापना व रचनेसंबंधी सविस्तर लिहा.

२) मुंबई ग्रामपंचायत अधिनियमातील प्रशासकीय अधिकार व कर्तव्ये या संदर्भातील कलमांचा आढावा घ्या.

३) **टिपा लिहा**

१) पंचायत-तिची मालमत्ता विधी

२) आस्थापना लेखे अर्थसंकल्प

३) कर आकारणी व दाव्याच्या रकमांची वसुली

४) कोंडवाडे

## १.८ संदर्भग्रंथ

**१) प्रा. बंग के. आर. - भारतातील स्थानिक स्वशासन, विशेष संदर्भ - महाराष्ट्र राज्य, श्रीमंगेश प्रकाशन - नागपूर -२००५**

**२) पाटील बी.बी. - भारतीय शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर-२००६**

**३) पाटील वा. भा.- पंचायत राज**

**४) पाटील व्ही.बी.- महाराष्ट्रातील पंचायत राज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था - के. सागर पब्लिकेशन्स, पुणे - २००६**

**५) पवार जे. ई. यादव चंद्रशेखर -- पंचायत राज संस्थांचे प्रशासकीय व आर्थिक व्यवस्थापन, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे - ०७**

६) कुलकर्णी अ.ना. - भारतातील स्थानिक स्वशासन, विद्या प्रकाशन नागपूर – फेब्रुवारी २०००

७) कानेटकर मेधा - भारतीय नियोजनाची पन्नास वर्षे , श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर २००७

८) चौधरी दत्तात्रेय हरी चौधरी अशोक दत्तात्रेय, चौधरी राजेश अशोक, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८, चौधरी लॉ. पब्लिकेशन्स जळगाव- २०११

९) महाराष्ट्र शासन विधि व न्याय विभाग - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१, शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद-२००७

१०) डॉ. जैन अशोक व्ही, डॉ. पवार दत्तात्रेय व्ही. - ग्रामीण शासन आणि राजकारण, प्राध्यापक कीर्ती महाविद्यालय, दादर

❖❖❖❖

munotes.in

# २

## महाराष्ट्र- पंचायत राजशी संबंधित कायदे -II

**घटक रचना**

२.० उदिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम १९६१

२.३. ७३वी घटना दुरुस्ती

२.४ सारांश

२.५ स्वाध्याय

२.६ संदर्भग्रंथ

## २.० उदिष्टे

१) महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम - १९६१मधील जिल्हा परिषदांच्या कारभारासंबंधीच्या तरतुदींचा अभ्यास करणे,

२) या कायद्यामधील महत्वाची कलमे समजावून घेणे.

३) या अधिनियमातील कलम १ ते कलम २९० मधील प्रमुख तरतुदींचा अभ्यास करणे.

४) ७३वी घटना दुरुस्ती समजून घेणे.

५) ७३व्या घटनादुरुस्ती विधेयकाच्या नहत्त्वाच्या तरतुदींचा अभ्यास.

## २.१ प्रस्तावना

स्वातंत्र्योत्तर कालखंडात ग्रामीण प्रशासनातील समस्या लक्षात घेऊन सरकारने जेष्ठ विधेयक श्री. बळवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. या समितीने प्रमुख शिफारसींमध्ये लोकशाही विकेंद्रीकरणाची आवश्यकता व ग्रामीण भागात प्रशासनाची स्वतंत्र अशा त्रिस्तरीय रचनेचे प्रतिपादन केले. सरकारने बळवंतराय मेहता समितीच्या शिफारसींचा स्वीकार केला.

महाराष्ट्र संदर्भात शासनाने वसंतराव नाईक समितीच्या शिफारसी स्वीकारण्यास व या शिफारसींवर आधारित महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१

munotes.in

नुसार जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांची निर्मिती करण्यात आली. १९६१ ते १९९२ या कालखंडात पंचायत राजविषयक कायद्यात ११ वेळा दुरुस्त्या करण्यात आल्या. तत्पूर्वी महाराष्ट्र मुंबई ग्रामपंचायत अधिनियम-१९५८ नुसार महाराष्ट्रात ग्रामपंचायतींची निर्मिती झालेली होती. १९५८ अधिनियम व १९६१च्या अधिनियमान्वये महाराष्ट्रात ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद कार्यान्वित आहेत. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम -१९६१ मधील तरतुदींमुळे जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना कायद्याचे अधिष्ठान प्राप्त होऊन त्या बळकट झाल्या.

## २.२ महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम १९६१

### प्रारंभिक

**कलम १ -** कलम १ अन्वये या अधिनियमास, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ असे म्हणावे. तो बृहन्मुंबई व्यतिरिक्त संपूर्ण महाराष्ट्रास लागू आहे.

**कलम २–** कलम-२मध्ये महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील विविध संकल्पनांच्या व्याख्या दिल्या आहेत.

**कलम ३ -** कलम ३ अन्वये या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी महाराष्ट्र राज्याची जिल्ह्यामध्ये विभागणी करण्यात येईल आणि जिल्ह्याची गटामध्ये विभागणी करण्यात येईल.

**कलम ४ -** या कलमान्वये जिल्ह्याच्या रचनेसंबंधी तरतुद केली आहे.

**कलम ५ -** या कलमान्वये जिल्ह्यामधील गटांच्या रचनेसंबंधी तरतुद केली आहे.

### जिल्हा परिषदांची रचना

**कलम६-**कलम ६ अन्वये प्रत्येक जिल्ह्याकरिता, अध्यक्ष व परिषद सदस्य यांची मिळून एक जिल्हा परिषद स्थापन करणेची तरतुद केली आहे.या कलमाला जिल्हा परिषद, पंचायत समित्या, स्थायी समिती.

विषय समित्या, पीठासीन प्राधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी संदर्भात तरतुदी आहेत.

कलम ७ - कलम ७ अन्वये, जिल्हा परिषदेची प्राधिकरणे व त्यांचे संघटन याबाबत तरतुदी आहेत.

कलम ८ - कलम ८ अन्वये, जिल्हा परिषदांचे कायद्याने संस्थापन करणेबाबत तरतुद केली आहे.

कलम ९ - कलम ९ अन्वये जिल्हा परिषदांची रचनेबाबत तरतुद केली आहे.

कलम ९ क - जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्या निवडणुकीबाबत राज्य निवडणूक आयोगाशी अधीन राहून तरतुद केली आहे.

## परिषद सदस्यांची निवडणूक

कलम १० - कलम १०अन्वये या अधिनियमांन्वये परिषद सदस्यांची निवडणूक व त्यांचा पदावधी इत्यादी बाबत तरतुद करण्यात आली आहे.

कलम १० क - कलम १० क नुसार मतदान प्रक्रियेची रीतीबाबत तरतुद केली आहे.

कलम ११ - कलम ११ अन्वये, परिषद सदस्यांच्या पदावधीच्या प्रारंभाबाबत तरतुद केली आहे.

कलम १२ - कलम १२ अधिनियमांन्वये राज्य निवडणूक आयोग परिषद सदस्यांच्या निवडणुकीच्या प्रयोजनासाठी प्रत्येक जिल्ह्याथी निवडणूक विभागात विभागणी करेल.

**कलम १३** - लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५०च्या तरतुदीनुसार मतदारांच्या यादीबाबत तरतुदी केल्या आहेत.

**कलम १४** - कलम १४ अन्वये, निवडणुकीच्या दिनांकाची तरतुद केली आहे.

**कलम १५** - कलम १५ अन्वये, निवडून येण्यास अर्हता असणाऱ्या व्यक्तींबाबत तरतुद केली आहे.

**कलम १५क** - या कलमान्वये जर एखादी व्यक्ती जिल्हा परिषदेत एकाहून अधिक जागांवर निवडून आली असेल, तर राज्य निवडणूक आयोगालस किंवा याबाबतीत राज्य निवडणूक आयोगाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास तिने एक जागा सोडून सर्व जागांचा स्वतःच्या सहीनिशी राजीनामा दिल्या विहित केलेल्या अवधीत कळविले नसेलतर सर्व जागा रिकाम्या होतील.

**कलम १६** - या कलमान्वये यातील तरतुदींना अधीन राहून निवडून येण्यास व्यक्तीची निरर्हतेबाबत तरतुद केली आहे.

कलम १७ - या कलमान्वये मतदानाच्या हक्काबाबत तरतुदी केल्या आहेत.

कलम १८ - या कलमान्वये मतदानाचा किंवा निवडून येण्याचा हक्क निर्धारित करण्यासाठी मतदारांची यादी निर्णायक पुरावा असेल.

## निवडणुका व निवडणूकविषयक विवाद

कलम १९ - निवडणुकीच्या प्रयोजनांसाठी परिवास्तू वाहने, वगैरे यांचे अधिग्रहणाबाबत तरतुदी केल्या आहेत.

कलम २० - निवडणुकीच्या प्रयोजनासाठी परिवास्तू वाहने, वगैरे यांचे भरपाई देणेची तरतुद केली आहेत.

कलम २१ - या कलमान्वये माहिती मिळविण्याच्या अधिकाराबाबत तरतुद आहे.

कलम २२ - या अधिनियमान्वये परिवास्तूंमध्ये वगैरे प्रवेश करण्याचा आणि त्यांचे निरीक्षण करण्याचा अधिकार आहे.

कलम २३ - या अधिनियमांन्वये अधिग्रहण केलेल्या परिवास्तूंतून निष्कासित करणेबाबत तरतुद आहे.

कलम २४ - अधिग्रहणातून परिवास्तू मुक्त करणेबाबत तरतुद आहे.

कलम २५ - एखाद्या व्यक्तीने अधिग्रहणासंबंधीच्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन केल्याबद्दल शास्तीची तरतुद आहे.

कलम २६ - कोणत्याही निवडणुकीत मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर कोणत्याही उमेदवारांना समसमान मते मिळाली असल्याचे दिसून आले, तर राज्य निवडणूक आयोग याबाबतीत ज्यास अधिकार देईल असा

अधिकारी ताबडतोब चिठ्या टाकून ज्या उमेदवाराच्या नावे चिठ्ठी निघेल त्यास जणू एक मत अधिक मिळाले असावे त्याप्रमाणे कार्यवाही करेल

कलम २७ - जर एखाद्या परिषद सदस्याच्या बाबतीत अशा निवडणुकीतील कोणत्याही उमेदवाराने किंवा त्या निवडणुकीत मतदान करण्यासपात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीने आक्षेप घेतला, तर निकाल

घोषित झाल्यापासून पंधरा दिवसांत जिल्ह्याच्या जिल्हान्यायाधीशांकडे आक्षेपाच्या निर्मितीसाठी अर्ज करता येईल.

कलम २७ क - कलम २७ क अनुसार निवडणूकविषयक बाबींमध्ये न्यायालयांनीहस्तक्षेप करण्यास प्रतिबंध असेल.

कलम २८ - कोणत्याही व्यक्तीस अपराधसिद्धीमुळे किंवा भ्रष्टाचारामुळे उद्भवणारी निरर्हताबाबत तरतुद केली आहे.

कलम २८ क - निवडणुकीच्या संबंधांत निरनिराळ्या वर्गामध्ये वैरभाव वाढविणे कायदेशीर शिक्षेची तरतुद केली आहे.

कलम २८ ख - निवडणुकीच्या आदल्या दिवशी किंवा निवडणुकीच्या दिवशी सार्वजनिक सभा भरविण्यास मनाई आहे.

कलम २८ ग - निवडणुकीच्या सभांमध्ये दंगल माजविणाऱ्यास दंडाची शिक्षा होईल.

कलम २८ घ - कोणतीही व्यक्ती ज्यावर मुद्रक व प्रकाशक यांची नावे पत्ते मुद्रित करण्यात आले नसतील असे कोणतेही निवडणूकविषयक पत्रक किंवा भित्तीपत्रक मुद्रित करणार किंवा प्रसिद्ध करणार नाही.

कलम २९ - निवडणुकीच्या तारखेस शंभर यार्डाच्या आत मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राजवळ प्रचार करण्यास मनाई आहे.

कलम ३० - या कलमान्वये कोणत्याही व्यक्तीस मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राजवळ बेबंद केल्याबद्दल शास्तीथी तरतुद आहे.

कलम ३१ - कोणत्याही व्यक्तीस मतदान केंद्रावर गैरवर्तणूक केल्याबद्दल शास्तीची तरतुद आहे.

कलम ३२ - निवडणूक मत नोंदणीशी किंवा मतमोजणीशी संबंधित असलेले कोणतेही काम करणारा प्रत्येक अधिकारी, लिपिक, प्रतिनिधी किंवाइतर व्यक्ती मतदानाची गुप्तता राखील व राखण्याच्या कामी मदत करेल.

कलम ३३ - निवडणुकीसंबंधी अधिकारी वगैरे यांनी उमेदवारांच्या वतीने काम न करणे किंवा मतदानाच्या बाबतीत वजन खर्च न करणे बाबत तरतुद आहे.

कलम ३३ क - निवडणुकीच्या वेळी वाहने बेकायदेशीररीत्या भाड्याने घेण्याबद्दल किंवा ती प्राप्त करण्याबद्दल शिक्षेची तरतुद आहे.

कलम ३४ - निवडणुकीच्या संबंधातील पदीय कर्तव्याचा भंग केला, तर शिक्षेची तरतुद केली आहे.

कलम ३५ - जी कोणी व्यक्ती मतदान केंद्रातून मतपत्रिका काढून नेणे (लबाडीने) हा अपराध आहे.

कलम ३६ - अन्वये कोणतीही व्यक्ती कोणत्याही निवडणुकीच्या वेळी निवडणूक प्रक्रियेसंबंधी इतर अपराध करेल तर त्यास शिक्षेची तरतुद आहे.

कलम ३७ - या अधिनियमान्वये विवक्षित अपराधांच्या संबंधात खटला दाखल करणेची जिल्हाधिकाऱ्यास तरतुद आहे.

**परिषद सदस्यांचा राजीनामा त्यांना पदावरून दूर करणे व त्यांच्या नैमित्तिकरीत्या रिकाम्या झालेल्या जागा वगैरे.**

कलम ३८ - निवडून आलेल्या कोणत्याही परिषद सदस्यास अध्यक्षाच्या नावे स्वतःच्या सहीनिशी राजीनामा लिहून आपल्या अधिकारपदाचा राजीनामा देता येईल अशी तरतुद केली आहे.

कलम ३९ - जर कोणताही परिषद सदस्य आपली कर्तव्ये बजावीत असता गैरवर्तणूक केल्याबद्दल सदस्यास अधिकारपदावरून दूर करता येईल.

कलम ४० - या कलमान्वये परिषद सदस्यांची पदावधीच्या काळातील निरर्हताबाबत तरतुद केली आहे.

कलम ४१ - एखाद्या परिषद सदस्य त्याचा पदावधी संपण्यापूर्वी मरण पावल्यामुळे, त्याने राजीनामा दिल्यामुळे, त्यावर अपात्र ठरविल्यामुळे, किंवा काम करणेस असमर्थ झाल्यामुळे अशा प्रसंगी रिकामी झालेली जागा भरणेची तरतुद आहे.

**अध्यक्ष आणि उपाध्यक्ष**

कलम ४२ - या अधिनियमान्वये अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या निवडणूकसंबंधी तरतुद केली आहे.

कलम ४३ - या अधिनियमान्वये अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा कालावधी निश्चित करणेची तरतुद केली आहे.

कलम ४४ - वगळण्यात आले आहे.

कलम ४५ - अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या निवडणुकीची कार्यपद्धतीबाबत तरतुद करण्यात आली आहे.

कलम ४६ - या अधिनियमान्वये अध्यक्षाला द्यावयाचे मानधन आणि इतर सुविधेबाबत तरतुदी दिल्या आहेत.

कलम ४६ क - अध्यक्षांच्या आतिथ्य भत्यासंदर्भात तरतुद आहे.

कलम ४६ ख - आतिथ्य भत्त्याच्या कमाल मर्यादेत बदल करण्याचा अधिकार आहे.

कलम ४७ - अध्यक्षास वर्षातून तीस दिवसांहून अधिक नसेल इतक्या कालवधीसाठी परवानगीशिवाय गैरहजर राहता येईल. अध्यक्षाला अनुपस्थिती रजा देणे आणि परिणामस्वरूप तरतुदी केल्या आहेत.

कलम ४७ क - उपाध्यक्षास द्यावयाचे मानधन अनुपस्थिती रजेसह इतर सवलती आणि परिणामस्वरूप तरतुदी केल्या आहेत.

कलम ४८ - अध्यक्षास आयुक्तास संबोधून आपल्या अधिकारपदाचा राजीनामा स्वतःच्या सहीनिशी लेखी राजीनामा देता येईल.

कलम ४९ - अन्वये जिल्हा परिषदेच्या कोणत्याही बैठकीत भाग घेण्याचा व मतदानाचा त्या त्या वेळी हक्क असणाऱ्या, निवडून आलेल्या परिषद सदस्यांच्या एकूण संख्येपैकी दोन तृतीयांश बहुमताने जिल्हा

परिषदेच्या विशेष बैठकीत अध्यक्ष किंवा उपाध्यक्षयांच्याविरुद्ध अविश्वासाचा ठराव करणेची तरतुद आहे.

कलम ५० - या कलमान्वये अध्यक्षाने किंवा उपाध्यक्षाने आपली कर्तव्ये पार पाडीत असताना केलेल्या गैरवर्तणुकीबद्दल किंवा हयगयीबद्दल किंवाआपले कर्तव्य पार पाडण्यास त्याच्या असमर्थतेबद्दल किंवा अशा कुठल्याही कारणाने दोषी ठरण्याबद्दल राज्य शासनास कलम ४९ च्या तरतुदीस बाधा न येऊ देता अध्यक्ष किंवा उपाध्यक्षास अधिकारपदावरून दूर करण्याची तरतुद आहे.

कलम ५१ - याबाबत, राज्य शासनाने केलेल्या नियमांच्या अधीनतेने जो अध्यक्ष एका वर्षात एकूण तीस दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठीपरवानगीशिवाय कामावर गैरहजर राहील तो अध्यक्ष म्हणून राहण्यास बंद होईल.

कलम ५२ - या अधिनियमान्वये अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष मरण पावल्यामुळे, राजीनामा दिल्यामुळे त्यास अधिकारपदापासून दूर केल्यामुळे किंवा अन्य कारणाने त्याचे अधिकारपद रिकामे झाले असता असे रिकामे

अधिकारपद कलमे ४२ व ५०च्या तरतुदीच्या अधीनतेने शक्य तितके सोयीप्रमाणे नवीन अध्यक्षाची किंवा उपाध्यक्षाची निवडणूक करून भरणेची तरतुद आहे.

कलम ५३ - नवीन अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष निवडून आल्यानंतर त्याच्या जागेवर नवीन अध्यक्ष अथवा उपाध्यक्ष यांचेकडे मावळत्या अध्यक्ष किंवाउपाध्यक्षांनी आपल्या अधिकारपदाचा कार्यभार ताबडतोब सोपवावा. कार्यभार स्वाधीन करण्यास नकार देण्यास शिक्षेची तरतुद आहे.

कलम ५४ - या अधिनियमान्वये अध्यक्षाचे अधिकार व त्याच्या कार्याची तरतुद केली आहे.

कलम ५५ - या अधिनियमान्वये उपाध्यक्षाच्या कार्याची तरतुद आहे.

**पंचायत समित्यांची रचना करणे.**

कलम ५६ - या कलमान्वये प्रत्येक गटासाठी एक पंचायत समिती असेल व तिच्यामध्ये विहित केलेली असतील अशी सर्व कार्ये ही पंचायत समितीची कार्ये असतील. पंचायत समित्यांची स्थापना करणेचीतरतुद केली आहे.

कलम ५७ - या अधिनियमान्वये पंचायत समित्यांची रचना करणेची तरतुद आहे.

कलम ५८ - या अधिनियमान्वये निर्वाचकगण, निरर्हता निवडणुका आणि निवडणूकविषयक विवाद यांच्या संबंधातील तरतुदी आहेत.

कलम ५९ - या अधिनियमान्वये पंचायत समितीच्या सदस्यांचा पदावधी पाच वर्षे इतका असेल अशी तरतुद आहे.

कलम ६० - या अधिनियमान्वये पंचायत समितीचा कोणताही सदस्य सभापतीस संबोधून आपल्या पदाचा सहीनिशी लेखी राजीनामा देणेची तरतुद आहे.

कलम६१ - या सदस्यास कलमान्चये पंचायत

पंचायत समितीच्या कोणत्याही गैरवर्तणुकीमुळे अधिकारपदावरून दूर करणेची तरतुद आहे.

कलम६२- पंचायत समितीच्या परवानगीवाचून तिच्या बैठकीच्या लागोपाठ तीन महिन्यांच्या कालावधीपर्यत गैरहजर असेल किंवा अशा बैठकींना लागोपाठ सहा महिन्यांच्या कालावधीसाठी गैरहजर असेल तर अशासदस्यांचे अधिकारपद रिकामे होईल.

कलम ६३ - या अधिनियमान्वये पंचायत समितीच्या नैमित्तिक रिकाम्या जागा कशा भराव्यात यासंबंधी तरतुद आहे.

कलम ६४ - या कलमान्वये प्रत्येक पंचायत समितीचा सभापती व उपसभापती यांची निवडणुकीसंदर्भात तरतुद केली आहे.

कलम ६५ - या कलमान्वये प्रत्येक पंचायत समितीचा सभापती व उपसभापती यांची पदायतीसंदर्भात तरतुद केली आहे.

कलम ६६ - वगळण्यात आले आहे.

कलम ६७ - प्रत्येक पंचायत समितीच्या सभापतीच्या निवडणुकीची कार्यपद्धतीची तरतुद आहे..

कलम ६८ -प्रत्येक पंचायत समितीच्या उपसभापतीची निवडणुकीबाबत तरतुदी आहेत.

कलम ६८ क - सभापती किंवा उपसभापती यांच्या निवडणुकीच्या विधी ग्राह्यतेच्या संबंधातील विवादावर निर्णय देण्याचा आयुक्ताचा अधिकार असेल.

कलम ६९ - कलम ७०च्या तरतुदींना अधीन राहून, पंचायत समितीच्या सभापतीस व उपसभापती यांना मानधन व भत्ता देणेची तरतुद आहे.

कलम ७० - पंचायत समितीचे सभापती व उपसभापती यांच्या रजेविषयक तरतुदी दिल्या आहेत.

कलम ७१ - या अधिनियमान्वये सभापतीउपसभापती यांच्या राजीनाम्यासंदर्भात तरतुदी आहेत.

कलम ७२ - या कलमान्वये पंचायत समितीचा सभापती किंवा उपसभापती यांच्याविरुद्ध अविश्वासाचा ठराव मांडण्याची तरतुद आहे.

कलम७३-पंचायत समितीचा सभापती किंवा उपसभापती यांस गैरवर्तणूक वगैरे केल्याबद्दल अधिकारपदावरून दूर करणेची तरतुद आहे.

कलम ७४ -पंचायत समितीचा सभापती किंवा उपसभापती परवानगीशिवाय अनुपस्थित राहिल्यास सभापती किंवा उपसभापती म्हणून असण्याचेबंद होईल.

कलम ७५ - पंचायत समितीमधील सभापती किंवा उपसभापती यांची नैमित्तिक रिकामी अधिकारपदे भरणेबाबत तरतुद आहे.

कलम ७६ - या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून पंचायत समितीच्या सभापतीचे अधिकार व त्यांची कार्ये याबाबत तरतुदी आहेत.

कलम ७७ -या अधिनियमात पंचायत समितीच्या उपसभापतीचे अधिकार व कार्ये याबाबत तरतुद आहे.

**समित्या**

कलम ७८ - प्रत्येक जिल्हा परिषद स्थायी समिती, विषय समिती व इतर समित्या यांची नेमणूक करणेविषयी तरतुद आहे.

कलम ७९ - या अधिनियमात स्थायी समितीची रचनेविषयक तरतुद आहे.

कलम ७९ क - या अधिनियमात कलम ८१च्या तरतुदींना अधीन राहून जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीची रचना केली जाते.

कलम ८० - या अधिनियमात विषय समित्यांची रचनाविषयक तरतुदी आहेत.

कलम ८१ - नुसार कोणताही परिषद सदस्य एकापेक्षा अधिक समित्यांवर (स्थायी समिती धरून) निवडून दिला जाणार नाही.

कलम ८२ - जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीच्या आणि विषय समितीच्या सदस्यांचा पदावधी, त्या जिल्हा परिषदेच्या सदस्यांच्या पदावधीबरोबर समाप्त होणारा असेल.

कलम ८२ क - स्थायी समितीच्या किंवा विषय समित्यांच्या सदस्यांचा राजीनामाबाबत तरतुद आहे.

कलम ८२ ख - स्थायी समितीच्या किंवा विषय समित्यांच्या सदस्याने राजीनामा किंवा अन्य कारणामुळे जागा रिकामी झाल्यास नैमित्तिक रिकाम्या जागा कशा भराव्यात याबाबत तरतुद आहे.

कलम ८३ - जिल्हा परिषदेतील विषय समित्यांचे सभापतीबाबत तरतुदी आहेत.

कलम ८४ - विषय समित्यांच्या सभापतीस द्यावयाच्या मानधनाबाबत तरतुदी आहेत.

कलम ८४ क - राज्य शासनाच्या आदेशाने मानधनाच्या (सभापती व उपसभापती) रकमेत फेरफार करण्याचा अधिकार आहे.

कलम ८५ - विषय समित्यांच्या सभापतीस अनुपस्थितीत रजा देणे आणि त्या परिणामस्वरूप तरतुदी आहेत.

कलम ८६ -विषय समितीच्या सभापतीचा राजीनामा. सभापतीस/अध्यक्षास संबोधून लेखी स्वतःच्या सहीने देणेची तरतुद आहे.

कलम ८७ - विषय समितीच्या सभापतीविरुद्ध अविश्वासाचा ठराव मांडणेची तरतुद आहे.

कलम ८८ - विषय समितीचा सभापती आपली कर्तव्ये पार पाडीत असताना गैरवर्तणुकीच्या किंवा कर्तव्य पार पाडण्यास असमर्थ ठरल्यास अधिकार पदावरून दूर करणेबाबत तरतुद आहे.

कलम ८९ - विषय समितीचा सभापती एका वर्षात एकूण तीस दिवसांहून अधिक कालावधीकरीता अनुपस्थित राहिल्यास तो त्या विषय समितीचासभापती असण्याचे बंद होईल.

कलम ९० - विषय समितीच्या सभापतीचे अधिकारपद नैमित्तिकरीत्या रिकामे होणेबाबत तरतुदी आहेत.

कलम ९१ - या अधिनियमात स्थायी समिती व विषय समिती यांच्या सभापत अधिकार व कार्ये याबाबत तरतुदी आहेत.

कलम ९१ क - जागा रिकाम्या असताना (अध्यक्ष किंवा उपाध्यक्षांची) अधिकारांचा वापर करण्याची व कर्तव्य पार पाडण्यासाठी पीठासीन प्राधिकारी नेमण्यात शासनाचा अधिकार आहे.

कलम ९२ - विनिमयांद्वारे विहित करावयाची समित्यांची कर्तव्ये, कार्यपद्धती इत्यादीबाबत तरतुदी आहेत.

कलम ९३ - वगळले आहे.

**कार्यकारी अधिकारी**

कलम ९४ - प्रत्येक जिल्हा परिषदेसाठी एक मुख्य कार्यकारी अधिकारी व एक किंवा अधिक उपमुख्य कार्यकारी अधिकारी व त्यांची नेमणूक राज्यशासन करील.

कलम ९५ - या अधिनियमांन्वये, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे अधिकार व कार्यविषयक तरतुदी आहेत.

कलम ९६ - मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या अधिकारांच प्रत्यायोजनबाबत तरतुदी आहेत.

कलम ९६ क - कार्यकारी अधिकाऱ्याची नियुक्ती व त्याचे अधिकार आणि कार्ये याबाबत तरतुद आहे.

कलम ९७ - प्रत्येक पंचायत समितीसाठी एक गट विकास अधिकारी असेल व त्याची नेमणूक राज्य शासन करील.

कलम ९८ - गट विकास अधिकाऱ्याचे अधिकार व कर्तव्ये याबाबत तरतुदी आहेत.

कलम ९९ - या अधिनियमान्वये जिल्हा परिषदेच्या विभाग प्रमुखाचे अधिकार व कार्ये याबाबत तरतुदी आहेत.

**जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि समित्या यांचे अधिकार व कर्तव्ये**

कलम १०० - या अधिनियमान्वये, जिल्हा परिषदेचे प्रशासकीय अधिकार व कर्तव्य याबाबत तरतुदी दिल्या आहेत.

कलम १०० क - अनुसूचित क्षेत्रातील संबंधित जिल्ह्यातील जिल्हा परिषदेचे अधिकार व कर्तव्यबाबत तरतुदी आहेत.

कलम १०१ - विवक्षित विषयांच्या बाबतीत पंचायत समिती प्रथमतः जबाबदार असेल.

कलम १०१ क - गट अनुदानातून खर्च करण्याचा पंचायत समितीचा अधिकार असेल.

कलम १०१ ख -गट अनुसूचित क्षेत्रातील पंचायत समितीचे सक्षम अधिकार व कर्तव्याबाबत तरतुदी आहेत.

कलम १०२ -इतर बांधकामे करण्याचा व इतर परिसंस्थांची व्यवस्था पाहण्याचा, तांत्रिक मार्गदर्शन करण्याचा जिल्हा परिषदेचा अधिकार असेल.

कलम १०३ - राज्य शासनास जिल्हा परिषदेच्या संमतीने लोककल्याण बांधकामे व विकास परियोजना हस्तांतरित करण्याचा राज्य शासनाचा अधिकारअसेल.

कलम १०४ - जिल्हा निधी हा सर्वसाधारणपणे जिल्हा परिषदेने केलेला परिव्यय व खर्च यासाठी पात्र असेल.

कलम १०५ - जिल्हा परिषदेस, तिने किंवा तिच्याविरुद्ध लावलेल्या कोणत्याही दाव्याच्या संबंधात तडजोड करण्याच्या अधिकाराची तरतुद आहे.

कलम १०६ - हा अधिनियम आणि त्याखालील राज्य शासनाने केलेल्या नियम यांच्या तरतुदींना अधीन राहून जिल्हा परिषदेचे अधिकार व कार्ये करता येतील.

कलम १०७ - राज्य शासनाने कोणत्याही एखाद्या वर्षी कोणतेही एखादे क्षेत्र टंचाईचे क्षेत्र म्हणून जाहीर केले असेल त्याप्रसंगी जिल्हा परिषदेची कर्तव्येबाबत तरतुदी आहेत.

कलम १०८ - या अधिनियमात पंचायत समितीचे अधिकार व कार्ये याबाबत तरतुदी आहेत.

कलम १०८क - पंचायत समिती या अधिनियमाखालील आपली कार्ये व कर्तव्ये पार पाडताना जिल्हा

परिषदेकडून तिला वेळोवेळी जे कोणतेही अनुदेशदेण्यात येतील त्याप्रमाणे वागेल.

कलम १०९ - या अधिनियमात स्थायी समिती आणि विषय समित्या यांचे अधिकार व कार्येबाबत तरतुदी आहेत.

कलम १०९ क - वित्त समितीचे विशेष अधिकार व तिची कार्ये याबाबत तरतुदी आहेत.

कलम ११० - दोन किंवा अधिक जिल्हा परिषदांच्या संयुक्त समित्याबाबत तरतुदी आहेत.

**कामकाज चालविणे (जिल्हा परिषदा)**

कलम १११ -जिल्हा परिषदेस आवश्यक असेल तितक्या वेळा बैठकी घेता येतील. परंतु तिथी शेवटची बैठकीचा दिनांक यामध्ये तीन महिन्यांचा कालावधी असणार नाही.

कलम ११२ -जिल्हा परिषदेमध्ये कोणतेही अधिकारपद रिकामे झाले असता त्या काळात पुढे चालू राहणाऱ्या परिषद सदस्यांना कोणतेही अधिकारपद रिकामे झाले नाही असे समजून काम करता येईल.

कलम ११३ -अध्यक्षास राज्य शासन, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे याबाबत विनिर्दिष्ट करील अशा प्रतिष्ठित व्यक्तींना परिषद सदस्यांपुढे भाषण करता यावे म्हणून जिल्हा परिषदेची बैठक बोलवता येईल.

कलम ११४ - अध्यक्ष विवक्षित शासकीय अधिकाऱ्यांस जिल्हा परिषदेच्या बैठकीस उपस्थित राहण्यास कळवील.

कलम ११५ - अध्यक्षाने ज्या बार्बीसाठी बैठक बोलविली असेल तर त्यांना लेखी प्रतिपादने प्रस्तुत करता येतील.

कलम ११६ - या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून कार्यकारी अधिकाऱ्यास जिल्हा परिषदेच्या वतीने किंवा पंचायत समितीच्या प्रयोजनासाठी कोणत्याही स्वरूपाची संविदा किंवा करार करता येईल.

**पंचायत समित्या**

कलम ११७ - पंचायत समितीस आवश्यक असेल तितक्या वेळा बैठका घेता येतील, परंतु तिची शेवटची बैठक व तिच्या पुढच्या बैठकीचा दिनांक यामध्ये एक महिन्याचा कालावधी असणार नाही.

कलम ११८ - पंचायत समित्यांच्या बैठकींना कलमे १११, ११२ व ११५ लागू असण्याबाबत तरतुदी आहे.

**स्थायी आणि विषय समित्या**

कलम ११९ - या अधिनियमान्वये स्थायी समित्यांच्या आणि विषय समित्यांच्या बैठकी घेण्याची तरतुद आहे.

कलम १२० - सभापतीने यथास्थिती स्थायी समितीच्या किंवा विषय समित्यांच्या बैठकीस हजर राहण्यास शासकीय अधिकाऱ्यास आदेश देणे.

कलम १२१ - स्थायी समितीच्या किंवा विषय समितीच्या सभापतीने लेखी प्रतिपादने प्रस्तुत करणे.

कलम १२२ - स्थायी समितीस किंवा विषय समितीस कोणत्याही नेमून दिलेल्या किंवा त्या समित्यांकडून हाताळण्यात येणाऱ्या विषयांपैकी विचार व विनिमय करण्याची एखाद्या मंत्र्याची इच्छा असेल तेव्हा समित्यांची बैठक बोलावणे.

**बांधकामे आणि विकास परियोजना पार पाडणे व त्या सुस्थितीत ठेवणे,**

कलम १२३ - राज्य शासन, त्याच्याकडून विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तीना व निबंधांना अधीन राहून विकास योजना अंमलबजावणी जिल्हा परिषदेकडे सोपविण्याची तरतुद आहे.

कलम १२४ -राज्य शासनाने याबाबत विहित केलेल्या नियमांना अधीन राहून, जिल्हा परिषदेने पंचायत समितीमार्फत बांधकामे आणि विकास योजना पार पाडण्याची तरतुद आहे.

कलम १२५ -ज्यांच्या संबंधात जिल्हा निधीमधून किंवा गट अनुदानातून खर्च करावा लागेल अशी कोणतीही बांधकामे आणि विकास योजना अधिकाऱ्यांच्या पूर्व मंजुरीशिवाय कार्यान्वित करता येणार नाहीत.

कलम १२६ - जिल्हा निधीतून किंवा गट अनुदानातून हाती घेण्याकरिता रीतसर मंजूर करण्यात आलेली कोणतीही बांधकामे किंवा विकास परियोजना पार पाडण्यासाठी नियमांद्वारे विहित करण्यात येतील

अशा अधिकाऱ्यांच्या पूर्व मंजुरीशिवाय कोणत्याही निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.

कलम १२७ - जिल्हा परिषदेने किंवा पंचायत समितीने हाती घेतलेले कोणतेही बांधकाम किंवा विकास योजना निरीक्षण करण्याचा व तांत्रिक मार्गदर्शन वगैरे देण्याचा राज्य शासनाचा किंवा अधिकाऱ्यांचा अधिकार असेल.

**जिल्हा परिषद, तिची मालमत्ता, निधी व खर्च**

कलम १२८ - जिल्हा परिषदेस, आपल्या कार्यापैकी कोणत्याही कार्याच्या प्रयोजनासाठी मालमत्ता संपादन करण्याचा व ती भाडेपट्टीने देण्याचा, विकण्याचा किंवा हस्तांतरित करण्याचा अधिकार आहे.

कलम १२९ - जिल्हा निधीतून किया गट अनुदानातून पंचायत समिती किंवा शासनाच्या साहाय्याने किंवा जनतेच्या सहभागाने केलेले प्रत्येक बांधकाम जिल्हा परिषदेची मालमत्ता असेल,

कलम १३० -प्रत्येक जिल्ह्यात 'जिल्हा' निधी या नावाचा एक स्थानिक निधी असण्याच्या तरतुदी आहेत.

कलम १३० क - जिल्हा परिषदेस या अधिनियमाखाली आपली कार्ये पार पाडण्यासाठी कोणत्याही बँकेतून किंवा सहकारी संस्थेकडून पैसे कर्जाऊ घेता येतील.

कलम १३१ - कोणत्याही कामाकरिता संबंधित खर्च भागविण्याकरिता विशेष निधी राखून ठेवता येईल.

कलम १३२ - या अधिनियमात जिल्हा निधीतून जिल्हा परिषदेने निधी कोठे खर्च करावा याबाबत तरतुदी आहेत.

कलम १३३ - प्रत्येक जिल्हा परिषदेस तिच्याकडे असलेल्या जिल्हा निधीतून सर्वसाधारण खर्च भागविण्याची तरतुद आहे,

कलम १३४ - मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने सही केलेले धनादेश किंवा पतपत्र हजर केल्याशिवाय जिल्हा निधीतील कोणताही पैसा करारी कोषागारातून किंवा बँकेतून काढता येणार नाही.

कलम १३५ - प्रत्येक जिल्हा परिषदेचे किंवा पंचायत समितीचे जमा व खर्च यांचे लेखे राज्यशासन याबाबतीत केलेल्या नियमान्वये वेळोवेळी विहितकरील अशा नमुन्यात ठेवण्यात येतील अशी तरतुदकेलेली आहे.

कलम १३६ - मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा निधीतून काढण्यात आलेली रक्कम आस्थापनेवरील खर्च व इतर सर्व खर्च हाती घेण्यात आलेली बांधकामे व विकास परियोजना आणि हातची शिल्लक कोणतीही

असल्यास, दर्शविणारे जिल्हा परिषदेच्या जमा व खर्च यांच्या लेख्यांचे विवरणपत्र राज्यशासन दरवर्षी नियमाद्वारे विहित करील.

कलम १३७ - प्रत्येक जिल्हा परिषद पुढील वित्तीय वर्षासाठी परिषदेच्या प्राप्तीचे व खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज, राज्य शासन, याबाबतीत केलेल्या नियमान्वये वेळोवेळी विहित करील त्या दिनांकास किंवा त्या पूर्वी वविहित नमुन्यात दरवर्षी तयार करील,

कलम १३८ - आवश्यक असेल तेव्हा सुधारित किंवा पुरवणी अर्थसंकल्पीय अंदाज करणे. तसेचअर्थसंकल्पीय अंदाजाप्रमाणे पुनर्विनियोजन मान्यतेच्याअधीन असणेबाबत तरतुद आहे.

कलम १३९ - अर्थसंकल्पीय अंदाज व पुनर्विनियोजन यांना केव्हा मान्यता घ्यावी अशी तरतुद आहे.

कलम १४० - अर्थसंकल्पीय अंदाजात तरतुद न केलेली कोणतीही रक्कम अत्यंत निकडीच्या प्रसंगाखेरीज एरव्ही खर्च न करणेची तरतुद आहे.

कलम १४१ - जिल्हा परिषदेच्या प्राधिकाऱ्यांनी कर्जे किंवा आकस्मिक खर्च मंजूर करणे किंवा येणे असलेल्या रकमा निर्लेखित करणे, अशा अधिकाऱ्यांच्या मर्यादा तरतुद आहे.

कलम १४१ क - या अधिनियमान्वये जिल्हा परिषदेस येणे असलेली रक्कम जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करणे.

कलम १४२ - या कलमाच्या तरतुदींना अधीन राहून, प्रत्येक जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती आपला प्रशासन अहवाल तयार करील,

कलम १४२क -कोणत्याही जिल्हा परिषदेचे किंवा पंचायत समितीचे लेखे,महालेखाकार, महाराष्ट्र राज्य शासन वेळोवेळी देईल आशा निदेशानुसार महालेखाकार निर्धारित करील अशा कोणत्याही वेळीतपासता येईल.

**कराधान**

कलम १४३ - कलम १४३ हा अधिनियम राज्याच्या ज्या क्षेत्रांना लागू केला असेल त्या क्षेत्रास या प्रकरणाच्या तरतुदी लागू असतील.

कलम १४४ - जमीन महसुलाच्या प्रत्येक रुपयावर उपकर बसविण्याबाबत तरतुद आहे.

कलम १४५ -या अधिनियमात मुंबई जमीन महसूल आकारणी नियमाची तरतुद आहे.

**कलम** १४६ - या कलमान्वये पाणीपट्टीवर उपकर बसवण्याबाबत तरतुद आहे.

**कलम** १४७ - कलम १४४ मध्ये वर्णन केलेला उपकर बसवण्याची रीत आहे.

**कलम** १४८ - कलम १४६ मध्ये वर्णन केलेला उपकर बसवण्याची रीत आहे.

**कलम** १४९ - वरिष्ठ धारक व जलप्रवाहाचे मालक यांना त्यांची कुळे व भोगवटादार यांच्याकडून रकमा वसूल करण्याचा अधिकार आहे.

**कलम** १५० - पाणीपट्टीवरील स्थानिक उपकर गोळा करणे व तो जमा करणेची तरतुद आहे.

**कलम** १५१ - विदर्भ क्षेत्रात जमीन महसुलाच्या प्रत्येक रुपयावर उपकर बसवणेची तरतुद आहे.

**कलम** १५२ - हैदराबाद क्षेत्रात जमीन महसुलाच्या प्रत्येक रुपयावर उपकर बसवणेची तरतुद आहे.

**कलम** १५३ - जमीन महसुलावरील स्थानिक उपकर गोळा करणे व तो जमा करणे,

कलम १५४ - स्थानिक उपकर निलंबित करणे किंवा त्यात सूट देणेची तरतुद आहे.

कलम १५५ - या अधिनियमान्वये उपकराच्या दरात वाढ सुचविण्याचा जिल्हा परिषदेचा किंवा पंचायत समितीचा अधिकार आहे.

कलम १५६ - एखाद्या जमिनीतील खनिजे शासनाच्या मालकीची असतील आणि शासनास स्वामित्वधन देय असेल तर जमीनीवर उपकर बसवण्याचा अधिकार आहे

कलम १५७ - जिल्हा परिषदेस लादता येतील अशा करांची तरतुद आहे.

कलम १५८ - स्थावर मालमत्ता विवक्षित हस्तांतरणावर मुद्रांक शुल्क बाबतची तरतुद आहे.

कलम १५९ - कोणताही कर किंवा कोणतीही फी लादण्यापूर्वी प्रत्येक जिल्हा परिषद आपल्या बैठकीत एक ठराव संमत करणेबाबत जिल्हा परिषदेची कार्यपद्धती आहे.

कलम १६० - जिल्हा परिषदेस या अधिनियमान्वये कर रद्द करण्याची किंवा त्यात फेरफार करण्याची कार्यपद्धती आहे,

कलम १६१ - फी न दिल्याच्या प्रकरणातील कार्यपद्धतीची तरतुद केली आहे.

कलम १६२ - ज्या जिल्ह्याकरिता मंजूर केलेले नियम नोटिशीसह प्रसिद्ध करणे (जिल्हा परिषद करील) अशी तरतुद आहे.

कलम १६३ - या अधिनियमान्वये जिल्हा परिषदेने लादलेल्या सक्तीच्या सर्वसाधारण व विशेष पाणीपट्ट्या पंचायतींनी गोळा करणेची तरतुद आहे.

munotes.in

कलम १६४ - कोणत्याही पंचायतीने तिने कलम १६३ खाली गोळा केलेली सर्वसाधारण पाणीपट्टीची किंवा विशेष पाणीपट्टीची कोणतीही रक्कम जिल्हा परिषदेने दिलेल्या तारखेच्या आत भरणेस कसूर केल्यास तिच्या पैशातून ती रक्कम वसूल करणेची तरतुद आहे.

**कलम** १६५ - जिल्हा परिषदेमधील आक्षेपार्ह करांची आकारणी निलंबित करण्याचा राज्य शासनास या कलमान्वये अधिकार आहे

**कर किंवा फी गोळा करणे**

**कलम** १६६ - कराच्या किंवा फीच्या रकमेचे बिल सादर करणेची तरतुद आहे.

**कलम** १६७ - अधिपत्र काढणे.

**कलम** १६८ - अधिपत्रावर सही कोणी करावी याबाबत तरतुद आहे.

कलम १६९ - अधिपत्र कोणाच्या नावे काढावे ह्याबाबत तरतुद आहे.

कलम १७० - विशेष आदेशाखाली प्रवेश करण्याच्या अधिकाराबाबत तरतुद आहे.

कलम १७१ - अधिपत्र कसे बजावले पाहिजे याबाबत तरतुद आहे.

कलम १७२ -अटकावून ठेवलेल्या मालाची विक्रि विक्रिच्या उत्पन्नाचा विनियोग आणि शिल्लक रकमेथी व्यवस्था कशी लावावी याबाबत तरतुदी आहेत.

कलम १७३ - जिल्ह्याबाहेरील अटकावणी व विक्रीबाबत तरतुदी आहेत.

कलम १७४ - आकारावयाची फी व परिव्ययाबाबत तरतुद आहे.

कलम १७५ - कोणत्याही हक्कभंगाविरुद्धदंडाधिकाऱ्यांकडे अपील करणेची तरतुद आहे.

कलम १७६ -जमिनी, इमारती वगैरे यांचे पट्टी बसवण्याबाबतचे दायित्व असणे बाबत तरतुद आहे.

कलम १७७- जिल्हा परिषदेस या अधिनियमान्वये अटकावणी करून व विक्री करून वसुली करण्याचा अधिकार निलंबित करणे.

कलम १७८ - जिल्हा परिषदेस, पथकर किंवा विवक्षित फी यांच्या वसुलाचा पट्टा देणेबाबत तरतुद आहे.

कलम १७९ - या अधिनियमाखाली कोणत्याही कराच्या किंवा फीच्या संबंधात भरलेल्या सर्व रकमांबद्दल त्या स्वीकारणारी व्यक्ती पावती देईल अशी तरतुद आहे.

**जिल्हा परिषदांना वित्तीय साहाय्य**

कलम १८० - वगळले आहे

कलम १८१ - वगळले आहे

कलम १८१ क - जिल्हा परिषदांना वन महसुलाचे अनुदान मिळणे बाबत तरतुद आहे.

कलम १८२ - या अधिनियमान्वये सप्रयोजन अनुदाने या संदर्भात तरतुदी आहेत.

कलम १८३ - या अधिनियमान्वये आस्थापना अनुदानाबाबत तरतुद आहे.

कलम १८४ - वगळण्यात आले.

कलम १८५ - स्थानिक उपकराला अनुरूप अनुदान देणे तरतुद आहे.

कलम १८६ - स्थानिक उपकराला अनुरूप अनुदान देणे तरतुद आहे.

कलम १८६ - राज्य शासनास प्रत्येक जिल्हा परिषदेच्या विकासविषयक कार्याची प्रगती लक्षात घेऊन त्यांच्या मते, ज्यामुळे आणखी जलद विकास करण्यास प्रोत्साहन मिळेल याकरिता पोत्साहन पर अनुदाने

मिळण्याची तरतुद आहे.

कलम १८७ - जिल्हा यादीत नमूद केलेल्या कोणत्याही विषयाच्या संबंधातील कामाकरिता राज्य शासन जिल्हा परिषदेस अनुदान देणेची तरतुद आहे.

कलम १८८ - या अधिनियमान्वये राज्य शासन जिल्हा परिषदेस गट अनुदाने देण्याची तरतुद आहे. कलम १८९ - वगळण्यात आले.

**स्वच्छताविषयक व इतर अधिकार**

कलम १९० - मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास कोणत्याही इमारतीमध्ये प्रवेश करणे,त्यांचे निरीक्षण करणे याबाबत तरतुद आहे.

कलम १९१ - घाणेरड्या इमारतीनिरीक्षण। बाबत संदर्भात तरतुदी आहेत.

कलम १९२ - मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास किंवा त्याने याबाबत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस पाणीपुरवठ्याच्या साधनांच्या संबंधातील अधिकारव कर्तव्ये याबाबत तरतुदी आहेत.

कलम १९३ - दिलेल्या निर्देशाचे अनुपालन न केल्यास उपाययोजना करण्याबाबत तरतुदी आहेत.

कलम १९४ - मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास झरे, तलाव, विहिरी किंवा इतर ठिकाणे अलग राखून ठेवण्याचा अधिकार आहे.

कलम १९५ - पिण्याच्या प्रयोजनासाठी अलग राखून ठेवलेल्या पाण्याच्या जागांसंबंधी तरतुदी आहेत.

कलम १९६ - दूषित पाण्यापासून होणारे रोग, आजार कमी करणे संदर्भात तरतुदी आहेत.

कलम १९७ - प्रेतांची विल्हेवाट लावण्याच्या जागांसंदर्भात तरतुदी केल्या आहेत.

munotes.in

कलम १९८ - या अधिनियमान्वये संसर्गजन्य रोगांनी प्रभावित इमारती, जागा,वसाहती, घरे,फवारणी आदी उपाययोजना करून दूर करणेची तरतुद आहे.

कलम १९९ - जिल्हा परिषदेने संसर्गजन्य वस्तू व तत्सम बाबीसंदर्भात या अधिनियमात तरतुद केली आहे.

कलम २०० - सार्वजनिक रस्ता, जमीन, इमारत यावरील अडथळे व अतिक्रमणे दूर करणेबाबत तरतुदी आहेत.

कलम २०१ - वजन, मापे इत्यादी संदर्भात निरीक्षण करणेच्या तरतुदी आहेत.

कलम २०२ - मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास पारिवास्तूंना क्रमांक देणेचा अधिकार आहे.

**सार्वजनिक करार**

कलम २०३ - या अधिनियमान्वये जिल्हा परिषदेस बाजारासंबंधातील अधिकार निश्चित करणेच्या तरतुदी आहेत.

**खाजगी बाजार**

कलम २०४ - या अधिनियमान्वये या तरतुदी गावांना लागू करण्याचा राज्य शासनास अधिकार आहे.

कलम २०५ - जिल्हा परिषदेस खाजगी बाजारासाठी आवश्यक असलेल्या लायसन्ससंबंधीच्या तरतुदी आहेत.

कलम २०६ - या अधिनियमान्वये जिल्हा परिषदेस फी बसविण्याच्या अधिकाराची तरतुद दिली आहे.

कलम २०७ - या अधिनियमान्वये फी बसवण्याच्या हक्क मागणीबाबत घ्यावयाच्या निर्णयासंबंधी तरतुदी आहेत.

कलम २०८ -फी बसवण्याचा हक्क प्रस्तावित करण्यासाठी दाव्याची तरतुद आहे.

कलम २०९ - लायसनबद्दल फी आकारण्यासंदर्भात तरतुदी आहेत.

कलम २१० - लायसन निलंबित करणे किंवा रद्द करणेबाबत तरतुदी आहेत.

कलम २११ -कलम २०५, २०६, २०९ आणि २१० अन्वये जिल्हा परिषदेमध्ये विहित केलेल्या अधिकारांन्वये जिल्हा परिषदेविरुद्ध अपील करणेचीतरतुद आहे.

कलम २१२ - लायसन्स देण्यात कसूर करणे आणि अशा आदेशाविरुद्ध अर्ज करणेची तरतुद आहे.

कलम २१३ -जी कोणतीही व्यक्ती ज्यासाठी लायसन देण्यात आलेले नाही असा एखादा बाजार स्थापन करणेचा प्रयत्न करेल त्यास शिक्षेची तरतुदआहे.

**जत्रा**

कलम २१४ - राज्य शासनाने जत्रेच्या संबंधात सार्वजनिक बाजारांच्या संबंधातील तरतुदी केल्या आहेत.

**सार्वजनिक गाडीतळ**

कलम २१५, २१६, २१७ व २१८ हे सार्वजनिक गाडीतळासंदर्भातील तरतुदी करणारे कलमे आहेत.

कलम २१९ ते २२६ हे राज्याच्या हैदराबाद प्रदेशातील नगररचनेसंबंधी विशेष तरतुदी आहेत.

कलम २२७ - व्यक्तीच्या नावाने काढलेल्या नोटिसा, वगैरे बजावणेबाबत तरतुदी आहेत.

कलम २२८ - जमिनीच्या व इमारतींच्या मालकांवर किंवा भोगवटादारावर नोटिसा काढणेसंबंधी तरतुदी आहेत.

कलम २२९ - जाहीर व सर्वसाधारण नोटिसा कशा प्रसिद्ध कराव्यात याबाबत तरतुद आहे.

कलम २३०- सदोष नमुन्यामुळे कोणतीही नोटिस किंवा बिल विधिग्राह्य ठरणार नाही

कलम २३१ - कोणत्याही व्यक्तीने जिल्हा परिषदेने किंवा तिच्या वतीने काढण्यात आलेल्या कोणत्याही लेखी नोटिशी, आदेश यांची अवज्ञा केल्याबद्दलया कलमान्वये शिक्षा करण्याची तरतुद आहे.

कलम २३२ - मालकाने किंवा भोगवटादाराने कसूर केली असता, जिल्हा परिषदेने कामे पार पाडणे व त्याचा खर्च वसूल करणेची तरतुद आहे.

कलम २३३ - खर्चाची किंवा त्याची रक्कम कशी ठरवावी व कशी वसूल करावी याबाबत तरतुद आहे

कलम २३४ - या अधिनियमान्वये मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास, सार्वजनिक उपद्रवाबाबत खटला भरण्याचा अधिकार आहे.

कलम २३५ - जिल्हा परिषदेच्या मालमत्तेचे नुकसान कसे भरून काढावे या संदर्भातील तरतुदी आहेत.

कलम २३६ - वसुलीबाबत कोणत्याही व्यक्तीवर दावा दाखल करण्याची पर्यायी पद्धतीबाबत तरतुद आहे.

कलम २३७ - पोलीस अधिकाऱ्यांसंदर्भात अधिकारांची तरतुद आहे.

munotes.in

**सेवांसंबंधी तरतुदी**

कलम २३८ ते कलम २५३ ग जिल्हा परिषदेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या सेवांसंबंधी तरतुदी दिलेल्या आहेत. या अंतर्गत येणारी कलमे अभ्यासक्रमामध्येफारशी उपयुक्त नसल्याकारणाने त्यांचे विश्लेषण करणे गरजेचे वाटले नाही.

**जिल्हे आणि गट यांच्या हद्दीत फेरफार करणे.**

कलम २५४ - जिल्ह्याच्या हद्दीत फेरफार करण्याचा राज्य शासनाचा अधिकार आहे.

कलम २५५ - जिल्ह्यात फेरफार करण्यात येईल तेव्हा आदेशाद्वारे यथोचित तरतुद करण्याचा राज्य शासनाचा अधिकार आहे.

कलम २५५ क - जिल्हे नाहीसे होणेबाबत तरतुदीआहेत.

कलम २५६ - गटाच्या हद्दीत फेरफार करण्याचा राज्य शासनाचा अधिकार आहे.

कलम २५७ - गटामध्ये फेरबदल करण्यात येईल तेव्हा आदेशाद्वारे यथोथित तरतुद करण्याचा राज्य शासनाचा अधिकार आहे.

कलम २५७ क - गटाची किंवा गटांची विभागणी आणि तिचे परिणाम याबाबत तरतुदी आहेत.

**नियंत्रण**

कलम २५८ -राज्य शासनाला जिल्हा परिषदेच्या कारभारासंबंधी चौकशी करण्याचा अधिकार आहे

कलम २५९ - जिल्हा परिषदेने कर्तव्ये बजाविण्यात कसूर केली असता ती पार पाडण्याबाबत तरतुद करण्याचा राज्य शासनास अधिकार आहे.

कलम २६० - जिल्हा परिषद तिच्या अधिकारांचे अतिक्रमण करते किंवा दुरुपयोग करते किंवा इतर कायद्याखालील तिच्यावर लादलेली कर्तव्ये पारपाडण्यास ती सक्षम नाही किंवा पार पाडण्यात सतत कसूर करते तेव्हा राज्यशासनास जिल्हा परिषद विसर्जित करण्याचा अधिकार आहे

कलम २६१ - जिल्हा परिषदेस बांधकामे वविकासविषयक परियोजना यांच्या संबंधात निदेश देण्याचे राज्य शासनाचे अधिकार आहेत.

कलम २६१ क - नळाने पाणीपुरवठा करण्याची परियोजना आपल्याकडे घेण्यात जिल्हा परिषदेने कसूर केली असता ती परियोजना कार्यान्वित ठेवण्यासाठी अनुदान इत्यादीमधून खर्च वसूल करण्याचा राज्य शासनाचा अधिकार आहे

कलम २६२ - या अधिनियमान्वये आयुक्ताने जिल्हा परिषदेची तिच्या समितीची किंवा पंचायत समितीची बैठक बोलविण्याची तरतुद आहे.

कलम २६३- आयुक्तास किंवा याबाबत राज्य शासनाने रीतसर प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास निरीक्षण व पर्यवेक्षण करण्याचा अधिकार आहे.

कलम २६४ - आयुक्ताने जिल्हा परिषदेच्या कार्यालयाचे निरीक्षण करणे यासंबंधी तरतुद आहे.

कलम २६५ - जर, जिल्हा परिषदेच्या कर्मचारीवर्गातील अधिकाऱ्यांची किंवा वर्ग तीनच्या कर्मचाऱ्यांची किंवा वर्ग चारच्या कर्मचाऱ्यांची संख्या प्रमाणापेक्षा जास्त असेल, तर निरर्थक खर्चास प्रतिबंध करण्याचा आयुक्तास अधिकार आहे.

कलम २६६ - राज्य शासनाने जिल्हाधिकाऱ्यास जिल्हा परिषदेच्या कामकाजाविषयी माहिती मागविण्याची तरतुद या कलमान्वये केलेली आहे.

कलम २६७ - जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती यांच्या वतीने कोणत्याही गोष्टीमुळे अथवा कामामुळे लोकांना इजा पोहोचण्याचा धोका होण्याचा संभव आहे असे आदेश, वगैरे यांची अंमलबजावणी रद्द करण्याचा अधिकार जिल्हा दंडाधिकाऱ्यास दिला आहे.

कलम २६८ - या अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यास अत्यंत निकडीच्या प्रसंगीचे अधिकार दिलेले आहेत.

कलम २६९ - पंचायत समिती आपल्या अधिकारांचे अतिक्रमण किंवा दुरुपयोग करीत आहे किंवा आपले कर्तव्य करण्यास अक्षम आहे. अशा वेळेस या कलमान्वये राज्य शासनास पंचायत समिती बरखास्त करणेचा अधिकार आहे.

कलम २७० -विविध बाबतीत राज्य शासनास विशेष नियमान्वये काटकसर करण्याचा अधिकार आहे

कलम २७१ - या अधिनियमान्वये कोणत्याही जिल्ह्यात किंवा त्याच्या भागात कोणताही घातक, साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव झाला असेल किंवा पूर टंचाई, नैसर्गिक आपत्ती, संकट यामुळे त्या भागास धोका संभवत असेल तर या कलमान्वये संकटग्रस्त जिल्ह्यात संबंधित नोकरीवर ठेवलेल्या कर्मचारी वर्गाची दुसऱ्या जिल्ह्यात बदली करण्याचा राज्य शासनाचा अधिकार आहे

कलम २७२ - या अधिनियमान्वये राज्य शासनाचे व आयुक्तांचे कार्यांच्या संबंधात अधिकारांची तरतुद आहे.

कलम २७३ - राज्य शासनाने अधिकार प्रत्यायोजित करणेबाबत अधिकार आहेत.

**नियम, विनिमय आणि उप-विधी**

कलम २७४ ते कलम २७६ मधील तरतुदी ह्या नियम, विनिमय आणि उप-विधी संबंधातील आहेत. त्याचे विश्लेषण करणे अभ्यासक्रमाच्या दृष्टीने आवश्यकवाटले नाही

**संकीर्ण**

कलम २७७ - कोणत्याही परिषद सदस्यांचा किंवा पंचायत समितीच्या कोणत्याही सदस्यांचा किंवा या ठिकाणी सेवेत असलेल्या अधिकाऱ्यांचा वकर्मचाऱ्यांचा कोणतीही संविधा वगैरे यात हितसंबंध असल्यास शिक्षेची तरतुद आहे.

कलम २७८ - या अधिनियमान्वये जिल्हा परिषदेचा व पंचायत समितीचा प्रत्येक सदस्य, तसेच जिल्हा परिषद व पंचायत समितीत सेवेत असलेला सेवकवर्ग लोकांचे (जनतेचे) सेवक असण्याची तरतुद आहे.

कलम २७९ - या अधिनियमान्वये जिल्हा परिषदेच्या विभागप्रमुखांनी अधिकार सोपविण्यासंबंधी तरतुद आहे.

कलम २८० - या अधिनियमान्वये जिल्हा परिषदेने केलेल्या किंवा केल्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही कृतीबद्दल कोणत्याही जिल्हा परिषदेवर किंवातिच्या नियंत्रणाखाली काम करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्या किंवा कर्मचाऱ्याविरुद्ध दावे, इत्यादी दाखल करणेची मुदत आहे.

कलम २८१ - राज्य शासनाच्या नियमांच्या अधीन राहून जिल्हा परिषदेस आपले अधिकार सोपविण्याचा अधिकार आहे.

कलम २८२ - या अधिनियमान्वये दोन किंवा अधिक स्थानिक प्राधिकरणांची संयुक्त बैठक घेण्याचा अधिकार आहे.

कलम २८३ - महानगरपालिका, नगरपालिका वगैरेंना दिलेल्या महसुलाच्या हिश्श्याचा उपयोग करणेविषयी तरतुदी आहेत.

कलम २८४ - वगळण्यात आले आहे.

कलम २८५ - या अधिनियमान्वये कोणत्याही जिल्हा परिषदेने आवश्यक असल्यास विनंती केल्यावर राज्य शासन तिस जमीन संपादन करण्याची तरतुद करते.

कलम २८६ क - जिल्हा परिषदा व पंचायत समिती यांची मुख्यालये नेमून देण्याचा राज्य शासनाचा अधिकार आहे.

कलम २८७ - या अधिनियमांन्वये कायदा अनुकूल करून घेण्यासंबंधी राज्य शासनास अधिकार आहे.

कलम २८८ - या अधिनियमान्वये अकराव्या अनुसूचीत अंतर्भूत असलेल्या तरतुदीचा जिल्हा परिषदेच्या रचनेस लागू असतील.

कलम २८९ - हा अधिनियम किंवा कोणतीही अनुसूची यातील तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्भवण्यास राज्य शासनाला प्रसंगानुरूप आवश्यक असेल तेव्हा अडचणी दूर करण्याचे प्रयोजन आहे.

कलम २९० - कलम २८८च्या तरतुदींना अधीन राहून मुंबई स्थानिक मंडळ अधिनियम, १९९३ मध्य प्रांत व व-हाड स्थानिक शासन अधिनियम, १९४८ आणि हैदराबाद जिल्हा मंडळ अधिनियम १९५५ हे अधिनियमयाद्वारे निरसित करण्यात येत आहे.

## २.३. ७३वी घटना दुरूस्ती

**७३व्या घटनादुरूस्तीची पार्श्वभूमी**: ७३ व्या घटना दुरुस्तीआधीची पार्श्वभूमी जाणून घेतल्याशिवाय ७३ वी घटनादुरुस्ती समजावून घेणे शक्य होणार नाही. १८८२ च्या लॉर्ड रिपन यांच्या ठरावापासून सुरू झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इतिहासात अनेक अडथळे आले. लॉर्ड रिपन यांना स्थानिक स्वराज्य संस्थांचे जनक संबोधले जाते.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मार्गातील अडथळे दूर करण्यासाठी वेगवेगळ्या समित्यांच्या माध्यमातून मार्ग काढण्याचा प्रयत्न झाला. स्वातंत्र्योत्तर कालखंडात बलवंतराय मेहता समितीच्या अहवालानंतर भारतातील घटक राज्यांनी सरकारांनी आपआपल्या राज्यात कायदे करून पंचायत राजची स्थापना केली. परंतु हे कायदे त्या कायद्यांच्या भूमिका लक्षात घेऊन प्रत्यक्षात आणण्यात मात्र दिरंगाई झाली. कायद्यातील महत्त्वाच्या तरतुदींची अंमलबजावणी न झाल्यामुळे पंचायती राजव्यवस्था सबळ बनू शकली नाही. पंचायतींच्या निवडणुका वेळेत न होणे, त्यांचा कालखंड निश्चित नसणे, नोकरशाहीचे प्राबल्य, राज्य सरकारांचा या संस्थांकडे बघण्याचा दृष्टिकोन, लोकप्रतिनिधींचे कमी झालेले महत्त्व व सहभाग, पंचायतींची हलाखीची परिस्थिती, पंचायती राजच्या दयेवर अवलंबून होत्या.अशा अनेक कारणांमुळे या संस्था कार्यक्षम राहू शकल्या नाहीत. तसेच भारताच्या राज्य घटनेतराज्याच्या निर्देशक तत्त्वात पंचायतींची तरतूद केलेली असल्याने राज्यांवर कायदेशीर बंधने येऊशकली नाहीत. या पार्श्वभूमीवर या संस्थांना घटनात्मक दर्जा दिला गेला तर आपोआप त्यास कायद्याचे अधिष्ठान प्राप्त होऊन त्या सक्षम बनतील. लोकशाही विकेंद्रीकरणाचे महत्त्वाचे माध्यमञअसलेल्या या संस्था बळकट करण्यासाठी राज्य घटनेत दुरुस्ती करणे आवश्यक होते. त्या दिशेने विचारप्रवाह व मतप्रवाह होत गेला व त्याचे महत्त्वाचे पाऊल म्हणजे १९९२ ची ७३ वी घटना दुरुस्ती होय.

त्यापूर्वी जनता राजवटीतील अशोक मेहता कमिटी व महाराष्ट्रातील प्राचार्य पी.बी.पाटील समिती यांनी घटना दुरुस्ती करून केंद्र शासन, राज्य शासन त्याचप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांचे तिसरे जिल्हा शासन उभे केल्याशिवाय लोकशाही विकेंद्रीकरण होणार नाही.लोकांपर्यंत खरी सत्ता जाणार नाही. सत्तेत लोकसहभाग वाढणार नाही आणि विकास कार्यालागती येणार नाही अशा शिफारसी मांडल्या. स्वर्गीय राजीव गांधींनी या विषयात लक्ष घालून घटना दुरुस्तीचे बिल मांडले; परंतु त्यावेळेच्या अस्थिर राजकारणामुळे ते बिल पास होऊ शकले नाही.

पंचायत राजसाठी राज्य घटना दुरुस्तीचे बिललोकसभेमध्ये १५ मे १९८९ ला २/३ बहुमताने पास झाले. पण १५ नोव्हेंबर १९८९ रोजी ते बिल राज्यसभेत पास झाले नाही. या मुद्यावर कॉंग्रेस (आय) पक्षाने लोकसभा बरखास्त करून नोव्हेंबर १९८९ मध्ये सार्वत्रिक निवडणुका घेतल्या. या निवडणुकीत राष्ट्रीय आघाडीचे सरकार आले. स्वर्गीय व्ही.पी.सिंग हे पंतप्रधान झाले. त्यांनी घटना दुरुस्तीचे बिल मांडण्याचा प्रयत्न केला; परंतु ७ सप्टेंबर १९९०रोजी ते सत्तेवरून गेल्यामुळे त्या बिलावर साधी चर्चाही झाली नाही.

त्यानंतर स्वर्गीय नरसिंहरावांच्या नेतृत्वाखाली काँगेसचे सरकार सत्तेवर आले. त्यांनी ते बिल सप्टेंबर १९९१ लापुन्हा मांडले. लोकसभेत त्यावर विचारमंथन झाले व लोकसभेने २२ डिसेंबर १९९२ ला ते बिल पास केले. दुसऱ्या दिवशी राज्यसभेत पास झाले. या घटना दुरुस्तीला निम्म्यापेक्षा जास्त राज्याच्या विधानसभांनी संमती दिल्यानंतर दिनांक २० एप्रिल १९९३ रोजी राष्ट्रपतींनी त्यावर सही केली आहे महत्त्वाच्या ७३व्या घटना दुरुस्तीचा कायदा २४ एप्रिल १९९२पासूनअंमलात आणला गेला.

७३व्या घटना दुरुस्ती विधेयकामुळे खरी सत्ता लोकांच्या हातात गेली. त्यामुळे लोकशाहीचा पाया मजबूत होण्यास मदत झाली. या नव्या घटना दुरुस्ती विधेयकामुळ लोकप्रतिनिधी देशाच्या कारभारात सहभागी झाले. पंचायत राज संस्थांकडे विकासकामांपैकी २९ प्रमुख क्षेत्रे सोपविण्यात आली.

**७३ व्या घटना दुरुस्तीची प्रमुख वैशिष्ट्ये :**

**(१) नियमित निवडणुका -** ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार पंचायत राज संस्थांचा निवडणूककार्यकाल ५ वर्षांचा निश्चित केला गेला. तसेच काही कारणास्तव पंचायत सभा विसर्जितव करण्यात आली तर नवीन संस्था स्थापन करण्यासाठी राज्य सरकारने सहा महिन्यांत निवडणूक घेणे आवश्यक करण्यात आले आहे. त्यामुळे संस्थांच्या कामकाजात सातत्य येऊन त्या बळकट बनतील. विकासकार्याला गती मिळेल. या संस्थांना आपला नियोजित कार्यकाल पूर्ण करता यावा यासाठी पंचायत राज संस्था विसर्जित करण्यास मनाई करण्यात आली आहे. त्यामुळे या सर्वसाधारण काळात या संस्था आपला ५ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करतील.

**२) राखीव प्रतिनिधित्व -** समाजातील दुर्बल व कमकुवत वर्गातील लोकांना पंचायत राज संस्थांत वास्तव आणि अर्थपूर्ण सहभाग मिळावा. यासाठी कायद्याने पंचायत राज संस्थेच्या तिन्ही स्तरांवर अनुसूचित जाती-अनुसूचित जमातींच्या लोकांसाठी त्यांच्या जनसंख्येच्या प्रमाणात जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत. तसेच महिलांसाठी ३३टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. तसेच सन २०११ पासून ग्रामपंचायत पातळीवर महिलांसाठी ५० टक्के जागा राखीव ठेवण्याची तरतूद केलेली आहे.

राज्यसंस्थांची प्रमुख निर्वाचित पदे लोकसंख्येच्या प्रमाणात आणि रोटेशनने राखीव ठेवण्यात आली आहेत. त्यामुळे समाजातील कमकुवत घटकांना सत्तेत सहभागी करून घेता येईल. आपले विचार व्यक्त करण्याचे अधिकार युक्त हुकमी व्यासपीठ प्राप्त होईल.तसेच देशाच्या विकास प्रक्रियेत ते साथीदार बनतील अशी भूमिका केंद्र सरकारची आहे.

**३) आर्थिक निधी -** पंचायत राज संस्थांना विकास योजना व आपली कार्ये करण्यासाठी भक्कम आर्थिक आधाराची गरज असते. ७३व्या घटना दुरुस्तीविधेयकानुसार आर्थिक हस्तांतर पद्धती कायद्याने लागू करण्याची तरतूद केलेली आहे. त्यानुसार राज्य अर्थसाहाय्य आयोग स्थापन करण्यात आला आहे. हा आयोग पंचायत संस्थांच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेऊन या संस्थांचे आधारभूत स्त्रोत भक्कम करण्यासाठी योग्य त्या शिफारसी करेल.

**(४)राज्य निवडणूक आयोग -** ७३ व्या घटना दुरुस्तीने राज्य निवडणूक आयोग स्थापन करण्यासंबंधी तरतूद केली आहे. ७३व्या घटना दुरुस्तीने प्रत्येकराज्यात वेगळा निर्वाचन आयोग निर्माण करण्याची शिफारस केलेली आहे. राज्य निर्वाचन आयोग पंचायत राज संस्थांच्या निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करणे, निवडणुका घेणे, निर्वाचन प्रक्रियेची देखरेख ठेवणे, नियंत्रण करणे, मार्गदर्शन करणे इत्यादी कार्ये पार पाडेल. या आयोगात राज्य निर्वाचन आयुक्तांचा समावेश असेल, त्यांची नियुक्ती राज्याच्या

राज्यपालांकडून होईल. त्यांच्या सेवाशर्ती राज्यपाल निश्चित करतील,

**५) सत्तेचे प्रभावी विकेंद्रीकरण -** ७३ व्या घटनादुरुस्ती विधेयकाचे हे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्यआहे. ७३ व्या घटनादुरुस्ती मुळे पंचायत राज संस्थांमध्ये सत्तेचे प्रभावी विकेंद्रिकरण केलेले आहे. पंचायत राज संस्थांच्या तिन्ही स्तरांवर जनतेच्या लोकप्रतिनिधींना सहभागी करून घेतले आहे. राज्यसत्तेत लोकसहभाग वाढावा व विकासकार्ये जलद गतीने व्हावे यासाठी ही तरतूद केलेली आहे. लोकशाही शासनव्यवस्थेत लोकशाही विकेंद्रीकरणाला महत्त्वाचे स्थान देऊन सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यात आले आहे. त्यामुळे शासन व जनता अशा स्वरूपाची सत्ता केंद्रे निर्माण झाली आहे.

**६) त्रिस्तरीय पद्धत -** ७३ व्या घटनादुरुस्ती कायद्यान्वये पंचायत राज संस्थांचा कारभार हा त्रिस्तरीय पद्धतीने चालवला जातो. यामध्ये ग्रामपातळीवर ग्रामपंचायत, तालुका पातळीवरपंचायत समिती, जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद अशी त्रिस्तरीय रचना निर्माण करण्यात आली आहे. या त्रिस्तरीय रचनेतील प्रत्येक स्तरामध्ये लोकप्रतिनिधींना सहभागी केलेले आहे

**७)सदस्यांना प्रशिक्षण सुविधा -** केंद्र सरकारने आपली भूमिका प्रतिपादन करताना या घटना दुरुस्ती अन्वये व पंचायत राज संस्थांची पुनर्रचना केल्यामुळे पंचायत राज संस्थांमधील कमकुवत व दुर्बल घटाकांतील सदस्यांना पंचायत राज संस्थांविषयी संपूर्णतत्त्वज्ञानाबाबत आणि आपल्या जबाबदारी व

कार्यांबाबत प्रशिक्षण देणेची आवश्यकता आहे. स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य शासन, केंद्र शासन त्यांची कार्ये, नियम, तरतुदी यांचे आकलन करून देण्यासाठी त्यांना नियमित प्रशिक्षण देणेची आवश्यकता आहे.त्याचबरोबर पंचायत संस्थांमधील अधिकारी व कर्मचारी वर्ग यांना व्यापक प्रशिक्षणाची गरज प्रतिपादन केली आहे.

### ७३व्या घटना दुरुस्ती विधेयकातील ११ व्या परिशिष्टातील महत्त्वाच्या तरतुदी:

१९९२ सालच्या ७३व्या घटना दुरुस्तीद्वारा संपूर्ण देशासाठी एकाच स्वरूपाची पंचायती राज व्यवस्था स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली आहे. राज्यघटनेच्या ११ व्या परिशिष्टात समाविष्ट आदर्शवत तरतुदीवर आधारित पंचायती राजविषयक कायदे सर्व mघटकराज्यांनी डिसेंबर १९९६ अखेर लागू करावेत, असे निर्देश भारत सरकारने सर्व राज्य सरकारांना दिले. त्यानुसार ११ व्या परीशिष्टात काही महत्त्वपूर्ण तरतुदी पारीत करण्यात आल्या आहेत. त्यांचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करता येईल. महाराष्ट्रात ७३ व्या घटनादुरुस्ती कायदयाने **११ व्या परिशिष्टातील** तरतुदीप्रमाणे मुंबई ग्रामपंचायत

अधिनियम १९५८ व महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती अधिनियम, १९६१ ला अधीन राहून.

**१) ग्रामसभा** - ११ व्या परिशिष्टानुसार, अनुच्छेद २४३(अ) अंतर्गत ग्रामसभा स्थापन करणे आणि त्यांचे अधिकार व जबाबदाऱ्या निर्धारित करण्यासंबंधीच्या तरतुदी करण्यात याव्या असे निर्देश राज्य विधिमंडळांना देण्यात आले आहेत. यापूर्वीच १९५८ सालच्या मुंबईग्रामपंचायत कायद्यानुसार ग्रामसभा स्थापन करण्याची तरतूद महाराष्ट्रात अस्तित्वात होती. १९९४ पूर्वी असलेला ग्रामसभांचा वैधानिक दर्जा, ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार संवैधानिक झाला आहे.

**२) पंचायती राज व्यवस्था** - अनुच्छेद २४३ (ब) मधील तरतुदीनुसार ग्रामसभा स्तरावर ग्रामपंचायत, तालुकास्तरावर तालुका पंचायत व जिल्हा स्तरावर जिल्हा पंचायत स्थापन करण्याची तरतूद आहे. महाराष्ट्र राज्यात १९६२ पासून पंचायत राज पद्धतीची त्रिस्तरीयव्यवस्था कार्यान्वित आहे. यामध्ये ग्राम पातळीवरग्रामपंचायत, तालुका पातळीवर पंचायत समिती व जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद गेली ४९ वर्षे कार्यान्वित आहे.

**३) लोकनिर्वाचित प्रतिनिधी** - या तरतुदी अन्वये अनुच्छेद २४३ (सी) मध्ये तिन्ही स्तरावरीलरचनेबाबतच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्यानुसार लोकसंख्या आणि लोकप्रतिनिधींची संख्या यांचा गुणोत्तर राज्यात सर्वत्र समान असावा अशी आशा आहे.लोकसंख्येच्या आधारे ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेची संख्या निर्धारित केल्यानंतर त्यांच्या भौगोलिक क्षेत्राची एक सदस्य मतदारांद्वारे प्रत्यक्षरीत्या निवड करण्यात यावी. १९६२पासून ही तरतूद महाराष्ट्रात आहे. १९९२ च्या दुरुस्तीनुसार १७.५०० लोकसंख्येचा 'गण' आणि ३५,००० लोकसंख्येचा 'गट' यांच्याद्वारे अनुक्रमेपंचायत समिती जिल्हा परिषदेच्या प्रत्येकी एका सदस्याची निवड करण्यातच येते.

**४) पदसिद्ध प्रतिनिधी** - महाराष्ट्रात राज्य विधिमंडळाने ग्रामपंचायतींच्या सरपंचांना पंचायतसमितीचे आणि पंचायत समित्यांच्या सभापतींना जिल्हा परिषदेचे पदसिद्ध प्रतिनिधित्व देण्यासंबंधीच्या तरतुदी करण्याचे निर्देश राज्य विधिमंडळांना देण्यात आले आहेत.महाराष्ट्रात १९६३ पासून सरपंच मतदारसंघातून पंचायत समितीचे दोन सदस्य निवडले जात असे आणि सर्व पंचायत समित्यांचे सदस्य जिल्हा परिषदेचे पदसिद्ध सदस्य देण्यासंबंधी तरतूद महाराष्ट्र राज्य विधिमंडळाने स्वीकारलेली नाही. आमदार व खासदारांना पंचायती राज संस्थांपासून वगळण्याची तरतूद १९६२पासून महाराष्ट्रात अस्तित्वात आहे. त्यात बदल करण्यात आलेला नाही. स्थानिक नेतृत्वाला वाव देण्यासाठी संबंधित तरतूद केलेली आहे.

**५) पदाधिकाऱ्यांची निवड** - महाराष्ट्रात १९६२ पासून ग्रामपंचायतींच्या सरपंचांची, पंचायत समितीच्या सभापतींची व जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांची निवड करण्यासंबंधी नियम राज्य विधीमंडळाने करावे. मात्र निर्वाचित सदस्यांतूनच पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात यावी.

**६) आरक्षित जागांसंबंधी तरतूद** - अनुच्छेद २४३ (डी) मध्ये निर्वाचित जागांमध्ये अनुसूचित

जाती व जमाती आणि महिलांसाठी आरक्षित जागांसंबंधीच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. अनुसूचित जाती जमातीसाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जागा आरक्षित असाव्यात. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी आरक्षित असलेल्या जागांपैकी एक तृतीयांश जागा त्या गटातील महिलांसाठी राखीव असाव्यात. राखीव असलेले मतदार संघ चक्राकार पद्धतीने निर्धारित करावेत. महाराष्ट्रात १९७४ सालच्या दुरुस्तीनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला, इतर मागासवर्गीय आणि सर्वसामान्य सदस्य अशा पाच वर्गासाठी अधिकारपदाचे चक्राकार पद्धतीने वाटप करण्यात येते.

**७) पंचायती संस्थांचा कार्यकाल** - अनुच्छेद २४३ (आ) प्रमाणे तिन्ही स्तरांवरील संस्थांचा सामान्य कार्यकाल पाच वर्षांचा असेल अशी तरतुद करण्यात आली आहे. पाच वर्षांचा कार्यकाल पूर्ण होण्याआधी आगामी संस्थांच्या निवडनूका आयोजित करणे राज्य शासनास बंधनकारक असेल. कोणत्याही परिस्थितीत पंचायती संस्थांना मुदतवाढ देता येणार नाही. काही कारणास्तव पंचायत बरखास्त झाली तर त्यांचे पुनर्गठन सहा महिन्यांच्या आत करणे राज्य शासनास बंधनकारक असेल.

**८) पंचायती संस्थांचे अधिकार व कार्ये** - अनुच्छेद २४३ (प) मध्ये पंचायती संस्थांचे अधिकार, कार्ये आणि जबाबदाऱ्या या संबंधी तरतुदी केल्या आहेत. आर्थिक व सामाजिक न्यायासाठी योजना तयार करणे आणि अकराव्या परिशिष्टात समाविष्ट बाबी पंचायत संस्थांकडे सोपविणे बंधनकारक असेल. मुंबई ग्रामपंचायत

अधिनियम १९५८ व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ अन्वये अनेक व्यापक अधिकार पंचायत राज संस्थांना देण्यात आले आहेत

**९)आर्थिक उत्पन्नाची साधने** - अनुच्छेद २४३ मध्ये पंचायत संस्थांच्या उत्पन्नाच्या साधनांसंबंधीच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. पंचायतींना राज्य विधिमंडळ कायदा करून कर, जकाती पथकर, इत्यादी लादण्याचा वसूल करण्याचा अधिकार असेल.

**१०) राज्य वित्त आयोग** - अनुच्छेद २४३ (क्ष) मध्ये वित्त आयोगाच्या गठनसंबंधीच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्यानुसार १९९२ च्या ७३ व्या दुरुस्ती कायद्याच्या अंमलबजावणीपासून एक वर्षाच्या आत आणि त्यानंतर प्रत्येक पाचवे वर्ष संपल्यावर पंचायतीच्या आर्थिक स्थितीचे परीक्षण करून राज्यपालांना वित्तविषयी शिफारसी करण्यासाठी राज्यपाल वित्त आयोगाची स्थापना करतील.

**११) लेखा परीक्षण** - अनुच्छेद २४३ (जे) मध्ये पंचायती संस्थांच्या लेखा परीक्षणासंबंधी तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्यानुसार पंचायतींनी आपले हिशेब ठेवावेत व त्यांचेहलेखा परीक्षण व्हावे यासाठीविधिमंडळ कायदा करून तरतूद करेल. या तरतुदीतीलआवश्यक त्या दुरुस्त्या १९६१ च्या कायद्यात करण्यात आल्या आहेत.

**१२) निवडणूक आयोग** - १९९२च्या घटना दुरुस्तीतील सर्वात महत्त्वपूर्ण तरतूद राज्य निवडणूक आयोगाच्या गठनसंबंधी आहे. महाराष्ट्र शासनाने १९९४ साली राज्य निवडणूक आयोगाचे गठन केले.

munotes.in

## २.४ सारांश

महाराष्ट्र राज्य सरकारने महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम ९६१ करून देशात महाराष्ट्राचे पंचायत राज वेगळे आहे हे सिद्ध करून दाखविले. देशातील काही राज्यांनी द्विस्तरीय पंचायत राज स्विकारले. पंचायत समित्यांना मुख्य अधिकार दिले. अशोक मेहता समितीने १९७७ साली शिफारस केली होती. परंतू महाराष्ट्र राज्याने मात्र जिल्हा परिषदेलाच प्रमुख स्थान दिले.संपूर्ण पंचायत राजचा विशेषतः जिल्हा परिषद आणि पंचायत समितीचा कारभार सूत्रबद्ध रीतीने चालावा याकरिता या कायदयाची रचना महत्त्वाची आहे. कायदा २६ भागांत विभागण्यात आला आहे.

देशात १९९२ साली ७३ वे घटना दुरुस्ती विधेयक आले. या विधेयकाने जिल्हापरिषद आणि पचांयत समिती कायद्यातील जवळपास सर्वच तरतुदी स्वीकारून त्या तरतुदी संपूर्ण देशासाठी लागू करण्यात आल्या.७३व्या घटनादुरुस्तीमुळे पंचायती राज संस्था भारतीय संविधानाचा भाग बनल्या आहेत यात शंका

## २.५ स्वाध्याय

१) जिल्हा परिषद आणि पंचायत समिती कायद्याची रचना थोडक्यात स्पष्ट करा.

२) ७३व्या घटना दुरुस्तीची संकल्पना व स्वरूप स्पष्ट करा.

३) पंचायत समित्यांच्या रचनेसंबंधीच्या कलमांची माहिती लिहा.

४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे महत्त्व सांगा.

५) ७३व्या घटना दुरुस्तीची प्रमुख वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

६) **टिपा लिहा**

१)कार्यकारी अधिकारी

२) स्थायी समिती आणि विषय समित्या

३) बांधकामे आणि विकास परियोजना पार पाडणे व त्या सुस्थितीत ठेवणे.

## २.६ संदर्भग्रंथ

१) प्रा. बंग के. आर. - भारतातील स्थानिक स्वशासन , विशेष संदर्भ - महाराष्ट्र राज्य, श्रीमंगेश प्रकाशन - नागपूर -२००५

२) पाटील बी.बी. - भारतीय शासन आणि राजकारण , फडके प्रकाशन, कोल्हापूर-२००६

३) पाटील वा. भा.- पंचायत राज

४) पाटील व्ही.बी.- महाराष्ट्रातील पंचायत राज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था - के. सागर पब्लिकेशन्स, पुणे - २००६



munotes.in

५) पवार जे. ई. यादव चंद्रशेखर -- पंचायत राज संस्थांचे प्रशासकीय व आर्थिक व्यवस्थापन, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे - ०७

६) कुलकर्णी अ.ना. - भारतातील स्थानिक स्वशासन, विद्या प्रकाशन नागपूर – फेब्रुवारी२०००

७) कानेटकर मेधा - भारतीय नियोजनाची पन्नास वर्षे , श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर २००७

८) चौधरी दत्तात्रेय हरी चौधरी अशोक दत्तात्रेय, चौधरी राजेश अशोक, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८, चौधरी लॉ. पब्लिकेशन्स जळगाव- २०११

९) महाराष्ट्र शासन विधि व न्याय विभाग - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१, शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद-२००७

१०) डॉ. जैन अशोक व्ही, डॉ. पवार दत्तात्रेय व्ही. - ग्रामीण शासन आणि राजकारण, प्राध्यापक कीर्ती महाविद्यालय, दादर

❖❖❖❖

munotes.in

# ३

## जमीन सुधारणा कायदे-I

**घटक रचना**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ संकल्पना

३.३ भारतील जमीन धारणा स्वरूप

३.४ भारतात जमीन सुधारणा करण्याची गरज

३.५ जमीन सुधारणेचे स्वरूप

३.६ जमीन सुधारणा कायदे

३.६.१ कमाल जमीन धारणा कायदा १९६१

३.६.२ उद्दिष्टे

३.६.३ जमीनीवरील कमाल मर्यादेचे स्वरूप

३.६.४ हस्तांतर व संपादनावर निबंध

३.६.५ अतिरिक्त जमीन तरवणे

३.६.६ भरपाई देणे

३.६.७ अधिक जमीनीची वाटणी

३.६.८ अपील लेखन दोष दुरुस्ती आणि पूननिरीक्षण

३.६.९ या कायद्यातून वगळलेल्या जमीनी

३.६.१० कायद्यातील पळवाटा

३.६.११ कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिफारशी

३.७ सारांश

३.८ स्वाध्याय

## ३.० उदिष्टे

१) शेतकऱ्याच्या जीवनातील जमीनीचे महत्त्व अभ्यासणे.

२) स्वातंत्र्यपूर्व काळातील जमीनधारणेच्या स्वरूपाची माहिती घेणे,

३) जमीन सुधारणा कायद्याची गरज अभ्यासगे.

४) जमीन सुधारणा करताना कायद्याचे महत्व अभ्यासणे,

५) जमीन सुधारणा कायद्याचे स्वरूप समजून घेणे

६) जमीन सुधारणा कायद्यामुळे शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांना झालेल्या लाभाचाअभ्यास करणे

७) जमीन सुधारणेच्या माध्यमातून ग्रामीण भागात सामाजिक न्याय व समता प्रत्यापित होण्यास कितपत सहाव्य झाले आहे त्याचा अभ्यास करणे,

८) कमाल जमीन धारणा कायदा १९६१ चे स्वरूप समजून घेणे,

## ३.१ प्रस्तावना

'जमीन हा मानवाच्या जीवनातला आणि जगण्यातला वैशिष्टपूर्ण असा घटक आहे. मानवाच्या उत्पत्तीच्या प्राथमिक काळात त्याचे जीवन प्रगल्म नकते. या काळात त्याला आपला उदरनिर्वाह महत्वाचा वाटत होता. सतत भटकंती हे त्याच्या जीवनाचे वैशिष्टय होते.

मानवी जीवनात जसजशी प्रगल्भता येऊ लागली तशी मानवाला आपल्या अस्तित्वाची जाणीव व्हायला लागली. आपला स्वतंत्र निवारा असावा. त्याच्या आजूबाजूला थोडीफार जमीन असावी, त्या जमीनीतून उदरनिर्वाहासाठी काही उत्पादन मिळावे असे त्याला वाटू लागले, त्यातून हळूहळू 'हक्क' या संकल्पनेला मूर्तरूप यायला लागले. मनुष्य एकाजागी स्थिरावल्यानंतर त्याने ज्या जमीनीवर कब्जा केला होता, त्या जमीनीवर स्वतःची मालकी प्रस्थापित करू लागला.

पुढे मानवाच्या टोळ्या उदयास आल्या. टोळ्या एकमेकांवर हल्ला करीत. हल्ल्यात जी टोळी जिंकेल ती टोळी हरलेल्या टोळीला मांडलिक बनवत होती. यातून राजेशाहीचा उदय झाला. राजेशाहीच्या उदयानंतर सर्व जमीन राजाच्या मालकीची करण्यात आली.

राजाने आपल्या प्रजेला जमीन कसाक्यास द्यायची. त्या जमीनीकरिता पाण्याची व्यवस्था करायची त्यातून येणाऱ्या उत्पन्नाचा काही हिस्सा रयत राजाला देत होती. रयत अथवा जनता राजाची प्रत्यक्षा कुळे होती.

पुढे इंग्रज काळात कायदे अधिक कडक करण्यात आले. इंग्रजांनी महसूल गोळा करण्यासाठी मध्यस्यांची नियुक्ती केली. या मध्यस्थांकडून रयतेथी प्रचंड पिळवणूक हायला लागली. इंग्रज काळात लॉर्ड कॉनवालिसने कायमधारा पद्धती सुरू करून रयतेला आणखी

समस्येत टाकण्याचे काम केले. मध्यस्थांमधून जमीनदारी पद्धती उदयास आली. जमीनदारी पद्धतीत कुळाकडून अन्यायकारक खंड बसवून रयतेच्या पिळवणुकीला सुरुवात झाली. जमीनदार कुळाकडून जो खंड वसूल करीत तो संठ १/२ ते ३/४ इतका होता, अशा प्रकारे कुळ जमीनदारांवर अवलंबून असत. त्यांना जमीनीबाबत हक्क नव्हते. तसेच इतर शेतकऱ्यांवरही जमीनदारांचा हक्क चालत होता.

अशाप्रकारे जमीनदारी आणि रयतवारी पद्धतीत कुळावर अन्याय झाला, त्यातही प्रतिवर्षी मुलांना जमीन कसण्याची हमी मिळेल याची शाश्वती नव्हती. कुळांचे अस्तित्व मालकाच्या लहरीवर अवलंबून होते. कुळांना स्वैर्य नहते यामुळे मानवी संबंधात उत्तरोत्तर बिघाड होत गेला. यात ब्रिटिश सत्तेने फार मोठी ढवळाढवळ केली.दुसऱ्या बाजूने ग्रामोद्योगाचां-हास झाला. शेतीशिवाय पर्याय राहिला नसल्यामुळे शेतीवरील भार वाढला. पिळवणूक वाढली. समाज देशोधडीला लागला. कर्जबाजारीपणा वाढला, सावकारांना, तारण ठेवलेल्या जमीनी काढून घेण्याचे प्रभावी कारण मिळाले. ग्रामीण भागातील ४ टक्के कुटुंबांच्या हातात एकूण जमीनीपैकी ५० टक्के जमीन गेली.

म्हणून स्वातंत्र्योत्तर काळात सरकारचे प्रथम काम जमीन सुधारणा हे होते. शेतीत मानवी संबंधाची फेरविभागणी करणे महत्वाचे होते. कुळांना संरक्षण देण्याची गरज भासू लागली, यासाठी जमीन सुधारणा कायदे करणे महत्वाचे होते. पहिल्या पंचवार्षिक योजनेत जमीन सुधारणेवर भर देण्यात आला.

## ३.२ संकल्पना

भू-धारनेच्या मालकी हक्का विरोधातझालेले बिघाड कमी करण्यासाठी देशात स्वातंत्र्यानंतर भू-सुधारणेचा प्रयत्न करण्यात आला. यासाठी विशेष निकष ठरविण्यात आले.भूधारकांच्या मालकी हक्काच्या पुनःस्थापनेसाठी आणि जमीनीच्या न्याय्य वाटपासाठी व सामाजिक आर्थिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी सुधारणेचा प्रयत्न होता. या प्रयत्नांना कायद्याचा आधार देणे गरजेचे होते. म्हणून स्वातंत्र्योत्तर काळात सरकारने भू-सुधारणेसाठी विविध स्वरूपाचे कायदे केले. अशा प्रकारे भू-सुधारणेची संकल्पना देशात राबविण्यात आली,

भारतात जमीन हाच असंख्य लोकांच्या जगण्याचा मार्ग आहे. जमीनीच्या वाटपात ऐतिहासिक काळापासून मोठी विषमता राहिली. इंग्रज सरकारने या विषम विभागणीस अधिक चालना देऊन जमीनदारांचा मध्यस्थ वर्ग निर्माण केला. यामुळे गरीब रयतेकडे कसण्यासाठी जी थोडीफार जमीन होती तीही सावकार आणि जमीनदारांनी वेगवेगळ्या क्लृप्त्या करून त्यांच्याकडून हडप केली. त्यामुळे रयतेच्या जगण्याचा आधार

काढून घेतल्यासारखा झाला. यामुळे दारिद्रय आणि आर्थिक विषमतेला मोठी चालना मिळाली. मानवी संबंधात यामुळे बिघाड झाला.

munotes.in

## ३.३ भारतील जमीन धारणा स्वरूप

### ३.३.१ महलवारी पद्धती

या पद्धतीत गावातील शेतजमीन संपूर्ण ग्रामीण समाजाच्या संयुक्त मालकीची असे. या समाजाचे सभासद सरकारला शेतसारा द्यायला संयुक्तरीत्या आणि व्यक्तीशः बांधील असत. सरकारी व्यवहार करण्यासाठी हे हिश्शेदार भूपती आपल्यापैकी एकाला प्रतिनिधी नेमत,शेतसारा साधारणपणे ३० ते ४० वर्षासाठी ठरविला जात असे. त्यात कालावधीनंतर बदलकरण्यात येई. ही पद्धती पंजाब, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशच्या काही भागात प्रचलित होती.

### ३.३.२ रयतवारी पद्धती

**रय**तवारी पद्धतीत जमीनीची मालकी कसणाऱ्याची असे. जमीनीचा मालक सरकारला सारा देण्यास बांधील असे. जमीन खंडाने देणे, विकणे व गहाण ठेवण्याचा अधिकार त्याला असे. स्वतःची जमीन असल्यामुळे तो अधिकचांगली शेती करू शकत असे,किंवा कुळांना कसण्यासदेऊ शकत असे.

### ३.३.३ जमीनदारी पद्धती

इंग्रजांनी महसुलाच्या वसुलीकरिता ते मध्यस्य निर्माण केले, त्यातून जमीनदारी पद्धती अधिक दृढ होण्यास मदत झाली. जमीनदार आपल्याकडील जमीन कुळांना कसावयास देत.त्यांच्याकडून वर्षांकाठी खंड वसूल करीत. कुळे संपूर्णतः जमीनदारांवर अवलंबून असत. कुळांना जमीन मालकीविषयक कोणतेही अधिकार नहते. कुळाना प्रतिवर्षी जमीन कसावयास मिळेलयाची शाश्वती नहती. कुळांचे अस्तित्व जमीनदारांच्या लहरीवर अवलंबून होते. जमीनदार कुळाकडून प्रतिवर्षी १/२ ते ३/४ इतका खंड वसूल करीत. पाऊस पडो अगर न पडो, कुळांना उत्पादन मिळो अगर न मिळो. जमीनदारांना संड मात्र वेळच्या वेळी देणे भाग होते. जमीनदारी पद्धतीत कुळांची अतोनात पिळवणूक झाली. मुख्यता बंगाल, बिहार, ओरिसा, उत्तर प्रदेश या राज्यात जमीनदारी पद्धती अस्तित्वात होती.

## ३.४ भारतात जमीन सुधारणा करण्याची गरज

भूधारणेच्या विषम वितरणामुळे मानवी संबंधात झालेला बिघाड सुधारणेसाठी देशात भूसुधारणा करण्याची गरज प्रामुख्याने निर्माण झाली.

### ३.४.१ शेतजमीनीचे न्याय्यवाटप करण्यासाठी

शेतजमीनीच्या झालेल्या विषम वितरणामुळे देशात बेकारी आणि गरिबीची समस्या अधिक क्षीणझाली होती. ग्रामोद्योगाचा हास झाल्यामुळे जमीनीवरील लोकसंख्येचा भार वाढला होता. लोकांना जमीन कसणे हा जगण्याचा एकमेव पर्याय राहिला. देशात जमीनदारी पद्धतीमुळे जमीनीचे विषम वितरण झाले. ही समस्या कमी करून जमीनीची मालकी जास्तीत जास्तनागरिकांना मिळावी हा मुख्य हेतू होता. जमीनीचे न्याय्य वाटप जमीन सुधारनेच्या माध्यमातूनकरण्याचा शासनाचा उद्देश होता.

**३.४.२ आधिक समता आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करणे**: देशातील दारिद्रय आणि बेकारी कमी करायची असेल, तर देशातील जनतेला पर्याप्तउत्पन्नाचे साधन उपलब्ध व्हायला हवे. स्वातंत्र्योत्तर काळात ही बाब प्राधान्यक्रमाने सरकारसमोर होती. जमीनीच्या फेरवाटपातून देशात आर्थिक समता गाठता येईल आणि यातून सामाजिक न्याय प्रस्थापित करणे शक्य होईल, अशी अपेक्षा होती.

### ३.४.३ मध्यस्थाचे उच्चाटन करणे

देशात इंग्रजांनी आपल्या राज्यकारभाराच्या काळात महत्वाची बाब केली ती म्हणजे जमीनीचा सारा वसूल करण्यासाठी मध्यस्थ नेमले. या मध्यस्थामुळे रयतेची फार मोठी फसवणूक झाली. स्वातंत्र्योत्तरकाळात मध्यस्थांचे उच्चाटन करून शेतकरी आणि सरकार यांच्यात प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करणे महत्त्वाचे झाले.

### ३.४.४ भूमिहिनांना जमीन मिळवून देणे,

देशात ४ टक्के भूचारकांकडे ५० टक्के जमीन आणि ९६ टक्के भूधारकांकडे ५० टक्के जमीन अशी विषम विभागणी झाल्यामुळे असंख्य कुटुंब ही भूमिहीन आली होती. त्यांना जगण्याचे हक्काचे साधन मिळवून देणे गरजेचे होते. भूसुधारणा करून अतिरिक्त होणारी जमीन काढून घेऊन त्या जमीनीची मालकी भूमिहिनांना देण्यासाठी जमीन सुधारणा करणे गरजेचेहोते.

### ३.४.५ निश्चितीकरण

जमीनदार रयतेला जमीन कसायला देत आणि रयतेजवळून खंड वसूल करत. हा खंड मनमानी असायचा. खंड किती घ्यावा

यावर बंधन नव्हते. १/२ ते ३/४ इतका खंड वसूल केला जात असे. पाऊस पडो अगर न पड़ो कुळांना खंड मात्र भरावाच लागे.या खंडाचे निश्चितीकरण करून खंड न्याय्य स्वरूपाचा असावा अशा स्वरूपाचे शासनाचे धोरणहोते. म्हणून स्वातंत्र्योत्तर काळात भूसुधारणेत खंड निश्चितीकरण हा एक महत्त्वाचा भाग होता,साधारणपणे १/८ इतका खंड निश्चित करण्यात आला.

### ३.४.६ कुळांना जमीनीचा हक्क मिळवून देणे,

कुळे अनेक वर्ष जमीन कसत होती. परंतु त्यांना जमीन मालकीचे कोणतेही हक्क नव्हते. केवळ जमीन कसायची आणि मालकाला खंड द्यायचा. यामुळे कुळांना जमीनीच्या मशागतीत स्वारस्य नसायचे, उत्पादनावरही याचा परिणाम झाला होता, म्हणून जमीन सुधारणेचा महत्त्वाचा भाग कुळांना संरक्षण देणे हा होता. शासनाने कुळांना जमीनीचा मालकी हक्कदेण्यासाठी १९४८ साली कूळकायदा संमतकेला. “कसेल त्याची जमीन” हा या कायद्या महत्वाचा भाग होता. या कायद्यामुळे हजारो कुळांना जमीनीची मालकी मिळाली.

**३.४.७ भूधारणेवर कमाल मर्यादा घालणे.**

जमीनीच्या वाटपात विषमता असल्यामुळे काही, जमीनमालकांकडे मर्यादेपेक्षा जास्त जमीन होती. ही जमीन वाटपातील विषमता कमी करण्यासाठी भूधारणेवर कमाल मर्यादा घालणे गरजेचे होते. एका व्यक्तीकडे जिरायत आणि बागायत जमीन किती असावी हे निश्चितकरणे गरजेचे होते. वेगवेगळ्या राज्यांनी त्या त्या राज्यातील सामाजिक, राजकीय परिस्थितीनुसार अशा स्वरूपाचे कायदे करून भूधारणेवर कमाल मर्यादा घातली. महाराष्ट्रात बागायत व जिरायत जमीन १८ ते ५४ एकर असावी, असा कायदा करण्यात आला,

**३.४.८ तुकडे जोड आणि** तुकडेबंदी**करणे:** देशातील वारसा हक्काच्या कायद्यामुळे वडिलांच्या पश्चात जमीनीची मालकी मुलांची कडेजाते. वडिलांना जितकी मुले असतील तेवढे जमीनीच्या सुपीकतेनुसार तुकडे पडतात. यामुळे जमीनीचा आकार लहान होतो. शेतीत आधुनिक साधनांचा वापर करण्यास अडथळा देतो. म्हणून तुकडेजोड आणि तुकडेबंदी करण्याची गरज होती.

**३.४.९ वारसा हक्काचे नियमन करणे:**वारसा हक्काचे नियमन करणे, हा जमीन सुधारणेचा हा एक महत्वाचा भाग होता. वडिलांच्या पश्चात मुलांच्यात होणा-या संपत्तीच्या वाटपाबाबत ज्या मुलांना नोकरी अथवा व्यवसाय आहे त्यांनी जमीनीच्या मालकी हक्कापासून परावृत्त व्हावे असा हा विचार होता. तसेच जमीनीवरील भार कमी करण्यासाठी नागरिकांना नोकरी व्यवसायाकडे वळवल्यास जमीनीवरील मालकी हक्काकडे दुर्लक्ष करतील असा विचार होता.

**३.४.१० अन्नधान्याच्या उत्पादनात पुरेशी वाढ घडवून आणणे:**स्वातंत्र्योत्तर काळात वैद्यकीय सोयींच्या सुधारणेमुळे मानवी मृत्युदर कमी-कमी व्हायला लागला यामुळे लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत होती. वाढत्या लोकसंख्येला अन्नधान्य पुरविणे गरजेचे होते. याकरिता शेतीत सुधारणा होणे, संशोधन होणे गरजेचे होते. शेतीत झालेल्या संशोधनाचा योग्य वापर शेतकरी वर्गाकडून व्हावा यासाठी जमीनीच्या मालकी हक्काचे नियमन होणे गरजेचे होते. जमीनीच्या मालकीचे निश्चितीकरण होणे गरजेचे होते.

## ३.५ जमीन सुधारणेचे स्वरूप



**ppmsindiablog.spot.com**

### ३.५.१ शेतीतील सर्व तहेचे मध्यस्थ नष्ट करणे (जमीनदारी पद्धतीचे निर्मूलन)

या पद्धतीची सुरुवात केव्हा झाली हे सांगणे कठीण आहे. प्राचीन ग्रंथात राज्याचा वाटा एकूण उत्पन्नाच्या १/६ इतका असावा असा उल्लेख आढळतो. हिंदू, मुसलमान राजांनी शेतसाऱ्याचे प्रमाण ठरवून दिले होते. त्यानंतर अंदाधुंदीच्या काळात सावकार आणि श्रीमंतवर्गाने गरिबांकडून जमीनी विकत घेऊन स्वताला जमीनीचे मालक म्हणून स्थान प्रस्थापित केले.ब्रिटिशांच्या भारतात येण्यापूर्वी जमीनदार वर्ग अस्तित्वात होता. लॉर्ड कॉर्नवालिसने कायमधारा पद्धती अस्तित्वात आणून जमीनदारांना सुरक्षितता दिली. यातून जमीनदार, जहागीरदार, तालेवार इत्यादी, वर्ग निर्माण झाले. भारतीय शेतीच्या दुर्दशेला येथूनच सुरुवात झाली. शेती सुधारणेकडे जमीन मालकांचे अजिबात लक्ष राहिले नाही.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या समस्येचा दिर्घ विचार करण्यात आला. जमीनदारी पद्धती उच्चाटनाशिवायगत्यंतर नाही, असा निकर्ष काढण्यात आला. पहिल्या पंचवार्षिक योजनेत असा स्पष्ट उल्लेख आहे की, जमीन मालकीचा प्रश्न हा राष्ट्रीय विकासातील मूलभूत असा प्रश्न आहे. हा प्रश्न ज्या पद्धतीने सोडवला जाईल त्या पद्धतीचा देशाच्या आर्थिक विकासावर फार मोठा प्रभाव पडणार आहे.

देशात जवळजवळ सर्वच राज्यांत जमीनदारी पद्धतीच्या निर्मूलनाचे कायदे करण्यात आले. यामुळे वीस लक्ष कुळांना जमीनीची मालकी मिळाली. सरकार व जमीन कसणारे शेतकरी यांचे प्रत्यक्षा संबंध प्रस्थापित झाले. जमीनदारांना नुकसान भरपाई देण्यात आली. शेती कसण्याच्या उद्देशाने मर्यादित प्रमाणात जमीन राखून ठेवण्याचा हक्क देण्यात आला. सरकारनेघेतलेल्या जमीनीचा खंड निश्चित करण्यात आला.

गुजरात, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, राजस्थानमधील ज्या कुळानी रुपयांमधे नुकसान भरपाई जमीन मालकांना दिली आहे, ती कुळे जमीन मालक झाली आहेत. जमीनदारी नष्ट करण्याचा प्रयोग खरोखरच क्रांतिकारक आहे. जमीनदारी पद्धती नष्ट करण्याबरोबरच शेतीविकासासाशी निरनिराळ्या सुधारणा करणे तितकेच गरजेचे होते. शासनाने त्यादृष्टीनेही पाऊल उचलण्याचा प्रयत्न केला.

### ब) ३.५.२ कूळ कायदे

जमीनदार स्वत: जमीन न कसता कुळाकडून जमीनीची मशागत करून घेत. विशेषत:रयतवारी पद्धतीमध्ये ही स्थिती आढळते त्यामुळे कुळाच्या सुरक्षिततेसंबंधी जमीन मालकांना यावयाच्या खंडासंबंधी आणि कुळांना जमीनविषयक हक्क मिळण्यासंबंधी विचार करणे अगत्याचे होते. कुळांच्या हितसंबंधाचा विचार ब्रिटिशांच्या काळात झाला नाही. पण १९३० मध्ये प्रांतिक स्वायत्तता मंडळाने या विचारांना वेग दिला,

स्वातंत्र्योत्तर काळात मात्र कुळांचे हितसंबंध राखण्यासाठी निरनिराळ्या राज्यात कुळकायदे पासकरण्यात आले. या कायद्याचे स्वरूप पुढीलप्रमाणे होते.

१) कुळांच्या हक्काचे संरक्षण करणे.

२) जमीन मालकांना देण्यात येणा-या खंडाचेनिश्चितीकरणकरणे.

३) कुळांना जमीनविषयक मालकी हक्क मिळवून देणे.

अशी पद्धतीने महाराष्ट्रात एकूण उत्पन्नाच्या १/६ इतका खंड निश्चित करण्यात आला. कुळांना विशिष्ट मुदतीपर्यंत काढून टाकता येणार नाही. महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, इत्यादी. राज्यात दहा वर्षे मुदत ठरविण्यात आली. तसेच महाराष्ट्र, आंध्रप्रदेश राज्यात न्यायालयाकडून जमीनीची किंमत ठरविली जाते. कसेल त्याची जमीन असा कायदा महाराष्ट्रातझाल्यामुळे कुळांना जमीन मालक होण्याची संधी लाभली आहे. असे असले तरी कुळकायद्यात पळवाटा राहिल्या आहेत. मात्र कूळ जमीनीचे मालक झाल्याने आत्मीयतेने शेती करण्याची परिस्थिती निर्माण झाली.

### ३.५.३ जमीन धारणेवर कमाल मर्यादा

जमीन सुधारणेच्या कार्यक्रमात परिणामांच्या दृष्टीने अत्यंत दूरगामी महत्त्वाचा कार्यक्रम म्हणजे जमीन धारणेवरील कमाल मर्यादा. महाराष्ट्रात हा कायदा २६ जानेवारी १९५२ पासून अमलात आला. प्रत्येक व्यक्तीनेस्वत:जवळ जास्तीत जास्त किती जमीन ठेवायची याबाबत कायद्याने मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. ठराविक मर्यादेपेक्षा एखाद्या जमीनधारकाकडेजास्त जमीन असेल, तर ती सरकारकडून काढून घेण्याची तरतूद करण्यात आली. काढून घेतलेल्या जमीनीचे भूमिहिनांना वाटप केले जाते.बहुतेक सर्व राज्यांमधेहा कायदा करण्यात आला. आसाम ५० एकर, आँच प्रदेश २० ते २३४ एकर, विहार २० ते ६० एकर, केरळ ५ ते २० एकर, महाराष्ट्र १८ ते ४ एकर (७.१८ ते २५.८५ हेक्टर), इत्यादी.

यामध्ये लोकर व्यवसायासाठी असलेली जमीन, साखर कारखान्याकडील ऊस गाळपजमीन, आधुनिक पद्धतीने कसली जाणारी मोठ्या आकाराची जमीन यातून वगळण्यात आली आहे.

**हा कायदा करण्याचे कारण**

१) ग्रामीण भागात जमीन हे उत्पन्नाचे साधन आहे. ही जमीन काही थोड्या लोकांच्या ताब्यात आहे. या विधेयकान्वये भूमिहिनांना **जमीन** मिळेल व दोन वर्गातील आर्थिक असमानता कमी होईल.

२) भूमिहिनांना जमीन मिळाल्यामुळे ते अत्यंत आत्मीयतेने शेती करतील.

३) एकाच व्यक्तीकडे भरपूर जमीन असल्यास त्या जमीनीची मशागत योग्य प्रकारे होऊ शकेल. यामुळे जमीनीचे वाटप झाल्यास उत्पादन वाढण्यास मदत होईल.

४) ज्या व्यक्तीकडेमुळातजमीन कमी आहे. त्यांना अधिकजमीन उपलब्ध करुन दिल्यास त्या व्यक्तीचा आर्थिक प्रश्न पूर्णत: सुटेल.

### ३.५.४ तुकडेवारीला प्रतिबंध करणे

हा अधिनियम १९५८ ला करण्यात आला. जमीनीचे तुकडे झाल्यामुळे शेती करणे परवडत नाही. ती तोट्याची होते. शेती विकासाला खीळ बसते. शेती विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी शेती उत्पादनात सुधारणा करून व ते वाढवावे हा प्रमुख उद्देश समोर ठेवून हा कायदा करण्यात आला आहे.

**यामध्ये दोन महत्त्वाचे भाग होते.**

१) आर्थिकदृष्ट्या परवडणार नाहीत असे आणखी शेतीचे **तुकडे**करण्यास प्रतिबंध करणे.

२) राज्यभरातील जमीनीच्या तुकडयांचे एकत्रीकरण करणे हा कायद्यामागील हेतू आहे.

वेगवेगळ्या व्यतींनी धारण केलेली गावातील जमीन एकत्र करून जमीनीचा जास्तीत जास्त उपयोग होईल अशा रीतीने योजना तयार करून, व्यक्तीमध्ये या जमीनीचे फेरवाटप करणे हा या कायद्याचा हेतू आहे.

### ३.५.५ सहकारी शेतीचा सक्रिय पुरस्कार

महात्मागांधीनी १९४२ साली सहकारी शेतीचा स्वीकार केल्याशिवाय पूर्ण फायदा मिळणार नाही, या विचारावर भर दिला होता. यापूर्वी कांग्रेस सुधार समितीने सहकारी शेतीचा पुरस्कार केला होता. पण हा प्रयोग अयशस्वी ठरला. कारण देशात मानवाच्या आर्थिकप्रगतीमध्ये जमीन हा महत्त्वाचा मार्ग आहे. त्यामुळे आपली जमीन दुसऱ्याला द्यायला सहसाकोण तयार होणार नाही. १९८४-८५ साली देशात सहकारी शेतीखाली केवळ ०.२ टक्के जमीनहोती.महाराष्ट्रात सांगली जिल्ह्यात म्हसाळ या खेडयात सहकारी शेतीचा प्रयोग मधुकर देवलयांनी यशस्वी केला होता. हा एकमेव अपवाद होता. परंतु त्यांच्या पश्चात हा प्रयोग अपयशी ठरलेला आहे. मात्र शेतकऱ्यांच्या खरेदी-विक्री, दूध डेअरी, सहकारी साखर कारखाने इत्यादी क्षेत्रात सहकारी संस्था यशस्वी ठरल्या आहेत.

## ३.६ जमीन सुधारणा कायदे

देशात झालेल्या जमीन सुधारणा कायद्याचे स्वरूप पुदीलामाणे आहे.

### ३.६.१ कमाल जमीन धारणा कायदा १९६१

स्वातंत्र्योत्तर काळात जमीन सुधारणा करताना जमीन धारणेची कमाल मर्यादा ठरवून ज्या व्यक्तीकडे प्रमाणापेक्षा जास्त जमीन आहे ती काढून घेऊन त्याचे वाटप भूमिहीन आणि गरिबांना करण्याचे शासनाचे धोरण होते. शेतजमीनीवर लोकसंख्येचा प्रचंड भार, शेती व्यवसायातून बिनशेती व्यवसायात जाण्यासाठी असलेल्या संपत्ती अभाव, रोजगाराच्या सोयीचाअभाव, वाढती लोकसंख्या आणि त्याचरोबर धान्योत्पादन वाढविण्याची गरज या सर्व घटकांचाएकत्रित विचार करून शासनाने कमाल जमीनधारणा कायदा करण्याचे निश्चित केले. देशात वेगवेगळ्या राज्यांतून जमीन धारणेवर कमाल मर्यादा दोन टप्यांत घालण्यात आल्या. उदा. **१९६० ते १९७२ पहिला टप्पा** आणि **१९७२ नंतर दुसरा टप्पा**.

महाराष्ट्र राज्यात पहिल्या टप्यात जमीनधारणा १८ से १० एकर ठरविण्यात आली होती. हेक्षेत्र प्रथम दर माणशी होते. हे प्रमाण खूप होत होते. दुसऱ्या टप्प्यात हे प्रमाण १८ ते ५४ एकरठरविण्यात आले. कमाल जमीनधारणा कायद्यातून काही जमीनी वगळण्यात आल्या आहेत.कुटुंब हा निकष निश्चित करून जमीन धारणेवर १९७२च्या दुसऱ्या टप्यात मर्यादा घालण्यातआली. अशा प्रकारे देशात हा एक भूसुधारणेतील महत्वाचा कायदा करण्यात आला.

### ३.६.२ उदेश

जमीन धारणेवर कमाल मर्यादा घालून कुटुंब हा निकष निश्चित करून एका कुटुंबाच्या निर्वाहासाठी जास्तीत जास्त किती जमीन आवश्यक आहे ते निश्चित करून भूधारणेवर कमाल मर्यादा घालून अतिरिक्त होणारी जमीन काढून घेऊन ती भूमिहीन आणि अल्प भूधारकांना वितरित करणे.

### ३.६.३ जमीनीवरील कमाल मर्यादेचे स्वरूप

जमीनधारणेवर कमाल मर्यादा घालण्याचा कायदा करताना 'अ' ब क 'ड'ई' असे वर्ग निशित करून या प्रत्येक वर्गात किती जमीन असावी हे कायद्याने निश्चित केले आहे. त्याचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे.

| वर्ग | वर्णन | कमाल जमीन धारणाक्षेत्र एकर |
|---|---|---|
| अ | बारमाही पाणीपुरवठा असलेली | 18-00 |
| ब | बारमाही पाणीपुरवठा नसलेली, पण वर्षातून फक्त एका पिकासाठी खात्रीचा पाणीपुरवठा असलेली जमीन | 27-00 |
| क | नैसर्गिक साधनापासून एका पिकासाठी पाटाचे पाणी पण खात्रीचा पुरवठा नसलेली जमीन | 36-00 |
| ड | ठाणे, रत्नागिरी, रायगड, भंडारा, चंद्रपूर जिल्ह्याचे ब्रह्मपुरी,गडचिरोली सिरोंचा तालुके यामधील आणि प्रारंभीच्याकालावधीसाठी भाताच्या लागवडीखालील असलेल्या जमीनी | 36-00 |
| 'इ' | कोरडवाहू जमीन म्हणजे वरील 'अब 'क' किंवा ' ड ' खालीयेणाऱ्या जमीनीव्यतिरिक्त जमीनी | 54-00 |

जमीनधारणेचा विचार करताना कुटुंब हा घटक निश्चित करण्यात आला. यात एकूणतीन निकष निश्चित करण्यात आले.

अ) व्यक्ती किंवा तिचा तिची पती-पत्नी किंवा एकाहून अधिक पत्नी व त्यांची अज्ञानी मुले वअज्ञानी अविवाहित मुली.

ब) पती/पत्नी पैकी कोणी मरण पावले असेल तेव्हा हयात पती-पत्नी किंवा अनेक पत्नीअज्ञान मुलगी व अज्ञान मुली

क) पती/पत्नी मृत पावले असतील, तर त्यांची अज्ञान मुले, अविवाहित मुली.

### ३.६.४ हस्तांतर व संपादनावर निबंध

२६ सप्टेंबर १९७० नंतर कोणतेही कुटुंब अथवा व्यक्ती यांच्याजवळ कमालमर्यादेपेक्षा जास्त जमीन असेल, तर त्या जमीनीचे कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करता येणार नाही. व्यक्तीकडे आणि कुटुंबाकडे अतिरिक्त जमीन असेल तरीही त्या कुटुंबाला अथवा व्यक्तीलाअधिक जमीन धारण करता येणार नाही. कायद्यातून पळवाट काढायलासंधीमिळू नये म्हणून धारण केलेल्या जमीनीची विभागणी करण्यावरही २६ सप्टेंबर १९७० नंतर प्रतिबंध घालण्यातआले

### ३.६.५ अतिरिक्त जमीन तरवणे

या कायद्यांतर्गत प्रत्येक कुटुंबप्रमुखाने किंवा व्यक्तीने आपल्याकडील जमीनीचे विवरणपत्र भरून देण्यासाठी कालावधी देण्यात आला होता. (२ ऑक्टोबर १९०५ पासून एक महिना), विवरणपत्र भरून न दिल्यास १०० रुपये, खोटी माहिती दिल्यास ५०० रुपये दंडाचीतरतूद करण्यात आली होती. भरून दिलेली विवरणपत्रे जिल्हाधिकाऱ्यांनी त्वरित तपासूनअतिरिक्त जमीनीचे प्रमाण निश्चित करायचे होते. अतिरिक्त जमीन निश्चित करताना तुकडेजोड आणि तुकडेबंदी कायद्याचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घ्यायची होती. तसेचअतिरिक्त होणाऱ्या जमीनीच्या जमीन मालकांना रीतसर वेळेत नोटिसा बजावायच्या होत्या. ज्याजमीन मालकांची जमीन अतिरिक्त होणार होती, त्या जमीन मालकांना प्रत्यक्ष बोलावून सदरबाबी त्यांच्या लक्षात आणून द्यावयाची होती. अतिरिक्त झालेली जमीन शासनाकडे जमाझाल्यानंतर सदर मालकांना ती जमीन परत मिळणार नव्हती.

### ३.६.६ भरपाई देणे.

जी जमीन अतिरिक्त असून शासनाने काढून घेतली आहे. त्या जमीनीची शासनाने निश्चित केलेली भरपाई संबंधितांना द्यावयाची आहे. जमीनीच्या भरपाईचा विचार करताना त्या जमीनीवरील झाडे, विहिरी, बांधकामे, कायम स्वरूपाची जोडकामे यांची किंमतजिल्हाधिका-यांनी जाणून घ्यावयाची आहे. भरपाईची रक्कम रोख न देता हस्तांतरणीय रोख्यात अदा करावयाची आहे. या रकमेवर दरसाल, दरशेकडा ३ टक्के व्याज आकारायचे आहे.भरपाईची रक्कम देताना तिचा कोणता भाग रोख्याच्या स्वरुपात देण्याजोगा नसेल तर अशी रक्कम किंवा तिचा भाग रोख द्यावयाचा आहे.

### ३.६.७ अधिक जमीनीची वाटणी

राज्य शासनाने संपादन केलेली अधिक जमीन प्राधान्यक्रमानुसार वाटायची आहे. जमीनमहसूलसंहितेच्या तरतुदीनुसार ही जमीन द्यावयाची आहे. शासनाने जमीन वाटपासाठीनिशित केलेलाप्राधान्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

१) कुळवाहिवाट कायद्यानुसार कुळाकडून जमीन काढून घेतल्याने भूमिहीन झालेली कुळे.

२) गटयोजना लागू असलेल्या गावांमध्ये जेव्हा कोणतीही जमीन सलग गटाची म्हणून झाली,असेल अशा जमीनीबाबत.

अ) ज्याने अशा व्यक्तीला जमीन भाडेपट्ट्याने दिली असूनही ज्याने कुळकायद्याप्रमाणेजमीन परत मिळविण्याच्या हक्काची बजावणी केली नसेल अशा जमीन मालकासप्रथम जमीन द्यायची आहे.

ब) सादर गटामध्ये काम करणारा शेतमजूर किंवा त्या जमीनीवर लागवड केलेल्या कृषी उत्पादनाच्या किंवा संबधितबेरोजगारकर्मचारी असेल तर त्यास देऊकरावयाची आहे.

३) वरील जमीनी वगळून राहिलेल्या शिल्लक जमीनीपैकी ५० टक्के जमीन शासनाने मान्यकेलेल्या अनुसूचित जाती, जमाती, भटक्या-विमुक्त जाती आणि मागासवर्गातील भूमिहीनव्यक्तीना वाटण्यासाठी राखून ठेवायची आहे.यातून शिल्लक राहिलेली जमीन -

४) अ) कूळकायद्याने मालकाने ज्या कुळांच्या जमीन काढून घेतली आहे असे भूमिहीनझालेले कुळ, मात्र सदर कूळ ज्या गावच्या आठ किलोमीटर परिसरातीलअसायला हवे.

ब) कार्यक्षम रीतीने लागवड करण्यासाठी आणि कच्या मानाचा पुरवठा चालू ठेवण्यासाठी औद्योगिक उपक्रमाला भाडेपट्ट्याने जमीन दिलेल्या व्यक्तींना सदरजमीन देता येईल. मात्र सदर व्यक्तीला दुसरी जमीन दिलेली असता कामा नये, सदर व्यक्ती तालुक्याचीरहिवासी असली पाहिजे.सदर व्यक्तीला -'अ' वर्ग बागायत - एक हेक्टर'ब' वर्ग - खात्रीचा पुरवठा असलेली एकपिक जमीन - दीड हेक्टर.'क' व 'ड'- जिरायत जमीन ३ हेक्टरसदर जमीनीचे खंड मुख्य लाभधारकाने पंचरापेक्षा जास्त नाहीत अशा वार्षिक हप्याने भरावयाचे आहे. या किंमतीवर तीन टक्के दराने व्याज, लाभधारकाने यायचे आहे. वेगवेगळ्या कारणाने वाटप करावयाच्या जमीनीचे जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीशिवायकोणत्याही प्रकारे हस्तांतरण किंवा विभागणी करतायेणार नाही.

### ३.६.८ अपील लेखन दोष दुरुस्ती आणि पुनर्निरीक्षण

जिल्हाधिका-यांनी दिलेल्या निर्णयाविरुद्ध महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे अपील दाखल करता येते. हे अपील निर्णयाच्या तारखेपासून नव्वद दिवसांत केले पाहिजे. ज्याविरुद्ध अपील अर्ज असेल त्या निर्णयाच्या प्रत अपील अर्जासोबत जोडावी लागते.अपिलावर निर्णय देताना महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाला जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेला आदेश,निवाडा कायम करता येतो, फिरवता येतो किंवा रद्द करता येतो. घोषणा पत्र, आदेश, लेखन, दोष दुरुस्त करण्याचा जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या चौकशीच्या निर्णयाचे कागदपत्र मागवून घेऊन त्यामध्ये आयुक्तांनापूर्ण निरीक्षण करता येते.

### ३.६.९ या कायद्यातून वगळलेल्या जमीनी

१) राज्यशासनाच्या मालकीच्या किंवा नियंत्रणाखालील महामंडळांनी धारण केलेल्या जमीनी.

२) कायद्यानुसार स्थापन झालेली प्राधिकरणे, विद्यापीठे, कृषी महाविद्यालये शाळा, कमीसंशोधन संस्थांच्या जमीनी किंवा त्यांच्याकडून पट्ट्याने धारण केलेल्या जमीनी.

३) शासनाच्या लष्करी प्रक्षेत्रांनी धारण केलेल्या जमीनी.

४) भूविकास बैंका अथवा मध्यवर्ती सहकारी बैंका किंवा प्राथमिक सहकारी संस्थायांच्याकडून ४ ऑगस्ट १९५९ पूर्वी भाडेपट्ट्याने दिलेल्या जमीनी.

५) बँकेने सहकारी संस्थेने रक्कम वसुलीसाठी प्रतिमूगी म्हणून धारण केलेली जमीनयाशिवाय राज्य शासनाला आदेश देऊन नेमून दिलेल्या अटीवर व शर्थीवर खालील जमीनी याकायद्यातून वगळता येतील

अ) विश्वस्त संस्थेने किंवा वक्फने दिनांक २६ सप्टेंबर १९७० पूर्वी धारण केलेल्या जमीनी.

ब) कोणत्याही व्यक्तीने अश्वपैदास क्षेत्रासाठी किया कोणत्याही विश्वस्त संख्येने कियाएखाद्या वक्फने पांजरपोळ किंवा गोशाळेसाठी २६ सप्टेंबर १९७० पूर्वी धारण केलेल्याजमीनी.

क) सार्वजनिक मर्यादित कंपनीने किंवा विश्वस्त संस्थेने किंवा एखाद्या वक्फने पशू कियामेठ्यांच्या पैदाशीसाठी २० सप्टेंबर १९७० पूर्वी धारण केलेल्या जमीनी.

ड) कोणत्याही खऱ्या-खुया औद्योगिक किंवा अन्य कृषितर वापरासाठी औद्योगिक उपक्रमानेधारण केलेल्या जमीनी. १९९९ नंतर यात पर्यटन उद्योगाचाही समावेश करण्यात आलाआहे.

### ३.६.१० कायद्यातील पळवाटा

महाराष्ट्र राज्याबाबत विचार करता या कायद्यात बऱ्याच पळवाटा राहिल्याने तो योग्य रीतीने अंमलात आला नाही, अपेक्षेप्रमाणे वाढीव जमीन मिळाली नाही. कायद्याचा मूळ हेतू सफल झाला नाही

१) महाराष्ट्रात कमाल जमीनधारणा कायदा येणार अशी अगोदरच कुणकुण लागली होती. पहिल्या टण्यात व्यत्ती हा निक्य होता. त्यामुळे व्यक्ती-वतीमध्ये जमीनीची विभागणीकरण्यात आली

२) दुसऱ्या टप्यात कुटुंब हा निक निश्चित करण्यात आला. हा कायद्याची अंमलबजावणीकरण्यास महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री इच्छुक नव्हते. परंतु त्यावेळच्या पंतप्रधानाध्यादवावामुळे सदर कायदा महाराष्ट्रात लागू करण्याची तयारी दर्शवली. परंतु गा. मुख्यमंत्र्यांनी कायदा होण्याच्या पंधरा दिवस अगोदर कुटुंब हा निकष लागून जमीनीची कमान मर्यादा ठरविली जाणार आहे, असे जाहीर केल्यामुळे संबंधितांनी ताबडतोबआपापल्या जगीनीचे हस्तांतरण करून घेतले. महाराष्ट्रात शासनाला या कायद्याची मनापासून अंमलबजावणी करायची नव्हती हेच यावरून स्पष्ट होते. यात श्रीमंत शेतकयांचा फायदा झाला.

३) राज्य शासनाने कायद्यासाठी विलंबनाचे धोरण अवलंबिले. १९४२ साली विधानसभेने कमाल क्षेत्र कमी करणारा सुधारणा कायदा मंजूर केला. पण हा कायदा १९ सप्टेंबर

१९७१ पर्यंत अंमलात आगलाच गेला नाही. त्यामुळे या कायद्यात पळवाटा काढण्यास श्रीमंत शेतकन्यांना भरपूर कालावधी मिळाला. कमाल जमीनधारणेपेक्षा जास्त जमीन असलेले बरेचसे श्रीमंत शेतकरी कायद्याच्या कचाट्यातून अलगद निसटले.

४) शेतीसाठी जमीन हस्तांतरणे आणि पगीन विभागण्या करण्याकरिता भरपूर वाव याकायद्यात ठेवण्यात आला.

४) कायद्याच्या कचाटनातून वेगवेगळ्या जमीनी वगळण्यात आल्या. अशा अकरा प्रकारच्या वगळलेल्या जमीनी होत्या. त्यामुळे कायद्याच्या कचाटयातून मोठ्या प्रमाणावर जमीनी वाचविण्याची संधी मिळाली. तसेच जमीनीचे वर्गीकरण बदलून जमीनवाचविण्यात बऱ्याच जगान दश मिलने.

### ३.६.११ कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिफारशी

कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयानेपहिल्या वर्षाच्या अहवालामध्ये काही शिफारशी केल्या आहेत. या शिफारशी पुढीलप्रमाणे

१) भूमी अभिलेख अद्ययावत ठेवावे.

२) कोर्टात प्रलंबित दाव्यांचा सतत आढावा घ्यावा. या प्रकरणांच्या निर्णयासाठी खास कोर्टात स्थापनाकरावी.

३) खोटे दस्तऐवज तयार करण्याचे डावपेच उघडकीस आणून हाणून पाडावेत.

४) कमाल धारणापेक्षा जास्त असलेले क्षेत्र मोठ्या चातुर्याने शोधून काढावे.

५) भूमिहिनांना दिलेल्या जमीनीबाबत योग्य कागदपत्रे तयार करणे, जमीनीच्या अभिलेखातत्यांच्या नावाची नोंद करणे.

## ३.७ सारांश

स्वातंत्र्योत्तर भारताच्या नियोजन प्रक्रियेत जमीन सुधारणा हे महत्त्वाचे उदिष्ट होते. त्याकरिता विविध कायदे करताना भारतातल्या जमीन धारणा पद्धतीचा आढावा घेण्यात आला आणि त्यानुसार जमीनीच्या फेरवाटपाचा विचार करताना मानवी संबंधात झालेल्या दुराव्याचा फेरआढावा घेण्यात आला. त्यानुसार जमीन सुधारणेची उद्दिष्टे ठरविण्यात आली. त्यानुसार (१)शेतजमीनीतील मध्यस्थ नष्ट करणे (२) कूळकायदे (३) जमीन धारणेवर कमालमर्यादा (४) तुकडेबंदीवारीला प्रतिबंध (५) सहकारी शेतीचा सक्रिय पुरस्कार इ., उद्देशाला अनुसरूनच जमीनीवर कमाल मर्यादा घालण्याचा कायदा करण्यात आला या कायद्यात अनेक पळवाटा राहिल्या. तरीही कायद्याची सुरुवात ही निश्चितच जमेची बाजू आहे

## ३.८ स्वाध्याय

१) भारतातील जमीन धारणा स्वरूप स्पष्ट करून जमीन सुधारणा करण्याची गरज विशद

२) भारतातील जमीन सुधारणेचे स्वरूप सविस्तर स्पष्ट करा

३) कमाल जमीन धारणा कायद्याचे स्वरूप स्पष्ट करा.

**टिपा**

१) कमाल जमीनधारणा.

२)कमाल जमीन धारणा कायद्यातील पळवाटा

३)कमाल जमीन धारणा कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपाय सुचवा.

## ३.९ संदर्भसूची


- *महाराष्ट्र शासन महाराष्ट्र - जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम - १९८१ (दि. ४ ऑक्टोबर १९९९ पर्यतच्या फेरबदलासह)*
- *डॉ. श. ना. नवलगुंदकर, भारतीय शासन आणि राजकारण, नरेंद्र प्रकाशन, पुणे.*
- *प्रा. बी.टी. देशमुख, भारतीय संविधान, पिंपळापुरे, अॅन्ड क. नागपूर*
- *प्रा. ची. ग. धांगरेकर भारतीय राज्यघटना स्वरूप आणि राजकरण, मंगेश प्रकाशन, नागपूर*
- *कृ. ना. वळसंगकर शासकीय यंत्रणा, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मीती मंडळ करीता सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर.*
- *के.सी. काटकर महाराष्ट्राच्या शासनाच्या हजार योजना व कार्यक्र. चंद्रसरू प्रकाशन, कुर्ला - मुंबई.*
- *भारत सरकारच्या कल्याणकारी योजना माहिती आणि प्रसार मंत्रालय, भारत सरकार.*
- *पंडित म.शा पंचायतराज आणि ग्रामीण महिला सुगाव प्रकाशन, पुणे, मे -९६*
- *पंडित पी.बी. पंचायत राज्याकडून ग्रामस्थराज्याकडे प्रबोन प्रकाशन इचलकरजी - १९९४*
- *काकडे सुरेश - पंचायतराज, प्राची प्रकाशन जून १९८३*
- *विभूते भालवा - पंचायतराज्य व्यवस्था, मनोविकास प्रकाश जुलै - २००१*
- *मटकर दयानंद - आपल्या ग्रामपंचायती वेनयन प्रकाशनण*
- *Agriculture Economics, R.G. Desai, Himalaya Publishing House, Mumbai - 400 004*
- *Agriculture & Rural Banking in India - S.S.M.Desai, Himalaya Publishing House, Mumbai - 400 004*


❖❖❖❖

# ४

# जमीन सुधारणा कायदे- II

**घटक रचना**

४.० उदिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ मुंबई कुळवहिवाट आणि शेतजमीन कायदा १९४८

४.२.१ कूळ कायद्याच्या मुख्य तरतुदी

४.२.२ खंडाची निश्चिती.

४.२.३ कसेल त्याची जमीन कायदा १९५०

४.३ मुंबई तुकडेबंदी व तुकडे जोड अधिनियम १९४७

४.४ सारांश

४.५ स्वाध्याय

४.६ संदर्भसूची

## ४.० उदिष्टे

१) कसेल त्याची जमीन संकल्पना समजावून घेणे.

२) कूळ संकल्पना समजून घेता येईल.

३) खंड संकल्पनेचा अभ्यास करणे.

४) मुंबई कुळवहिवाट आणि शेतजमीन कायदा १९४८स्वरूप समजावून घेणे.

५) कसेल त्याची जमीन कायद्याथा ग्रामीण जनतेला झालेला लाभ समजावून घेणे.

## ४.१ प्रस्तावना

ब्रिटिश सरकारने सावकार, जमीनदार आणि जहागीरदार या ऐतखाऊ मध्यस्यांना सर्वतोपरी संरक्षण आणि प्रोत्साहन देण्याचे धोरण अवलंबिले, ब्रिटिश काळात शेतकरी वर्गाच्या गळ्याभोवती सावकारी पाश करकचून आवळला गेला होता. ग्रामीण भागात सावकारांची पaक्कड जबरदस्त होती. सावकारांकडून तारणावर कर्ज घेतलेल्या भूधारकांच्या जमीनीचा दिवाणी कोर्टाच्या आदेशाप्रमाणे लिलाव होऊन सावकारांच्या

munotes.in

मालकीच्या झाल्या. मालक असलेली रयतपुढे कूळ बनली. रयतेला कोणतेच संरक्षण राहिले नाही. या परिस्थितीचे वर्णन फॅमिमन इन्क्वायरी कमिशनने मोठया मार्मिकपणे केले आहे.

जमीनदार आणि सावकारांनीकुळांनाभाडेतत्त्वावरजमीनी दिल्या, व जमीनी कूळाच्या ताब्यात किती काळ राहतील याची मुळीच शाश्वती नव्हती तीन महिन्यांची मुदत देऊन वर्ष संपल्यानंतर जमीनी काढून घेण्याचा अधिकार मालकांना होता. कूळांना या जमीनी अर्धलीने दिलेल्या असत. कुळनी मेहनत घेऊन काढलेल्या उत्पन्नाचा अर्धा भाग मालकाला द्यावा लागे. कुळांना आपल्या कष्टाचे पुरेसे फळ मिळत नव्हते. जमीनदारांना फक्त खंडाचीचिंता होती. जमीन सुधारणा करण्यात त्यांना अजिबात स्वारस्य नव्हते.

मुंबई सरकारच्या खानेसुमारीनुसार १९४३ ते१९५० या कालावधीत लहान शेतक-यांकडील सुमारे पाच दशलक्ष हेक्टर जमीन गैरहजरजमीन मालक, सावकार आणि व्यापाऱ्यांकडे गेली. रयतवारीत मुंबई राज्यातील १० एकरांपेक्षा कमी जमीन धारण करणाया ५८.७ टक्के लोकांकडे फक्त २६७ टक्के जमीन शिल्लक राहिली होती.

राष्ट्रीय काँग्रेसने १९३१ साली आपल्या ४५व्या अधिवेशनात जमीन सुधारणेसंबंधीचे धोरण

स्पष्ट करण्यासंबंधीचा ठराव केला होता. आर्थिकदृष्ट्या न परवडणाऱ्या जमीनधारकांना द्याव्या लागणाऱ्या खंडात व महसुलात भरीव कपात करण्यात येईल. आवश्यक असलेल्या मुदतीसाठी ही कपात मंजूर करावी. आवश्यकतेव्हाजमीनदारांना सहाय्य द्यावे.

१९३६ च्या काँग्रेस निवडणूक जाहीरनाम्यातही या घोषणेचा पुनरुच्चार केला गेला. मुंबई प्रांतात निवडून आलेल्या काँग्रेस मंत्रिमंडळाने मुंबई कुळवहिवाट १९३९ मंजूर केला. तो २ एप्रिल १९४०ला अंमलात आला. या कायद्यात कायम आणि संरक्षित कूळांची व्याख्या केली.

कूळांना सुरक्षितता आणि वाजवी खंड ठरविण्याची कार्यपद्धती ठरविण्यात आली. यामध्ये संरक्षित कुळांची व्याख्या ठरविण्यात आली. खंडाचे नियमन करण्यात आले. मालकांना कूळांकडून जमीनीच्या खंडाव्यतिरिक्त इतर कोणत्याही सेवा घेण्यास प्रतिबंध करण्यात आला. १९४६मध्ये काँग्रेस सत्तेवर आल्यानंतर या कायद्यात खूपच सुधारणा करण्यात आल्या.

स्वातंत्र्यानंतर १०० दिवसांत जमीनीचे फेरवाटप करण्यात येईल, असे ठोस आश्वासन देण्यात आले. ग्रामीण अर्थरचनेत आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी या कायद्याची गरज होती. देश स्वतंत्र होताच मुंबई प्रदेशात काँग्रेस मंत्रिमंडळाने **मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन कायदा १९४८** मंजूर केला. १९३९ च्या कूळवहिवाट कायद्याची जागा या कायद्याने घेतली.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत जमीनसुधारणेच्या कार्यक्रमाला महत्त्वाचे स्थान देण्यात आले. महाराष्ट्रात सुरुवातीस प्रामुख्याने तीन भौगोलिक प्रदेशांसाठी स्वतंत्र कूळवहिवाट कायदे लागू करण्यात आले आहेत.

अ) मुंबई कुळवहिवाट आणि शेतजमीन कायदा १९४८ - मुंबई कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रासाठी होता.

ब) हैद्राबाद कूळयहिवाट शेतजमीन कायदा १९५० - हैद्राबादचा जो प्रदेश महाराष्ट्रात सामील झाला त्या मराठवाडय़ात हा कायदा लागू आहे.

क) मुंबई कुळवहिवाट आणि शेतजमीन कायदा १९५८ मध्य प्रांतातील समाविष्ट झालेल्या शिलांसाठी आणि बहाठ या भूप्रदेशात हा कायदा समाविष्ट आहे.

## ४.२ मुंबई कुळवहिवाट आणि शेतजमीन कायदा १९४८

### उद्दिष्टे

१) मालक आणि कूळ यांच्या संबंधाचे नियमन करणे,

२) भूमिधारक व कूळ यांच्यातील हयगय आणि विवाद यामुळे जमीनीचे नुकसान होऊ न देणे.

३) शेतकऱ्यांनी आर्थिक, सामाजिक स्थिती सुधारणे.

४) शेतजमीनीचा पूर्णतः आणि कार्यक्षमतेने वापर करणे. प्रसंगी भूधारकांची जमीन ताब्यातघेऊन त्या जमीनीचे व्यवस्थापन करणे.

५) शेतकरी, शेतमजूर, कारागीर यांच्या मालकीच्या किंवा भोगवट्यात असलेल्या जमीनी, राहती घरे व त्यालगत असलेल्या जागा व जमीनी यांच्या हस्तांतरणाचे नियमन करणे व त्यावर निर्बंध घालणे.

या उद्देशाने कायदा करताना त्यांच्याकडील जमीनीच्या खरेदीचे हक्क मिळवून देण्यातआले.

### ४.२.१ कूळ कायद्याच्या मुख्य तरतुदी

**कूळाची व्याख्या**

**१) कराराने प्रस्थापित झालेली कूळे.**

तोंडी अथवा लेखी कराराने प्रस्थापित झालेली कूळे.

**२) गृहित कूळे**

व्यक्तिशः कसत नसलेल्या दुसऱ्या व्यक्तीच्या मालकीची जमीन कायदेशीरपणे कसणारीअन्य व्यक्तीही व्यक्ती जमीन मालकाध्या कुटुंबातील असणार नाही. जमीन मालक अथवा त्याचे कुटुंबीय यांच्या देखरेखीखाली मजुरीवर काम करणारी असणार नाही किंवा जमीन कब्जे गहाण असणार नाही

### ३) संरक्षित कूळे

मुंबई कूळकायदा १९३९च्या कलम ३. ३-अ व ४ नुसार संरक्षित म्हणून मानलेली व्यक्ती संरक्षित कूळ ठरते. अर्थात या कायद्याने जी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीची जमीन कसत असेल त्या व्यक्तीला कोणत्याही परिस्थितीत त्या जमीनीवरून काढून टाकता येणार नाही.

### ४) पोटकूळे

कायम कूळे जमीन आणि कसण्यासाठी आपल्या अंतर्गत स्वतंत्र व्यक्तीकडे जबाबदारी देतात त्यांना पोटकूळे असे म्हणतात.




Onlinenewsfeed.in

### ४.२.२ कूळांना खंडाची निश्चिती.

या कायद्याने जमीनीचे कमाल आणि निर्वाहक क्षेत्र निश्चित करून खंड निश्चितकरण्यात आला.

| अ. नं. | जमीनीचा प्रकार | कमालक्षेत्र(एकर) | निर्वाहक क्षेत्र (एकर) |
|---|---|---|---|
| अ) | जिरायत | ४८ -० | २४-० |
| ब) | हंगामात पाणी मिळणारी किंवा भात जमीन | २४ - ० | १२-० |
| क). | बारमाही पाणी मिळणारी. | ०८-० | ०४-० |

यातून वरकस जमीन वगळण्यात आली आहे.

### अ) खंड भरण्याचे स्वरूप

१) खंड रोख रकमेने भरायचा आहे.



munotes.in

२) खंड जमीन महसुलाच्या पाचपट अथवा एकरी २० रुपये या दोहोंपैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम कूळाने द्यावयाची आहे.

३) खंडाची रक्कम कोणत्याही परिस्थितीत जमीन महसूल रकमेच्या दुपटीपेक्षा कमी असणार नाही.

४) कूळ मालकांना जी रक्कम देईल ती कूळाने अन्य बाबीची आहे, असे न कळविल्यास सदर रक्कम खंड म्हणून गृहीत धरण्यात येईल.

५) खंडाची रक्कम मिळाल्यानंतर जमीन मालकाने खंड रकमेची पावती देणे गरजेचे आहे. खंड पावती न दिल्यास कायद्याच्या कलम ८१ नुसार अपराध आहे. हा अपराध सिद्ध झाल्यास जमीन मालकास रु. १०० पर्यंत दंड होऊ शकतो.

६) हा कायदा अंमलात येण्यापूर्वी जमीनीच्या कूळाकडून वसूल करण्यात येणारे सर्व उपकर पट्टी किंवा कोणत्याही प्रकारची चाकरी म्हणजे वेळ घेण्याची पद्धत रद्द होते. या तरतुदीचा भंग केल्यास जमीन मालकास रु. १००० पर्यंत दंड होऊ शकतो.

**ब) खंडाव्यतिरिक्त कूळांनी भरावयाच्या इतर रकमा.**

१) संहितेप्रमाणे जमीन महसूल.

२) मुंबई पाटबंधारे उपबंधानुसार सिंचन कर.

३) मुंबई स्थानिक मंडळ कायदा १९२३ प्रमाणे उपकर,

४) मुंबई ग्रामपंचायत कायदा उपकर.

कूळांनी खंडाच्या जमीनीत झाडे लावल्यास त्या झाडावर त्याचा हक्क राहील. कूळवहिवाट संपवताना या झाडांची मामलेदार जी भरपाई ठरवतील ती मिळवण्याचा कूळाला हक्क राहील. जमीनीत नैसर्गिकपणे वाढणाऱ्या झाडावर कूळाचा २/३. तर मालकाचा १/३ हक्क राहिल. जमीनीच्या हद्द निशाण्या बांधबंदिस्ती करण्याची जबाबदारी कूळाची राहील.

**क) जमीन कब्जा काढून घेणे.**

कोणत्याही कूळांना या कायद्याने अन्यायाने जमीनीवरून काढून टाकले जाणार नाही. परंतु विशिष्ट परिस्थितीत कूळांकडून जमीनीचा ताबा घेता येईल.

१) ३१ मे पूर्वीचा खंड भरण्यात सतत तीन वर्षे कसूर केल्यास.

२) जमीनीची खराबी अथवा नुकसान होईल असे कृत्य कूळाकडून घडल्यास.

३) जमीनीची पोटविभागणी केल्यास, जमीन पोटभाड्याने दिल्यास जमीन अभिहस्तांतरित. केल्यास.

४) कूळाने जातीने जमीन न कसल्यास.

५) शेती सोडून अन्य कारणासाठी जमीनीचा वापर केल्यास.

६) मूळ मालकास जमीन कसण्यासाठी अथवा कृषितर कारणासाठी हवी असल्यास.

७) जातीने कसण्यासाठी प्रमाणपत्र दिलेल्या जमीन मालकास कूळाकडील जमीन पाहिजे असल्यास.

८) कूळाने कूळवहिवाट स्वखुशीने संपविल्यास.

९) जमीन मालक आणि कूळ यांनी जमीनीची आपापसात अदलाबदल केल्यास.

१०) जातीने कसण्यासाठी कूळाकडून जमीन घेतल्यावर जमीन मालकाने एक वर्षाच्या आतजमीन कसली नाही.

**ड) याव्यतिरिक्त**

१) वरील नमूद केलेल्या ८ ते १० क्रमांकाच्या तरतुदी सोडून मालकाला कूळाकडून जमीनकाढून घ्यावयाची असल्यास कायद्यात ठरवून दिलेल्या मुदतीत कूळाला नोटीस द्यावयाचीआहे. तसेच जमीन काढून घेण्यासाठी तहसील दारांनी तसा हुकूम द्यावयाचा आहे. साठ दिवसांच्या मुदतीत अपील व्हायला हवे. तसे झाले नाही तर तहसील दारांनी स्वतः अथवा हाताखालील दुय्यम अधिकाऱ्यामार्फत जमीनीचा कब्जा काढून घेऊन मूळ मालकास द्यावयाचा आहे. तसा पंचनामा करावयाचा आहे. कब्जा पावती द्यायची आहे. कोणत्याही कारणास्तव आणि कोणत्याही परिस्थितीत जमीन मालकास कूळाकडून जमीन कब्जा परस्पर काढून घेता येणार नाही. असा कब्जा घेणे अवैध ठरविण्यात आले आहे.हा अपराध आहे. त्याबद्दल मालकाला शिक्षा होऊ शकते.

२) कूळाला स्वत:हून जमीनीचा कब्जा सोडायचा असेल, तर कूळाने तसा अर्ज तहसीलदाराकडे दिला पाहिजे. अर्ज आल्यानंतर तहसीलदाराने कूळाला नोटीस काढून बोलावून घेऊन अर्ज तपासला पाहिजे. कोणाच्या दडपणाखाली नाही, तर स्वखुशीने तो कब्जा सोडत आहे ही खात्री करून तहसीलदारांनी मगच त्या अर्जाला मंजुरी द्यावयाची आहे. मात्र १ एप्रिल १९५७ नंतर कुळे ही जमीनीची मालक म्हणून गृहीत धरण्यात आल्यामुळे सदर कूळे ही कूळे न राहता ती जी जमीन कसत होती त्याची मालक बनली. त्यामुळे कब्जास्वत:हून सोडून देण्याचा अर्ज आला तरी तो स्वीकारण्याचा किंवा त्याचा निवाडा करण्याचा अधिकार तहसीलदारांना राहिलेला नाही, असा निवाडा उच्च न्यायालयांनी दिला आहे.

३) कुळे, शेतमजूर आणि कारागिरांच्या घराखालील जागाजमीन मालकाच्या जागेत घर बांधून राहणाऱ्या कूळांना त्यांच्या राहत्या घरातून जमीन मालकाकडून काढून टाकता येणार नाही. घराखालील जागा विकत घेण्याचा हक्क कूळांना आहे. राहत्या घराची वाजवी किंमत शेतजमीन न्यायाधिकरण ठरवून देईल ही किंमत या जागेच्या वार्षिक खंडाच्या २० पटीहून अधिक असणार नाही. किंमत ठरवून कूळांनी किंमत भरल्यास जागा खरेदीचे प्रमाणपत्र न्यायाधिकरणाने कूळांना द्यावयाचे आहे.महाराष्ट्र राज्य शासनाने याबद्दलचे आदेश अद्याप काढले नाहीत.ही जमीन मूळ मालकाला काढून घ्यावयाची असेल, तर रीतसर नोटीस देऊन, तहसीलदारांच्या कोर्टात दावा दाखल करून दाव्याचा हुकूम मिळाल्यानंतर

तहसीलदाराच्या मार्फत जमीनीचा ताबा घेता येईल. मात्र कायद्याचे उल्लंघन करता येणार नाही. तसे केल्यास मालकास रुपये एक हजारपर्यंत दंड होऊ शकतो.

### आपली प्रगती तपासा

१. मुंबई कुळ वहिवाट आणि शेतजमीन कायदा १९४८ च्या प्रमुख तरतुदी सविस्तर विशद करा.

### ४.२.३ कसेल त्याची जमीन कायदा १९५०

सरकारने १ एप्रिल १९५७ रोजी आध्यादेश काढून या दिनांकाला जमीन मालकाच्या जमीनीवर जी व्यक्ती जमीन कसत होती ती जमीनीची प्रत्यक्ष मालक म्हणून घोषित करण्यात आली. यात कायम कूळांनी जर पोटकूळे ठेवली असतील, तर वरील तारखेला ती पोटकुळे जमीनधी मालक झाली असे मानावयाचे आहे. या तारखेनंतर सदर जमीनीचा महसूल सदर कूळमालकाने सरकार दरबारी भरावयाचा आहे.कूळाने खरेदी करावयाच्या जमीनीची किंमत न्यायाधिकरणाने ठरवायची आहे. कूळांना कमाल मर्यादेपर्यंतच जमीन विकत घेता येईल. म्हणजे जिरायत ४८ एकर, हंगामी पाणी मिळणारी किंवा भात जमीन २४ एकर, बारमाही पाण्याची १२ एकर इत्या. त्यापेक्षा अधिक जमीन खरेदी करता येणार नाही. जमीन खरेदीसंबंधी न्यायाधिकरण कूळांना नोटीस बजावेल नोटिसीच्या मुदतीत कूळाने न्यायाधिकरणासमोर प्रत्यक्ष हजर होऊन खरेदीची इच्छा आहे की नाही हे सांगावयाचे आहे.

### जमीन खरेदी करताना कूळांनी द्यावयाची जमीनीची किंमत

अ) खरेदी जमीन आकारणीच्या (महसूल) वीस पटीहून कमी असेल आणि आकारणीच्या २०० पटीहून जास्त असेल अशी न्यायाधिकरण ठरविल ती रक्कम.

ब) अधिक जमीन मालकाने बांधलेल्या संरचना, विहीर, बंधारे, इतर वस्तू, लावलेली झाडे यांचे मूल्य.

क) अधिक कृषक दिनी वैधरित्या येणे असलेल्या खंडाच्या रकमा.

ड) अधिक कूळाने न भरलेल्या जमीन मालकास मराव्या लागलेल्या जमीन महसूल उपकराच्या रकमा.

### याशिवाय इतर तरतुदी

१) जमीन खरेदीची गृहीत तारीख आणि जमीन किंमत ठरविल्याची तारीख या दरम्यानच्यामुदतीसाठी दरसाल दर शेकडा साडेचार टक्के प्रमाणे खरेदी कीमतीवर व्याज आकारण्याची तरतूद करण्यात आली आहे. खरेदी रक्कम देताना त्यात व्याजाची रक्कम मिळविली जाईल.

२) कूळाने मालकास जमीनीच्या भरपाईपोटी रक्कम भरली असल्यास ती या रकमेतून वजाकरावयाची आहे.

3) खरेदी होणाऱ्या जमीनीतील झाडांचे उत्पन्न मालकाने घेतले असल्यास त्याचा हिशोबकाढलेली रक्कम खरेदी किमतीतून वजा करावयाची आहे.

४) सदर रक्कम कूळांनी एका वर्षात न्यायाधिकरणाकडे भरावयाची आहे.

५) कूळांना रक्कम एक हफ्यात भरणे शक्य नसल्यास दरसाल दर शेकडा साडेचार टक्केव्याजाने हीरक्कम समान वार्षिक हप्त्याने भरता येईल,

६) कूळांनी विनंती केल्यास बारापेक्षा अधिक नाहीत असे हप्ते ठरवून द्यायचे आहेत.

७) कूळाने विनंती केल्यास ही मुदत न्यायाधिकरण एक वर्षापर्यंत वाढवू शकेल. जास्तीत जास्त सोळा हप्त्यांपर्यंत कालावधी वाढवून देता येईल.

८) कूळ रक्कम भरण्यास असमर्थ ठरल्यास जमीनीची विनंती निरर्थक ठरविण्याची तरतूदकायद्यात करण्यात आली आहे.

**आपली प्रगती तपासा**

१. कूळांनी जमीन खरेदी करताना द्यावयाच्या जमीनीच्या कीमतीविषयी माहिती लिहा.

**कूळांनी जमीनी खरेदी न केल्यास त्या जमिनीची विल्हेवाट लावण्याचा न्यायाधिकरणाचा अधिकार**

कूळांनी जमीनी खरेदी न केल्यास त्या जमीनीची विल्हेवाट लावण्याचा अधिकार न्यायाधिकरणास आहे या अधिकाराचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे.

१) जमीन खरेदी चौकशीच्या वेळी हजर न राहिल्यास अथवा जमीन खरेदी करण्यास कूळानेनकार दिल्यास,

२) जमीन खरेदी किंमत सर्व प्रयत्न करून जमीन महसूल बाकी म्हणूनही वसूल नझाल्यास.

३) अज्ञान, विधवा, मानसिक व शारीरीक दौर्बल्य जडलेल्या व्यक्तीच्या बाबतीत जमीन विक्रीस्थगित होते. पण हे कारण नष्ट झाल्यावर एका वर्षात ते कूळ त्या जमीनीचे खरेदीदारबनते. ही प्राप्त झालेला हक्क कूळांनी न बजावल्यास,

४) कृषक दिनानंतर (१ एपिल १९५७) जमीनीच्या खरेदीचा हक्क कूळांनी न बजावल्यास.

५) दरसाल रु.१५०० पेक्षा कमी उत्पन्न आहे म्हणून या कायद्याच्या कलम ८८ नुसार प्रमाणपत्र मिळालेल्या व्यक्तींनी जास्तीत जास्त कब्जा मिळविण्यासाठी मुदतीत अर्ज दिला आहे किंवा नाही किंवा दिलेला अर्ज फेटाळला गेला असेल तर त्या जमीनीवरील कूळ जमीन खरेदीस पात्र होते. पण अशा परिस्थितीत कूळाने जमीन खरेदीचा हक्क न बजावल्यास.

६) सशस्त्र दलात नोकरी करणाऱ्यांना त्यांच्या जमीनीवरील कुळवहिवाट कलम ४३(१५)प्रमाणे संपवता येते. परंतु हा अधिकार न बजावल्यास त्या जमीनीवरील कूळे जमीनखरेदीस पात्र ठरतात. पण हा हक्क कूळांनी बजावला नाही तर.

वरील सर्व प्रकारातून चौकशी करून ठरवून दिलेली कार्यपद्धती अवलंबून या जमीनीचीविल्हेवाट न्यायाधिकरणाने लावायची आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१. कूळाने जमिनीची खरेदी न केल्यास त्या जमीनीची विल्हेवाट लावण्याचा न्यायाधिकरणाचा अधिकार सविस्तर स्पष्ट करा.

**जमीन हस्तांतरण निर्बंध**

पुढील जमीनींच्या हस्तांतरणावर या कायद्याने निर्बंध घालण्यात आले आहेत.

१) कृषक दिनी (१ एप्रिल १९५५७) कूळ असलेल्यांना होणारी जमीन विक्री.

२) जमीन मालक अज्ञान, विधवा किंवा मानसिक दौर्बल्य असल्यामुळे पुढे ढकललेली विक्रीकारण नष्ट झाल्यावर कूळांना झालेली जमीन विक्री.

3) कायम कूळ जमीन कसत नसेल तेव्हा त्यांनी ठेवलेल्या पोटकूळास झालेली जमीन विक्री.

४) कृषक दिनानंतर निर्माण झालेल्या कुळांना झालेली जमीन विक्री.

५) वार्षिक रु.१५०० किंवा त्यापेक्षा कमी उत्पन्न असल्याचे प्रमाणपत्र धारकाने आपणासकसण्यासाठी जमीन पाहिजे असा अर्ज न केल्याने किंवा केलेला अर्ज फेटाळल्याने या जमीनीच्या कूळांना झालेली जमीन विक्री.

६) कूळाने खरेदी केलेल्या जमीनी संक्षिप्तपणे चौकशी करून अन्य व्यक्तींना म्हणजे शेतमजूर, भूमिहीन, अल्पभूधारक वगैरेंना केलेली जमीन विक्री.

७) जमीन मालकाचा जमीन विकण्याचा इरादा असेल तेव्हा न्यायाधिकरणाकडे अर्ज करूनजमीन किंमत ठरवून घेऊन विशिष्ट व्यक्तीला केलेली जमीन विक्री. इ.

**या कायद्यातून वगळलेल्या जमीनी.**

या कायद्यातून वगळलेल्या जमीनीचे तीन भागांत वर्गीकरण करण्यात आले आहे.

**अ) विभाग एक**

कायद्याच्या अंमलबजावणीतून पूर्णतः वगळलेल्या

१) शासनाच्या मालकीच्या किंवा शासनाकडून पट्ट्याने धारण केलेल्या जमीनी.

२) राज्य शासनाने कृषितर किंवा औद्योगिक विकासासाठी राखून ठेवलेल्या जमीनी.

३) पालक किंवा प्रतिपालक कायदा १९८० प्रमाणे पालक म्हणून नेमलेल्या शासकीय अधिकाऱ्यांच्या व्यवस्थेखालील जमीनी.

४) कायद्याच्या प्रकरण चार खालील भूमिधारकांनी धारण केलेल्या व्यवस्थेखाली घेतलेल्या जमीनी आणि कलम ६५ नुसार लागवडीस न आलेल्या व्यवस्थेखालील जमीनी.

५) राज्य शासनाने मान्यता दिलेल्या भूदान समितीकडे हस्तांतरित केलेल्या किंवा या समितीने हस्तांतरित केलेल्या जमीनी.

**ब) विभाग दोन**

१) ऊस किंवा फळे किंवा फुले यांची लागवड करण्याकरिता तसेच औद्योगिक किंवा वाणिज्य उपक्रम किंवा विवक्षित सहकारी संस्थांना पट्ट्याने दिलेल्या जमीनी.

२) नगरपालिका किंवा छावणी दिलेल्या जमीनी.

३) स्थानिक प्राधिकरण, विद्यापीठ आणि विश्वस्त व्यवस्थेखालील जमीनी.

**क) विभाग तीन**

१) अज्ञान, विधवा स्त्री, कोणतेही मानसिक किंवा शारीरिक दौर्बल्य जडलेल्या व्यक्तीनी धारण केलेल्या जमीनी,

२) ज्यांचे आर्थिक उत्पन्न रु.१५०० पेक्षा अधिक नाही अशा व्यक्ती.

३) १९४७च्या अधिनियम क्रमांक ३५ लागू झाल्यानंतर आदिवासींनी धारण केलेल्या जमीनी.

४) शासनास उपयुक्त चाकरी केल्याबद्दल इनाम किंवा वतन म्हणून धारण केलेल्या जमीनी.

५) सरंजाम म्हणून धारण केलेल्या जमिनी.

**आपली प्रगती तपासा -**

१. कूळकायद्यातून वगळलेल्या जमीनीची माहिती द्या.

**कायद्याची अंमलबजावणी**

या कायद्यामुळे महाराष्ट्र राज्यातील १४.६४ लाख कूळांना १९.०७ लाख हेक्टर जमीनीची मालकी मिळाली. राज्यातील एकूण पिकाखालील क्षेत्राच्या हे प्रमाण ८ टक्के आहे. कूळाकडीलजमीनीची खरेदी किंमत ५६.५४ कोटी रुपये ठरविण्यात आली व जमीनी कूळांना विकण्यात आल्या. .

महाराष्ट्रात या कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी झालेली दिसून येत नाही, महाराष्ट्रात कूळांकडून संघटित दबाव निर्माण होऊ शकला नाही. इतर राज्यात हा दबाव निर्माण झाला. त्यामुळे इतर राज्यात कूळकायद्याची अंमलबजावणी व्यवस्थित झाली.

**अंमलबजावणीतील मर्यादा कमी करण्यासाठी उपाय**

कूळकायद्याच्या अंमलबजावणीत असंख्य मर्यादा राहिल्या त्यामुळे कूळकायदा परिणामकारक

ठरू शकला नाही. या कायद्याच्या अंमलबजावणीच्या मर्यादा कमी करण्यासाठी पुढील उपायांचा विचार करावा लागेल.

१) कायद्याची परिणामकारकपणे ग्रामीण पातळीवर अंमलबजावणी करणे. शासकीय यंत्रणेने अंमलबजावणीत प्रामाणिकपणा दाखवावा.

२) शासकीय यंत्रणेने जमीन मालकांच्या प्रलोभनाला बळी न पडता कुळांच्या संरक्षणाचाविचार प्राधान्यक्रमाने करायला हवा.

३) कूळांनी त्यांना प्राप्त झालेल्या जमीनीचा स्वतः योग्य प्रकारे वापर करणे. कोणत्याही परिस्थितीत जमीनीचे हस्तांतरण न होऊ देणे. मिळालेल्या जमीनीचा योग्य वापर करणे.

४) भुधारकांना जमीनी कसण्यासाठी वित्तीय संस्थांनी आर्थिक सहाय्याचा हात पुढे करावा.ग्रामीण विकासाच्या योजनांचा लाभ त्यांना उपलब्ध करून द्यावा. त्यांच्याकडील शेतीकायदेशीर अशी काळजी घेणे जरुरीचे आहे.

५) कूळकायदा होणार आहे. या भीतीने जमीनदारांनी दमदाटीने कूळांकडून कायदाहोण्याअगोदर जमीन काढून घेतली असेल तरीही अशा कूळांना जमीनी परत मिळण्यासाठी संरक्षण मिळायला हवे.

६) काही गावात धार्मिक संस्था, देवस्थान ट्रस्ट, मठ वगैरे संस्थांच्या नावावर जमीनी आहेत. गावातील जवळपास सर्वच शेतकरी त्यांची कूळे आहेत. या जमीनींना या कायद्याचा लाभ झाला नाही. त्यामुळे अद्यापही सदर नागरिक सदर ट्रस्टची कूळे म्हणून अस्तित्वात आहेत. त्यांना कसत असलेल्या जमीनीचे मालकी हक्क मिळाले नाहीत. त्यांना हे हक्क मिळाले तर सदर व्यक्तींना जमीनीचे मालक बनण्याची संधी मिळेल.

७) पिढ्यान्पिढ्या कूळ म्हणून जमीन कसूनही असंख्य भूधारकांची जमीनीच्या हक्कपत्रातकूळ म्हणून नोंद झालेली नाही. ही नोंद नसल्यामुळे कूळकायद्याप्रमाणे प्राप्त होणाऱ्याजमीनी विकत घेण्याच्या हक्कापासून वंचित राहिले आहेत. तेव्हा अशी न नोंदलेली कुळेशोधून काढून त्यांना कूळ हक्क प्रदान करण्याची व्यापक मोहीम काढण्याची नितांत गरज आहे.

८) ज्या भागात कूळवहिवाट समस्या आहे त्या भागात कूळाच्या प्रबोधनाचा कार्यक्रम हातीघ्यायला हवा, जेणेकरून कूळांना आपल्या हक्काची जाणीव होईल.

munotes.in

## ४.३ मुंबई तुकडेबंदी व तुकडेजोड अधिनियम १९४७

### ४.३.१ उद्देश

शेतजमीनीचे तुकडे पडल्याने शेती व्यवसाय आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. उत्पादनावर त्याचा परिणाम होतो. त्यामुळे शेतीत नवीन तंत्रज्ञानाचा वापर करता येत नाही. म्हणून शेतजमीनीच्या तुकड्यांना प्रतिबंध करणे. तुकड्याचे एकत्रीकरण करणे हा या कायद्यामागचा मूळ उद्देश आहे.

### ४.३.२ जमीनीचे तूकडे पडल्यामुळे होणाऱ्या नुकसानीचे स्वरूप




Onlinenewsfeed.in

munotes.in

१) जमीनाचा योग्य व पूर्णत : वापर करता येत नाही. तुकड्यांची मशागत फायदेशीर ठरत नाही. नवीन तंत्रज्ञानाचा वापर करणे शक्य होत नाही. बैल-जोडी अथवा पारंपरिक पद्धतीनेच जमीनीची मशागत करावी लागते.

२) तुकडे पाडल्यामुळे मजूर, जनावरे, नांगर, बी-बियाणे, खते, औषधे आणि पाटाचे पाणी वगैरे नेण्यासाठी तसेच तुकड्यांतील पिके कापून ती मळणीसाठी खळ्यावर नेण्यासाठी अनाठायी श्रम व मजुरी खर्च होते. शेतकऱ्याच्या एकंदर आर्थिक परिस्थितीचा विचार करता ही बाब शेतकऱ्याला सध स्थितीत परवडणारी नाही. शेतकऱ्याच्या आर्थिकअडचणीत अधिक भर घालण्यास कारणीभूत ठरणारी आहे.

३) लहान-लहान तुकडयांमुळे पायवाटेचा रस्त्याचा प्रश्न निर्माण होतो. तंटे उद्भवण्याची शक्यता निर्माण होते. लहान तुकड्यामुळे बांधबंदिस्तीत जास्त जमीन वाया जाते. शेतक-याने बांध घालताना थोडासा बांध जरी दुसऱ्या शेतकऱ्याच्या जमीनीत सरकला तरी त्यातून मोठ्या प्रमाणात तंटे निर्माण होतात. ह्या मुळे गावात खून, मारामाऱ्यांची परिस्थिती निर्माण होते. कोर्टात तंटे जातात. वर्षानुवर्षे कोर्टात दावे सुरू राहतात यामुळेशेतकऱ्यांची आर्थिक आणि मानसिक हानी मोठ्या प्रमाणात होते.

४) जमीनीचे तुकडे पडल्यामुळे शेतजमीनीच्या उत्पादकतेवर परिणाम होतो. याचा आप्रत्यक्ष परिणाम देशाच्या एकूण उत्पादकतेवर होऊन अन्नधान्य उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट होऊ शकते. ही बाब भारतासारख्या विकासाच्या मार्गावर वाटचाल करणाऱ्या देशा परवडणारी नाही. याकरीता या समस्येचा गांभीर्याने विचार करावा लागला.

५) शेतजमीनीचे तुकडे होताना ते वारसा हक्काच्या कायद्यामुळे सुपीकतेनुसार होतात. त्यामुळे तुकडीकरण होतेच पण जमीनीचे विखंडनहीं होते. यामुळे कौटुंबिक पातळीवरही तणावाची परिस्थिती निर्माण होते. कुटुंबातील कोणताही सभासद आपले हक्क सोडायलातयार नसतो. जमीनीची सुपीकता अथवा जमीनीच्या वापरावयाचे स्वरूप ज्याप्रमाणे आहेत त्याप्रमाणे सभासद हक्क मागतात उदा. एखाद्या मयत शेतकऱ्याची जमीन फळलागवाड, भात लागवड, पडीक अशा तीन प्रकारची आहे. यात त्याची जितकी मुलेआहेत ती वरील तीनही प्रकारच्या जागेचा हक्क मागतात. कायद्याने तो हक्क त्यांना द्यावाच लागतो. मुलांची संख्या जास्त असेल, तर तुकडे अधिक लहान लहान होतात. ही समस्या जगातल्या प्रत्येक राष्ट्रासमोर उभी राहिली आहे. म्हणून भारताच्या बाबतीतस्वातंत्र्यानंतर या समस्येचा गांभीर्याने विचार सुरू झाला.

### शेतजमीनीच्या किफायतशीर तुकड्यांचे स्वरूप

शेतजमीनीथा किफायतशीर तुकडा कमीतकमी किती आकाराचा असावा हे या कायद्यात निश्चित करण्यात आले आहे. याकरिता सरकारने जमीनीची सोयिस्कर अशी विभागणी केली आहे. त्यानुसार विविध स्वरूपाच्या तुकड्यांचे ठरविलेले प्रमाण पुढीलप्रमाणे आहे.

### शेतजमीनीचे किफायतशीर तुकडे

| अ.नं. | शेतजमीनीचा प्रकार | किफायतशीर तुकडा |
|---|---|---|
| १) | जिराईत जमीन | १ ते ४ एकर |
| २) | भात जमीन | १ गुंठा ते १ एकर |
| ३) | बागायत जमीन | ५ गुंठे ते १ एकर |
| ४) | वरकस जमीन | २ ते ५ एकर |

याशिवाय राज्यातील निरनिराळ्या विभागासाठी भिन्न भिन्न क्षेत्र निश्चित करण्यात आले आहे. उदा. कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांत वरकस २ एकर, खरीप भात २० गुंठे आणि बागायत जमीनीसाठी ५ गुंठे हा तुकडा निश्चित करण्यात आला आहे.

### ४.३.३ जमिनीच्या तुकड्यांच्या हस्तांतरणावर बंदी आहे

असे असले तरी काही अपवाद ठेवण्यात आले आहेत.

१) तुकड्यांचे हस्तांतरण वारसा हक्काने होईल, पण विभागणीने करता येणार नाही.

२) कूळकायद्याप्रमाणे कुळास जमीन विकताना हस्तांतरण तुकड्यांचे होईल.

३) कूळ कायद्याप्रमाणे विक्री होणाऱ्या तुकडयांचे कुळांच्या वारसांमध्ये हस्तांतरण होऊ शकते.

या कायद्यानुसार जमीनीचे तुकडे होतील अशी विभागणी करता येणार नाही. अस्तित्वातील तुकड्यांचे हस्तांतरण केले तर ते निरर्थक ठरते. जिल्हाधिकारी या हस्तांतरणाला रुपये २५० पर्यंत दंड करू शकतात. तुकड्यांचे केलेले हस्तांतरण बेकायदा ठरवून त्यातीलकब्जेदार व्यक्तीस हुसकावून लावता येते. जिल्हाधिकारी जमीनीचा कब्जा घेऊ शकतात. २५ नोव्हेंबर १९६५ पूर्वी या कायद्याचे उल्लंघन करून जमीन तुकडयांचे हस्तांतरण किंवा विभाजन झाले असेल तर जमीन मोबदल्याच्या एक टक्का रक्कम किंवा रुपये शंभर या दोन्हीत जी रक्कम जास्त असेल ती दंड म्हणून संबंधितांना भरावी लागते. दंड भरल्यास जमीन तुकड्यांचे हस्तांतरण निरर्थक ठरत नाही. जमीन हस्तांतरण करून घेणारा नजीकचा खातेदार असेल, तर

हा दंड फक्त एक रुपया ठेवण्यात आला आहे. ठरवून दिलेल्या मुदतीत हा दंड भरावयाचा आहे. ३१ जुलै १९८३ ही शेवटची तारीख देण्यात आली होती.

**आपली प्रगती तपासा**

१) मुंबई तुकडेबंदी आणि तुकडे जोड अधिनियम १९४७चा उद्देश स्पष्ट करा व जमीनीचे तुकडे पडल्यामुळे होणाऱ्या नुकसानीचे स्वरूप लिहा.

टीपा (२) शेतजमीनीचे किफायतशीर तुकडे - स्वरूप

### ४.३.४ शेतजमीनीचे एकत्रीकरण

या कायद्यानुसार जमीनीची अधिक चांगल्या प्रकारे लागवड करता यावी याकरिता गावपातळीवर पडित शेतजमीनीच्या एकत्रीकरणाची योजना शासनाने लागू केली होती.

शासनाने अशा स्वरूपाचे एकत्रीकरण विशिष्ट गावासाठी म्हणून करण्याचा निर्णय घेतला. ही एकत्रीकरणाची योजना गावातील नागरिकांच्या सहकार्याने राबवायची होती त्यासाठी शासनाने काही निका निश्चित केले होते. ते पुढीलप्रमाणे

१) जमीनीच्या एकत्रीकरणाची योजना ज्या विशिष्ट गावासाठी लागू करायची आहे तशा स्वरूपाचा जाहिरनामा शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध करावा.

२) त्याकरिता एकत्रीकरण अधिकाऱ्याची नियुक्ती. .

३) योजनेला नागरिकांचे सहकार्य मिळावे म्हणून ग्रामसमितीची नियुक्ती.

४) गावकऱ्यांना रीतसर जमीनीच्या एकत्रीकरणाची नोटीस बजावणे.

५) अधिकाऱ्याने याकरिता प्रत्यक्ष गावभेट घेऊन ग्रामस्थांशी सविस्तर चर्चा करणे,

६) ग्रामसमितीच्या शिफारशी जाणून घेणे.

७) एखाद्या व्यक्तीस जमीन कमी दिली असेल, तर त्यासंबंधीच्या भरपाईची निश्चिती.

८) आवश्यकतेप्रमाणे रस्ते, गल्ल्या, बोळ याखालील जागा एकत्रित योजनेत समाविष्ट करून घेणे.

९) गावच्या गावठाणासाठी आणि सार्वजनिक वापरासाठी पुरेशी जागा राखून ठेवणे.

१०) सार्वजनिक वापरासाठी जागा राखून ठेवल्यामुळे होणाऱ्या नुकसानीच्या भरपाईची तरतूद. तयार झालेल्या या योजनेचा मसुदा राजपत्रात प्रसिद्ध करावयाचा आहे आणि संबंधित गावात तो लावायचा आहे. नागरिकांच्या सूचना मागवायच्या आहेत. नागरिकांच्या सूचना, तक्रारी एकत्रित करून त्यावर विचारविनिमय करून सुधारित योजना बनवून ती पुन्हानागरिकांसमोर मांडावयाची आहे. सुधारित योजनेसाठी हरकती आणि सूचना विचारात घ्यावयाच्या आहेत.

वरील सर्व बाबींचा सांगोपांग विचार करून एकत्रीकरण करणाऱ्या अधिकाऱ्यांनी पाठविलेली योजना कायम करणे योग्य नाही असे जमाबंदी आयुक्तास वाटले तर या योजनेत योग्य ती सुधारणा करून, नागरिकांसमोर प्रसिद्ध करून आक्षेप मागवून कायम केलेली योजना अंतिम राजपत्रात प्रसिद्धीस द्यावयाची आहे. एकत्रीकरण योजना गावात लागू करताना काही जाहिरनामे प्रसिद्ध करावे लागतात.

१) एकत्रीकरण योजना लागू करण्याचा हेतू जाहीर करणारा जाहीरनामा,

२) योजनेया मसुदा तयार झाल्यावर आक्षेप मागविणारा जाहीरनामा.

३) आक्षेप आल्यानंतर तयार केलेली सुधारित योजना आणि पुन्हा आक्षेप मागविणारा जाहीरनामा.

४) जमाबंदी आयुक्तांनी काळजीपूर्वक योजना तपासून आवश्यक वाटल्यास सुधारणा करून जमाबंदी आयुक्तांनी एकत्रित योजना प्रसिद्ध केल्याबद्दल आणि आक्षेप मागविणारा जाहिरनामा.

अशा प्रकारे गावातील जमीनीच्या एकत्रीकरणाची योजना मांडताना गावकन्यांसमोर पाच वेळा जाहिरनामा प्रसिद्ध केला जातो. गावकन्यांना एकत्रीकरणाची योजना लागू करण्याविषयी सावध केले जाते. आक्षेप घेण्यास भूधारकांना संधी दिली जाते. अंतिमतः ही योजना लागू झाल्यावर एक वर्षात या योजनेची अंमलबजावणी करावयाची आहे.

या कालावधीत प्रशासनाने काही महत्त्वाच्या बाबी पूर्ण करावयाच्या आहेत.

अ) ज्या भूधारकांकडून भरपाईची रक्कम वसूल करावयाची आहे. त्यांच्याकडून ती वसूल करून घेणे

ब) योजना लागू झाल्यावर लगेच येणाऱ्या कृषिवर्षाच्या प्रथम दिवसापासून (एक एप्रिल) ठरवून दिलेल्या पद्धतीनुसार संबंधित भूधारकांना प्रत्यक्ष जमीन कब्जा देणे.

क) कब्जा न सोडणाऱ्या भूधारकांना हुसकावून लावणे.

ड) जो भूधारक भरपाई रक्कम मुदतीत देणार नाही त्याला आवश्यक असेल तर मुदत वाढवून देणे. वाढीव मुदतीतही रक्कम न भरल्यास ती जमीन महसुलाची भरपाई म्हणून वसूल करणे

इ) वसूल केलेली रक्कम पूर्वीच्या भूधारकास अदा करून रक्कम भरलेल्या व्यक्तीस कब्जा देणे.

एकत्रीकरण योजना राबविताना भूधारकांचे मूळ सर्वे नंबर व गट नंबर हिस्सा बदलणार आहे. या योजनेप्रमाणे गाव नकाशात दाखविलेल्या गटांचे हद्दीप्रमाणे बसवून एकत्रित केलेले तुकडे भूधारकांना वितरित करावयाचे आहेत. जमीन महसूल संहिता १४४प्रमाणे जिल्हाधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे. गटाध्या हद्द निशाण्या उभारण्यासाठी येणारा खर्च जिल्हाधिकाऱ्यांनी गटधारकांकडून वसुल करावयाचा आहे.

**आपली प्रगती तपासा**

शेतजमीन एकत्रीकरण योजनेची माहिती द्या.

**या कायद्यांतर्गत महाराष्ट्रात जमीनीच्या एकत्रीकरणासाठी झालेली कार्यवाही**

एकत्रीकरण योजनेत चौथ्या पंचवार्षिक योजनेअखेर जमीनीचे झालेले एकत्रीकरण आणि त्यासाठी आलेल्या खर्चाचे स्वरूप पुढीलप्रमाणे -

## ४.४ सारांश

कूळवहिवाट आणि शेतजमीन कायदा १९४८ आणि कसेल त्याची जमीन कायदा १ एप्रिल १९५० या कायद्यांनी असंख्य कूळांना जमिनीची मालकी मिळवून दिली. काही गावात जमीनदारभूमिहीन झाले. भूमिहीनांना हक्काची जमीन मिळाल्यामुळे त्यांच्या आर्थिक परिस्थितीत थोडाफार बदल होण्यास चालना मिळावी, असे असले तरी महाराष्ट्रात या कायद्यामुळे फार मोठे बदल झाले असे म्हणता येणार नाही. कायद्यात अनेक पळवाटा राहिल्या.

## ४.५ स्वाध्याय

१) मुंबई कुळवहिवाट कायद्याचा उद्देश स्पष्ट करून या कायद्याच्या महत्त्वाच्या तरतुदीविशद करा.

२) शेतजमीन एकत्रीकरण योजनेची माहिती द्या.

३) **टिपा**

अ) कूळांनी जमीनी खरेदी न केल्यास त्या जमीनीची विल्हेवाट लावण्याचा न्यायाधिकरणाचा अधिकार

ब) जमीन हस्तांतरावर निर्बंध.

## ४.६ संदर्भसूची


- महाराष्ट्र शासन महाराष्ट्र - जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम - १९८१ (दि. ४ ऑक्टोबर १९९९ पर्यतच्या फेरबदलासह)
- डॉ. श. ना. नवलगुंदकर, भारतीय शासन आणि राजकारण, नरेंद्र प्रकाशन, पुणे.
- प्रा. बी.टी. देशमुख, भारतीय संविधान, पिंपळापुरे, ॲन्ड क. नागपूर




munotes.in

- प्रा. ची. ग. धांगरेकर भारतीय राज्यघटना स्वरूप आणि राजकरण, मंगेश प्रकाशन, नागपूर
- कृ. ना. वळसंगकर शासकीय यंत्रणा, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मीती मंडळ करीता सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर.
- के.सी. काटकर महाराष्ट्राच्या शासनाच्या हजार योजना व कार्यक्र. चंद्रसरू प्रकाशन, कुर्ला - मुंबई.
- भारत सरकारच्या कल्याणकारी योजना माहिती आणि प्रसार मंत्रालय, भारत सरकार.
- पंडित म.शा पंचायतराज आणि ग्रामीण महिला सुगाव प्रकाशन, पुणे, मे -१६
- पंडित पी.बी. पंचायत राज्याकडून ग्रामस्थराज्याकडे प्रबोान प्रकाशन इचलकरजी - १९९४
- काकडे सुरेश - पंचायतराज, प्राची प्रकाशन जून १९८३
- विभूते भालवा - पंचायतराज्य व्यवस्था, मनोविकास प्रकाश जुलै - २००१
- मटकर दयानंद - आपल्या ग्रामपंचायती वेनयन प्रकाशन
- Agriculture Economics, R.G. Desai, Himalaya Publishing House, Mumbai - 400 004
- Agriculture & Rural Banking in India - S.S.M.Desai, Himalaya Publishing House, Mumbai - 400 004


❖❖❖❖

munotes.in

# ५

## ग्रामीण भागाशी संबंधित कायदे -I

**घटक रचना**

५.० उद्दिष्टे

५.१ प्रस्तावना

५.२ आदिवासी समुदायाच्या जमिनीशी संबंधित कायदे

५.3 पंचायत विस्तार (अनुसूचित क्षेत्र) अधिनियम 1996 (पेसा)

५.४ वन जमिनीशी संबंधित कायदे - वन हक्क कायदा

५.५ आदिवासी क्षेत्रातील ग्रामसभेची शक्ती

५.६ सारांश

५.७ स्वाध्याय

५.८ संदर्भग्रंथ

## ५.० उद्दिष्टे

१. आदिवासी समाजासंबंधी माहिती करून घेणे.

२. आदिवासी समुदायाच्या जमिनीशी संबंधित कायदे अभ्यासणे.

३. पेसा कायदा-१९९६ अभ्यासणे.

४. वन हक्क कायद्याचे महत्व अभ्यासणे.

## ५.१ प्रस्तावना

नागर संस्कृतीपासून दूर व अलिप्त राहिलेले संबंधित प्रदेशातील मुळचे रहिवासी म्हणजे आदिवासी, असे सामान्यपणे म्हणता येईल. सर्वसाधारणपणे जंगलात, दुर्गम दऱ्याखोऱ्यांत व सुसंस्कृत समाजापासून तुटक असलेल्या प्रदेशात ते तुरळक वस्ती करून राहतात. नागर संस्कृतीचा त्याप्रमाणे वर्गश्रेणीबद्ध समाजाचा संपर्क न झालेल्या वैशिष्ट्यपूर्ण चालीरीती किंवा 'संस्कृती' आदिवासींत आढळतात. अर्थात जगातील सर्व आदिवासी त्या त्या प्रदेशातील मूळ रहिवासी आहेतच, असे ठामपणे म्हणता येत नाही. परंतु दुसऱ्या सर्वमान्य संज्ञेच्या अभावी आदिम संस्कृतीची दर्शक अशी आदिवासी हीच संज्ञा रूढ झाली आहे. अनेक नागर संस्कृतींचे उदयास्त झाले, परंतु त्यांच्याशी संपर्क न साधल्यामुळे किंवा न

munotes.in

आल्यामुळे आदिवासी जमाती जशाच्या तशाच राहिल्या. त्यांच्यात हजारो वर्षे विशेष परिवर्तन झाले नाही.

आदिवासी हा इंग्रजीतील 'ॲबॉरिजिनीझ्' या शब्दाचा रूढ मराठी पर्याय आहे. त्यांना वनवासी म्हणावे, आदिवासी म्हणू नये, असाही एक दृष्टिकोन आहे; आदिवासींची वेगळी अस्मिता किंवा संस्कृती नसून ते इतर नागरिकांप्रमाणेच आहेत, ते वनात वस्ती करून राहतात, एवढाच त्यांचा वेगळेपणा आहे, अशा प्रकारचा हा दृष्टिकोन आहे. बरेच आदिवासी गट डोंगरांतून राहात असल्यामुळे त्यांना अलीकडे गिरिजन म्हटले जाते. एका विशिष्ट आदिवासी गटास जमात म्हणूनही संबोधण्यात येते; उदा., वारली जमात, ठाकूर जमात इ. इंग्रजीत 'ॲबॉरिजिनीझ्' या शब्दाव्यतिरिक्त इतरही काही शब्द आहेत.

'प्रिमिटिव्ह म्हणजे आदिम किंवा अप्रगत लोक आणि 'सॅव्हेज' म्हणजे मागासलेले किंवा रानटी लोक. 'प्रिमिटिव्ह' किंवा 'सॅव्हेज' या शब्दांतून आदिवासींचा मागासलेपणा, अज्ञान किंवा त्यांचा भोळेपणाही सूचित होतो. आदिवासी शब्दास निःसंदिग्ध अर्थ प्राप्त करून देणे, हे मानवशास्त्रातील आजही न सुटलेले कोडे आहे. आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेने आदिवासींना तद्देशीय (इंडिजिनस) संबोधावे अशी शिफारस केली आहे; कारण आदिवासी संस्कृतीची घडण, इतर संस्कृतींच्या संपर्कावाचून स्वतंत्र रीतीने झाली आहे. अलीकडे त्यांना निरक्षर (नॉन्लिटरेट) समाज म्हणून संबोधण्याचीही शिफारस करण्यात येते. आदिवासी बोलींना लिपी नसते.

भारताच्या इतिहासात आदिवासी जमाती स्थानिक राजांच्या वतीने लढल्याची अनेक उदाहरणे आहेत. शिवाजीस रामोशी व कोळी जमातींचे बरेच साहाय्य झाले. आदिवासींची पिळवणूक करणाऱ्यांविरुद्ध बरीच बंडे झाली. १७७८ ते १९४७ च्या दरम्यान आसाम, बिहार, मध्य प्रदेश व आंध्र प्रदेश या राज्यांत सुमारे ७५ बंडे झाली. यांतील अधिकांश ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या विरुद्ध होती. महाराष्ट्रातही भिल्लांनी इंग्रजांविरुद्ध उठाव केला होता. १९५६ ते १९५८च्या दरम्यान ठाणे जिल्ह्यात वारल्यांनी जमीनदारीच्या विरुद्ध बंड पुकारले होते.

## ५.२ आदिवासी समुदायाच्या जमिनीशी संबंधित कायदे



**कहाणी पाचगावची** – ले. मिलिंद बोकील

**५.२.१ आदिवासी समाज ठळक वैशिष्ट्ये** आदिवासी समाजांसंबंधी भरपूर संशोधन व लिखाण झाले असले, तरी आदिवासी या संज्ञेची एकही सर्वमान्य व्याख्या करता आलेली नाही. आदिवासी जमातींची काही ठळक वैशिष्ट्ये अशी:

1. एक एक आदिवासी जमात एका विशिष्ट भूप्रदेशात राहाते व तो भूप्रदेश क्षेत्रफळाच्या दृष्टीने प्रगत समाजाच्या प्रदेशाच्या मानाने लहान असतो. आदिवासी क्षेत्र इतर प्रगत समाजापासून दूर किंवा जंगलात असते. रस्त्यांच्या अभावी तो प्रदेश दुर्गम असतो.

2. आदिवासी जमात साधारणपणे अंतर्विवाही असते व तिचे बहिर्विवाही कुळींत विभाजन झालेले असते. समाजातील गट लहान असतात व ते नातेसंबंधांवर आधारलेले असतात. या गटांचे सदस्यत्व आधुनिक समाजातील मंडळाच्या (क्लब) सदस्यत्वाप्रमाणे ऐच्छिक नसते.

3. प्रत्येक आदिवासी जमातीची स्वतंत्र पंचायत असते. आदिवासी समाजाचे नियंत्रण पूर्णपणे पंचायत किंवा त्यांचा मुखिया करतो.

4. एकेका आदिवासी जमातीची बहुधा स्वतंत्र भाषा वा बोली असते.

5. आदिवासींचा धर्म क्षेत्रीय म्हणजे त्यांच्या निवासस्थानापुरता मर्यादित असतो; त्यांची तीर्थक्षेत्रेही त्यांच्या भागातच असतात.

6. आदिवासी अर्थव्यवस्थेत गटवार श्रमविभाजनाचा वा धंदेवार भिन्न सामाजिक गटांचा अभाव असतो. सर्व लोक सर्व प्रकारची कामे करतात. याशिवाय आदिवासी अर्थव्यवस्थेत उत्पादनाची साधने प्राथमिक स्वरूपाची असतात. पाटावरवंटा, सापळे, जाळी, आकडे, गळ, दोऱ्या, टोकदार व धारदार दांडकी, हातोडा, कोयता ह्यांसारखी प्राथमिक अवजारेच वापरात असतात. अर्थव्यवस्थेतील उत्पादन-वितरण-सेवन या तीन टप्प्यांपैकी वितरण म्हणजे मालाची वा उत्पन्नाची सार्वत्रिक देवघेव, हा टप्पा आदिवासी अर्थव्यवस्थेत नसतो. उत्पादन कमी असल्यामुळे बाजारपेठाही नसतात. जो तो आपापल्या उत्पादनाचा उपभोग घेतो. त्यांची अर्थव्यवस्था बहुधा नाणे इ. चलनावाचून चालणारी व वस्तुविनिमयाधिष्ठित असते. वस्तुविनिमय म्हणजे उपयुक्त वस्तूंची देवघेव.

7. आदिवासी समाजात परंपरेला प्राधान्य असते. परंपरेचा ठेवा एक पिढी दुसऱ्या पिढीस कथा, काव्य, नृत्य इ. माध्यमांद्वारे देते.

8. धर्मात निसर्गपूजेस व जादूसारख्या क्रियाकल्पास महत्त्व असते.

9. आदिवासी समाजात परंपरा व सामाजिक नियंत्रण यांवर भर असल्याने सर्व लोकांच्या वागण्यात सारखेपणा असतो. दैनंदिन व्यवहारातील ठराविक चाकोरीमुळे सवयी व चालीरीती बनतात. एकंदरीत समाजात एकजिनसीपणा जास्त आढळतो.

10. आदिवासी समाज बरेचसे स्वयंकेंद्रित असतात; त्यांचे आर्थिक, सामाजिक व धार्मिक जीवन बाह्यसंपर्कापासून शतकानुशतके अलिप्त राहिल्याने स्वयंकेंद्रितता येणे स्वाभाविक आहे. जगातील सर्व समाज पूर्वी आदिवासी अवस्थेत होते. पुढे ते ग्रामीण



munotes.in

समाज झाले. नंतर राज्यसंस्था आल्यानंतर राजधान्या व व्यापारी पेठा झाल्या व त्यामुळे नागरीकरणास प्रारंभ झाला. औद्योगिक क्रांतीनंतर संपूर्ण नागरीकरणाच्या दिशेने मानवी समाज वाटचाल करू लागले आहेत, असे प्रख्यात मानवशास्त्रज्ञ रॉबर्ट रेडफिल्डचे मत आहे. आधुनिक काळात त्यामुळेच निर्जमातीकरणाची प्रक्रिया सुरू होऊन आदिवासी समाजांचे ग्रामीण समाजावस्थेत रूपांतर होऊ लागले आहे.

## ५.३ पंचायत विस्तार (अनुसूचित क्षेत्र) अधिनियम 1996 (पेसा)

**पेसा कायदा** १९९६ चे मुख्य सूत्र आहे “अनुसूचित क्षेत्राच्या संस्कृती, प्रथा-परंपरा यांचे जतन, संवर्धन व ग्रामसभेच्या माध्यमातून स्वशासन व्यवस्था मजबूत करणे”. **पेसा** कायद्यांतर्गत अनुसूचित क्षेत्रामधील ग्रामसभांचे विशेष अधिकार मान्य करण्यात आले.

पंचायत विस्तार (अनुसूचित क्षेत्र) अधिनियम 1996 (पेसा) हा कायदा २४ डिसेंबर १९९६ रोजी अस्तित्वात आला. या कायद्या अंतर्गत देशातील **एकूण १० राज्यांचा समावेश** होतो. त्यामध्ये- १) महाराष्ट्र २) गुजरात ३) आंध्र प्रदेश ४) मध्यप्रदेश ५) झारखंड ६) ओरिसा ७) छत्तिसगड ८) हिमाचल प्रदेश ९) राजस्थान १०) तेलंगाना या राज्यांनाच पेसा हा कायदा लागू आहे. तसेच, **महाराष्ट्र राज्यातील एकूण १३ जिल्हे** -१) अहमदनगर २) पुणे ३) ठाणे ४) पालघर ५) धुळे ६) नंदुरबार ७) नाशिक ८) जळगाव ९) अमरावती १०) यवतमाळ ११) नांदेड १२) चंद्रपूर 13) गडचिरोली यांना पेसा हा कायदा लागू आहे.

हा कायदा अनुसूचित क्षेत्रातील आदिवाशी लोकांशी संबंधित असून आदिवाशींची संस्कृती, प्रथा, परंपरा यांचे जतन व संवर्धन करणे व ग्रामसभेच्या माध्यमातून आदिवाशींची स्वशासन व्यवस्था बळकट करणे हे पेसा या कायद्याचे प्रमुख सूत्र आहे. या कायद्यान्वये अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभेस अनुसूचित क्षेत्राबाहेरील ग्रामसभेपेक्षा म.ग्रा.पं. अधिनियम १९५८, कलम ५४ ने विशेष अधिकार देण्यात आले आहेत.

**अनुसूचित क्षेत्र कुणाला म्हणायचे?**

देशात विविध भागात राहणाऱ्या वननिवासी जमातींनी इंग्रजांचे प्रशासन स्वीकारले नाही व त्याविरोधात वारंवार लढे दिले. म्हणून इंग्रजांनी या भागात आपली पूर्ण हुकूमत प्रस्थापित करण्याचा हट्ट सोडून दिला. व या भागाला पार्शली एक्स्लुडेड एरिया म्हणजे प्रशासनातून अंशतः वगळलेले क्षेत्र असे नाव दिले. वनांमधील इमारती लाकडाचे अधिकार सरकारकडे ठेवून इतर बाबी वगळल्या. भारतीय राज्यघटना तयार करताना ठक्कर बाप्पा यांच्या अध्यक्षतेखाली एक उपसमिती होती. त्यांनी या अंशतः वगळलेल्या क्षेत्रासाठी स्वतंत्र भारताचे धोरण ठरवले. त्यामध्ये तत्कालीन परिस्थिती लक्षात घेऊन जमिनींचे हस्तांतरण, जमिनींचे वाटप, व सावकारी-कर्ज याबाबत या क्षेत्राला विशेष संरक्षण असावे अशी शिफारस होती. त्यानुसार राज्यघटनेत पाचवी अनुसूची जोडण्यात आली.

**पेसा गाव कुणाला म्हणायचे?**

असे एक अनुसूचित क्षेत्र (गाव किंवा गावांचा गट) त्यांच्या इच्छेनुसार पेसा अंतर्गत गाव म्हणून घोषित होण्यासाठी पेसा नियमात दिलेल्या प्रक्रियेनुसार ठराव करू शकेल.

या अनुसूचीत कोणत्या भौगोलिक क्षेत्रांचा अंतर्भाव करावा अथवा वगळावे हे ठरवण्याचे अधिकार राष्ट्रपतींना देण्यात आले आहेत. 1960-61 साली ढेबर आयोगाने यासंदर्भात संसदेला शिफारस केली की – पाचव्या अनुसूचीत देशातील अशा भागांचा समावेश करावा जेथे

1) पन्नास टक्के किंवा त्याहून अधिक अनुसूचित जमातींची लोकसंख्या असेल.

2) अशा लोकसंख्येचे पुरेसे व सलग भौगोलिक क्षेत्र असेल.


3) विकासाचा अनुशेष असेल.

4) जवळच्या इतर भागाच्या तुलनेत आर्थिक विकासात ठळक विषमता असेल.

वरील चार निकषांनुसार देशातील कोणते तालुके-जिल्हे पाचव्या अनुसूचीखाली येतील हे ठरले. 2013-14 साली केंद्रीय जनजाति मंत्रालयाने यातील दुसऱ्या निकषाबाबत स्पष्टतेसाठी आणखी एक निकष जोडला – 5) प्रशासनिक दृष्ट्या जिल्हा किंवा तालुक्याइतके क्षेत्र असावे.

वरील पाच निकषांनुसार राष्ट्रपतींच्या सही-शिक्क्याने घोषित झालेल्या क्षेत्राला अनुसूचित क्षेत्र म्हणतात.

**अनुसूचित** क्षेत्रात येणाऱ्या ग्रामसभांना विशेष अधिकार**.**




पेसा-ग्रामसभेचे अधिकार


**कहाणी पाचगावची** – ले. मिलिंद बोकील

पंचायतसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रात विस्तार करणे बाबत) अधिनियम 1996, अन्वये अनुसूचित क्षेत्रात येणाऱ्या ग्रामसभांना विशेष अधिकार बहाल केले आहेत. या क्षेत्रात गाव-पाड्यात वस्ती करणारा समाज आता आपल्या पाड्याच्या विकासासाठी परंपरागत रितींच्या आधारे वाटचाल करू शकेल.

munotes.in

25 डिसेंबर 1996 रोजी संसदेने कायदा संमत केल्यानंतर महाराष्ट्र शासनाने त्यानंतर एक वर्ष संपण्याआत महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम 1961 मध्ये कलम 54-क, ख, ग हे बदल केले. मात्र पेसाच्या सर्वंकष अंमलबजावणीसाठी हे बदल पुरेसे नव्हते. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने 4 मार्च 2014 रोजी महाराष्ट्र ग्रामपंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रात विस्तारित करणेबाबत) नियम लागू केले.

<u>जल, जंगल, जमीन व्यवस्थापन</u>




**कहाणी पाचगावची** – ले. मिलिंद बोकील

- <u>दारू नियंत्रण</u>

दारू व मादक द्रव्य नियंत्रण समिती



**कहाणी पाचगावची** – ले. मिलिंद बोकील

- मोहाची दारू, ताडी, माडी, विदेशी दारू या सर्वांबाबत नियम ठरवणे
- परवानाप्राप्त बीअर/दारू विक्रीला परवानगी देणे किंवा नाकारणे
- दारूचा कच्चा माल (गूळ, नवसागर) व दारू भट्टी यांचा साठा करणे किंवा विक्री करणे – यावर बंदी घालणे

munotes.in

- लग्न किंवा सणाचे वेळी मोहाची दारू गाळण्यास व पिण्यास परवानगी देणे किंवा नाकारणे
- दारू किंवा ताडीत भेसळ/ विषारी रसायने वापरण्यावर बंदी घालणे
- दारूबाबतचे नियम प्रसिद्ध करणे, दवंडी देणे

## ५.४ वन जमिनीशी संबंधित कायदे - वन हक्क कायदा

परंपरागत वनांचे रक्षण करण्याचा हक्क हा या कायद्यातील हक्कांपैकी महत्वाचा हक्क आहे. (कलम २(१) व कलम ५). या कायद्यामुळे समूहाला कोणत्याही सामूहिक वन संसाधनांचे रक्षण, पुनर्निर्माण किंवा संवर्ध किंवा व्यवस्थापन करता ठेऊ शकेल. तसेच कोणत्याही जंगलातील झाडे, जैवविविधता, वन्यजीव, पाण्याचे स्रोत इ. चे रक्षण करण्याचे पूर्ण अधिकार त्यात आहेत. समूह त्यांच्या वहिवाटीच्या जंगलाचे तसेच सांस्कृतिक व नैसर्गिक वारसाचे (जसे देवराया, धार्मिक स्थळे इ.) विनाशापासून रक्षण करू शकते.

मात्र, समूदायास कायदेशीर रित्या संरक्षणाचा कोणताच अधिकार नव्हता. ३१ डिसेंबर २००७ पासून या कायद्याच्या कलम ५ अन्वये समूहांना हे हक्क प्राप्त झाले. ग्रामसभा सामूहिक वनसंसाधनाचे वन्यजीवन, वने व जैवविविधता वापरासाठी मुभा व रक्षण व वापरासंबंधीचे नियम करू शकते आणि या नियमांचे पालन होत नसल्यास, ग्रामसभेला योग्य ती पावले उचलण्याचे अधिकारही आहेत (कलम ५ (ड)). म्हणूनच जर वन विभागालादेखील गुरुचरण जमीन किंवा सामूहिक जमिनीवर वृक्ष लागवड करायची असेल तर, या सामूहिक वनसंसाधनांवर असलेले अधिकार समूहाचे आहेत असे म्हणून ग्रामसभा हे काम थांबवू शकतात. जंगल जर खाण किंवा इतर कामांसाठी वापरले जात असेल तर हे जंगल सामुहिक वनसंसाधन आहे व त्याचे मूळ रहिवासाचे स्थान तसेच सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारसाचा भाग असल्याने त्यावर त्याचा हक्क आहे व त्याचे रक्षण करण्याचा त्यांना अधिकार आहे असा दावा ग्रामसभा करू शकते.

याचा अर्थ वनविभाग किंवा सरकार किंवा जंगल लुटारूंनी काहीही ठरवले तरी गाव समूह त्याला विरोध करून गाव समूहाचे निर्णय अंमलात आणू शकतात आणि त्याच्या जंगलाचे रक्षण करू शकतात.

**वन हक्क समितीची कार्ये:**

1. वन हक्क संबंधित दावेदारांचे लेखी अर्ज वन हक्क समितीने स्वीकारणे. वैयक्तिक दाव्यासाठी-(नमुना अर्ज 'अ') व गाव समूहातील सामूहिक वनहक्क दाव्यासाठी-(नमुना अर्ज 'ब'). प्रत्येक अर्जदाराने दाव्यासोबत दोन प्रकारचे पुरावे जोडणे.
2. वन हक्क समितीकडे दाखल झालेल्या प्रत्येक अर्जाची लिखित पोच देणे.
3. प्रकरणाच्या पडताळणीसाठी वन हक्क समितीने दाव्यात नमूद ठिकाणाला भेट देईल. (उदा. हक्क मागितलेल्या जमिनीच्या प्लॉटची पाहणी करेल); तसेच धनगर किंवा भटक्या जमातींच्या आणि आदिम जमातीच्या एखाद्या सदस्यांचा किंवा शेतीपूर्व समुदायांच्या त्यांच्या वस्तिस्थानाबाबतचा अधिकार निश्चित करण्याचा, त्यांच्या समुदायतर्फे पारंपरिक संस्थेतर्फे केलेल्या दाव्यांची पडताळणी असे समुदाय किंवा

त्यांचे प्रतिनिधी असतांनाच केली जाईल याची खात्री करेल या संबंधीची माहिती अर्जदार व वनविभागाला देणे.

4. अर्जदाराने या पडताळणीच्या वेळेस वन हक्क समितीकाळे इतर अधिक पुरावे सादर केल्यास ते स्वीकार करणे.

5. वनहक्क समिती किंवा ग्रामसभा संबंधित अधिकाऱ्याकडे साहाय्य मागू शकते.

   - वनहक्क समिती किंवा ग्रामसभेकडून लिखित मागणी आल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी अशी कागद पत्रे पुरवून समिती सभासदांना आवश्यक वाटल्यास त्यासंवबंधीचा खुलासा द्यायला पाहिजे. अर्थात समितीने मागणी केली नाही तरीही उप विभागीय समितीने वन हक्क समितीला वन व महसूल नकाशे तसेच मतदार इ. माहिती पुरविणे हे त्यांचे कर्तव्य आहे.

6. पुरावा पडताळणीनंतर हक्कदार पात्र आहे किंवा नाही हे ठरवणे. पुढील ३ अटींपैकी कोणत्याही अटीचा भंग होत असल्यास, वन हक्क समिती दावा खोटा असल्याचा ठरविते- अटी

   - योग्य ते पुरावे जोडावेत
   - ग्रामसभेने हक्कासाठीचे अर्ज मागविण्यासाठीचा ठराव संमत केल्यानंतर अशा ठरावाच्या ३ महिन्याच्या आत अर्ज दाखल झाला पाहिजे.(मात्र ग्रामसभेत कारणांची नोंद करून हि वेळ वाढविण्याचा ठराव संमत होऊ शकतो.)
   - हक्कदाराने वैयक्तिक व सामूहिक असे स्वतंत्र दावयाचे अर्ज करावे., समजा एखादा व्यक्ती "अ " गावात राहत आहे व हि व्यक्ती "ब" गावातील हद्दीत जमीन लागवड करीत आहे तर अशा व्यक्तीने "अ " गावाच्या वनहक्क समितीकडे अर्ज करावा,
   - 7. पात्र ठरविल्या जाणाऱ्या प्रकरणासंबंधी समितीने ओळखीच्या खुणा दर्शवित संबंधित जागा या हक्क दर्शविणारा नकाशा बनविने.
   - 8. अर्जदाराची यादी बनवून अशा प्रत्येक दाव्यासंबंधीच्या निष्कर्ष नोंदविणे.
   - 9. अंतिमतः हि यादी व नकाशा ग्रामसभेसमोर विचारार्थ ठेवणे. या बाबतीत अंतिम निर्णय ग्रामसभा करेल व ठराव मंजूर करेल. 10. असा मंजूर केलेला ठराव ग्रामसभा उपविभागीय पातळीवरील समितीकळे पाठवेल.




Aksharnama.com

## ५.५ आदिवासी क्षेत्रातील ग्रामसभेची शक्ती

### आदिवासी स्वशासन कायदा

या कायद्यामुळे आदिवासी भागातील ग्रामपंचायतीना इतर भागातील ग्रामपंचायतीपेक्षा अधिक अधिकार प्राप्त झालेले आहेत. आदिवासी स्वशासन कायद्याचा हेतू आणि त्यांच्या ग्रामसभा व ग्रामपंचायतीना इतर ग्रामपंचायतीपेक्षा अधिक अधिकार देण्यामागील प्रमुख भुमिका खालील प्रमाणे आहे:-

- आदिवासी जनजातींच्या परंपरा आणि रूढी हा त्यांच्या संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे.
- त्यांची सांस्कृतिक वैशिष्टे व जीवनशैली वेगळी आहे.
- सामूहिक साधनसामुग्री हा त्यांच्या उपजीविकेचा मुख्य भाग आहे.
- आणि विवादाचा निर्णय करण्याची रूढ पद्धती व त्याचे पालन करण्याची परंपरा अदयाप कायम आहे.

वरील सर्व बाबींचे संरक्षण व जतन करण्यासाठी ग्रामसभेचे अधिकार व कर्तव्य कायद्यात दिली आहेत. [२ (८अ) पोटकलम १] आदिवासी समाजाची स्वतःची अशी काही सांस्कृतिक वैशिष्टे आहेत. सामूहिक विचार आणि कृती यांचे त्यांच्या समाजजीवनात महत्त्व आहे. व्यक्तीचे स्वास्थ आणि संरक्षण करण्याचे कार्य त्यांच्या या पारंपारिक पद्धतीने केले आहे. जंगल हा आदिवासीच्या जीवनाच्या अविभाज्य भाग आहे. जंगल, जमीन, जल आणि जनावरे यांचा वापर आणि रक्षण ते समाजाच्या हितासाठी सामूहिक प्रयत्नाने करतात. आपापसातील वाद, तंटे-बखेडे यांसाठी ते कोर्ट कचेऱ्यांवर अवलंबून राहत नाहीत. आपले न्यायनिवाडे ते स्वतःच करतात. आदिवासी जीवन व्यवस्थेचे रक्षण करणे म्हणजे त्यांच्या समाजातील ह्या चांगल्या मूल्यांचे व प्रवृत्तीचे रक्षण. त्यातील अनिष्ट चालीरीतींचे संरक्षण असा अर्थ नाही. घटनेतील उदात्त सामाजिक हेतूंशी सुसंगत बाबीचे रक्षण यात अभिप्रेत आहे.

munotes.in

महाराष्ट्राच्या कायदयात न्यायपंचायतींची तरतूद नाही. मात्र इतर राज्यात मर्यादित प्रमाणात आहे. आदिवासी भागात तंटे मिटविण्याची परंपरागत व्यवस्था आहे. ती योग्य रीतीने वापरण्याचा ग्रामसभेला अधिकार आहे.



**कहाणी पाचगावची –** ले. मिलिंद बोकील

## ५.६.सारांश

समाजाच्या मुख्य प्रवाहापासून आजही दूर असलेल्या आदिवासी भागातील नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी, त्या भागाच्या सामाजिक, नैसर्गिक आणि भौगोलिक संपन्नतेसाठी करण्यात आलेला पंचायत विस्तार (अनुसूचित क्षेत्र) अधिनियम (पेसा) कायदा म्हणजे आदिवासी लोकांच्या आयुष्यात सकारात्मक परिणाम करणारा आहे. या लोकांना स्वयंसिद्ध करण्याचा प्रयत्न या कायद्याच्या निर्मितीमागे असून शहरी भागाच्या तुलनेने येथील लोकांना अमर्यादित अधिकारी देण्यात आले आहेत. मात्र, २० वर्षांपूर्वी तयार करण्यात आलेल्या या कायद्याची अद्याप पूर्णपणे माहिती आदिवासी भागातील नागरिकांना नाही. या कायद्याने त्यांना मिळालेल्या अधिकारांती जाणीव त्यांना नाही. त्यामुळे या कायद्याचा प्रचार व प्रसार करणे तितकेच आवश्यक बनले आहे. या कायद्याची अंमलबजावणी झाल्यास निश्चितच हा कायदा वरदान ठरेल.

## ५.७ स्वाध्याय

i) पंचायत विस्तार (अनुसूचित क्षेत्र) अधिनियम 1996 (पेसा) स्वरूप स्पष्ट करा.

ii) वन जमिनीशी संबंधित कायदे - वन हक्क कायदाच्या तरतुदी विशद करा.

## ५.८ संदर्भग्रंथ


- पंचायतसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रात विस्तार करणे बाबत) अधिनियम 1996, *संचालक, मुद्रण व लेखन सामग्री, महाराष्ट्र शासन -२००४*
- *कर्वे, इरावती, मराठी लोकांची संस्कृति, पुणे, १९६२.*
- *महाराष्ट्र लोकसाहित्य समिति, महाराष्ट्र लोकसाहित्य माला, पुष्प चौथे, पुणे, १९६०.*
- *संगवे, विलास, आदिवासींचे सामाजिक जीवन, मुंबई, १९७२.*
- *https://mr.vikaspedia.in/social-welfare*
- *Shri. Sarvesh Kulkarni, Central Right to Information Act 2005*
- *Forest Right Act, Chaudhari Publications*
- *Co-operative Act. 2009 Chaudhari Publications*
- *Biodiversity, Act 2002 Chaudhari Publications*
- *PESA Act 1996 Chaudhari Publications*


❖❖❖❖

munotes.in

# ६

# ग्रामीण भागाशी संबंधित कायदे - II

**घटक रचना**

६.० उद्दिष्टे

६.१ प्रस्तावना

६.२ जैवविविधता कायदा-२००२- नैसर्गिक संवर्धन

६.३ जैवविविधतेस असणारे धोके

६.४ १९०४ वा सहकारी कायदा

६.५ १९१२ सहकारी सोसायटी कायदा

६.६ स्वाध्याय

६.७ संदर्भग्रंथ

## ६.० उद्दिष्टे

१) जैवविविधता संकल्पना जाणून घेणे.

२) जैवविविधता **२००२** व सहकारी कायदा-**१९०४** पार्श्वभूमी अभ्यासणे.

३) सहकारी कायदा-**१९०४ -१९१२** तरतुदींचा अभ्यास करणे.

४) जैवविविधता कायदा- **२००२** तरतुदींचा अभ्यास करणे.

५) जैवविविधता कायदा- **२००२**-सहकारी कायदा**- १९०४** जाणून घेणे

## ६.१ प्रस्तावना

आज अस्तित्वात असलेल्या जैवविविधतेमागे ३५० कोटी वर्षांचा इतिहास आहे. सजीवांची नक्की निर्मिती केव्हा झाली हे जरी वैज्ञानिकाना सांगता आले नाही तरी पृथ्वीच्या उत्पत्तीनंतर वीस ते तीस कोटी वर्षानंतर प्राथमिक रचना असलेले सजीव अस्तित्वात आले यावर वैज्ञानिक ठाम आहेत. साठ कोटी वर्षापूर्वी अस्तित्वात असलेले सजीव आदिजीव, जीवाणू, असे एकपेशीय रचनेचे होते. चोपन्न कोटी वर्षापूवी फॅनरोझोइक कल्पामध्ये झालेल्या कॅब्रियन युगामध्ये जैवविधतेमध्ये प्रचंड वाढ झाली. या प्रकारास कॅब्रियन एक्स्प्लोजन असे म्हणण्याची पद्धत आहे. कॅब्रियन युगामध्ये बहुपेशीय सजीवांची निर्मिती झाली. पुढील ४०कोटी वर्षामध्ये विविधतेमध्ये बहुतांशी अपृष्ठवंशी सजीव अधिक संख्येने होते. याच कालखंडात पृष्ठवंशी सजीव घातीय श्रेणीने वाढत गेले. या वाढीबरोबर



munotes.in

अनेक पर्यावरणीय कारणाने जैवविविधतेचा नाश होत होता. समूह विलोपन क्रियेमुळे जैवविविधतेमध्ये घट आणि वृद्धी हे प्रकार सजीवांच्या निर्मितीपासून चाललेले आहेत. कार्बनिफेरस युगामध्ये झालेल्या विलोपनामध्ये पर्जन्यवने भूपृष्ठाखाली गाडली गेली. या काळात गाडल्या गेलेल्या जीवाश्मांवर उच्च दाब आणि कार्बन वेगळा होण्याच्या प्रक्रियेतून निर्माण झालेले दगडी कोळसा आणि क्रूड ऑइल आजच्या आपल्या इंधनाची ९०% गरज भागवत आहे. पंचवीस कोटी वर्षापूर्वी पर्मियन-ट्रायसिक युगाच्या संधिकालात झालेल्या विघटनाने जैवविविधतेची सर्वाधिक हानी झाली. (या काळात डायनोसॉर नष्ट झाले). या धक्क्यातून सावरण्यास पृष्ठवंशी सजीवाना तीन कोटी वर्षे लागली. गेल्या दोन तीन कोटी वर्षांच्या जीवाश्मांच्या अभ्यासावरून असे आढळून आले आहे की आजच्या एवढी जैवविविधता कधीही अस्तित्वात नव्हती. सर्व वैज्ञानिकांना हे म्हणणे पूर्णपणे मान्य नाही. जीवाश्मीकरण सर्व सजीवांचे कधीही प्रातिनिधित्व करू शकत नाही हा त्यांचा आक्षेप. काही वैज्ञानिकांच्या म्हणण्यानुसार तीस कोटी वर्षापूर्वी आणि आजच्या जैवविविधतेमध्ये फारसा फरक नसावा. सध्याच्या सजीव जातींची संख्या दोन दशलक्ष ते शंभर दशलक्ष एवढी असावी. सर्व पर्यायाचा विचार करून सजीवांची संख्या १३० ते १४० लाखांपर्यंत पोहोचते. यांमधील संधिपाद प्राण्यांची संख्या सर्वाधिक आहे. ज्या ठिकाणी सजीवामध्ये संघर्ष कमी आहे म्हणजे निसर्ग निवडीच्या “फिटनेस” ला (डार्विनचा सिद्धान्त) सामोरे जावे लागत नाही अशा ठिकाणी जैवविविधता वृद्धिंगत होते.

झपाट्याने होणाऱ्या परिसरातील बदलांमुळे सजीव सामूहिकरीत्या लुप्त होतात. एका अंदाजानुसार पृथ्वीवर असलेल्या एकूण सजीवांपैकी एक टक्का सजीव लुप्त झाले आहेत. सजीवांची पृथ्वीवर निर्मिती झाल्यापासून आजपर्यंत पाच वेळा मोठ्या प्रमाणात आणि अनेक वेळा लहान प्रमाणात जैवविविधतेचा नाश झाला आहे. फेनेरोझोइक महाकल्पामध्ये (५४ कोटी वर्षांपूर्वी) जैवविविधतेचा महाविकास ‘कॅम्ब्रियनकल्पामधील विविधतेचा स्फ़ोट’ या नावाने ओळखला जातो. बहुपेशीय सजीवांमधील सर्व संघांची (फायलम) निर्मिती झालेली होती. त्यांपुढील ४० कोटी वर्षांमध्ये जैवविविधतेचा पुन्हा पुन्हा नाश झालेला होता. ‘कार्बोनिफेरस’ युगामध्ये सदाहरित वनांमधील वनस्पति आणि प्राण्यांचा नाश झाला. ‘पर्मियन ट्रायासिक’ युगामध्ये २५ कोटी वर्षांपूर्वी झालेला जैवविविधतेचा नाश सर्वात मोठा होता. तीन कोटी वर्षांपूर्वी पृष्ठवंशी सजीवांनी पुन्हा एकदा आपला जम बसवला. साडेसहा कोटी वर्षांपूर्वी झालेला ‘क्रिटेशियस –टर्शरी विनाश’ हा नजीकच्या काळातील जैवविविधतेचा नाश होय. याच काळात डायनोसॉर नष्ट झाले. जैवविविधतेमध्ये माणसाचा प्रवेश झाल्यानंतर जैवविविधता आणि जनुकीय विविधता हळू हळू नाहीशी होत आहे. यास ‘हॉलोसिन विनाश’ असे म्हटले जाते. मानवी हस्तक्षेपामुळे अधिवास नष्ट झाल्याने जैवविविधतेचा हा ता नाश होत आहे. संयुक्त राष्ट्र संघाने जैव विविधतेच्या नाशाकडे लक्ष देण्यासाठी इसवी सनाचे २०११-२०२० हे दशक जैवविविधता दशक म्हणून जाहीर केले आहे.पूर्वी घराच्या आजूबाजूला वेगवेगळी फळांची व फुलांची झाड लावली जायची जेणेकरून त्यावर पक्षी फुलपाखर बाग्डवीत पण आताच्या सध्याच्या स्तिथीत पाहिलं तर सगळीकड कोंन्क्रीटीकरण वाढलेलं आहे त्यामुळ आजूबाजूला जास्त परिसरच नाहीये व जेवढा आहे तेवढ्यात वेगवेगळी शोची झाड लावली जातात अस जर होत राहील तर त्या फुलपाखरांनी बागडायचं कुठ त्यांनी मध कुठ तयार करायचा?

## ६.२ जैवविविधता कायदा-2002- नैसर्गिक संवर्धन



**६.२.१ प्रस्तावना:** इ.स.१९६८ मध्ये रेमंड एफ दासमान या वन्य जीवांच्या अभ्यासकाने जैवविविधता या शब्दाचा प्रथम प्रयोग केला. हा शब्द त्यानी 'अ डिफरंट काइंड ऑफ कंट्री' या सामान्य वाचकांसाठी लिहिलेल्या पुस्तकामध्ये विविधता टिकवून ठेवण्याच्या संदर्भात वापरला. सुमारे दहा वर्षांतर, म्हणजे १९८० मध्ये विज्ञान आणि पर्यावरण कायद्याचा मसुदा बनवण्याच्या वेळी हा शब्द चांगलाच रूढ झाला होता. थॉमस लव्हजॉय यानी कॉन्झर्व्हेशन बायॉलॉजी या पुस्तकाच्या उपोद्घातामध्ये लिहून तो वैज्ञानिकांच्या समोर आणला. यापूर्वी 'नॅचरल डायव्हर्सिटी-नैसर्गिक विविधता' अशी संज्ञा १९७५ सालापासून वापरात होती. पण १९८०मध्ये रॉबर्ट ई जेनिन्स यानी अमेरिकेत जैविकविविधता असा शब्द रूढ करण्याचा प्रयत्न केला. सध्या अमेरिकेत नॅचरल हेरिटेज असा शब्द वापरला जातो. या शब्दाची व्याप्ती जैवविधतेहून अधिक आहे. यामध्ये भूशास्त्र-जिऑलॉजी आणि भूप्रदेशाचा समावेश केला आहे.

**६.२.२ जैवविविधता संकल्पना:** जैवविविधता म्हणजे विशिष्ट भौगोलिक प्रदेशात अस्तित्वात असलेल्या सजीवांची संख्या आणि विविधता. त्यामध्ये विविध वनस्पती, प्राणी आणि सूक्ष्मजीव, त्यांच्याकडे असलेली जीन्स आणि त्यांच्याद्वारे तयार केलेली परिसंस्था यांचा समावेश होतो. आजच्या या लेखात आपण जैवविविधता काय असते जैवविविधतेचे प्रकार त्याचे महत्त्व आणि त्याचे संवर्धन या सर्वां विषयी माहिती जाणून घेणार आहोत.

जैविक विविधता किंवा जैवविविधता व्याख्येचे अनेक अर्थ निघतात. सामान्य व्याख्येप्रमाणे जैवविविधता म्हणजे जाति विविधता, आणि जातिमधील संपन्नता (जीवशास्त्रीय संपन्नता). जीवशास्त्रज्ञांच्या व्याख्येप्रमाणे " जैवविविधता म्हणजे जनुकांची व्यक्तता, जातीमधील विविधता आणि परिसंस्थेमधील विविधता. जीवशास्त्रीय विविधता म्हणजे व्याख्येप्रमाणे (१). जातीमधील विविधता, (२) परिसंस्थेमधील विविधता आणि (३) जनुकीय विविधता म्हणजे जैवविविधता.

**६.२.३ जैवविविधता कायदा २००२** : हा पर्यावरणाचे **संवर्धन** करण्यासाठी निर्माण करण्यात आलेला **कायदा** आहे. या **कायद्याच्या** माध्यमातून जैवविविधतेचं **संवर्धन** करणं, जैवविविधतेतील स्त्रोतांचा शाश्वत पद्धतीने वापर करणे आणि त्याचा अतिरिक्त वापर टाळणे या गोष्टींवर भर दिला जातो.




### ६.२.४ जैवविविधता विषयक कायदे

- **वन संवर्धन अधिनियम :- 1980 वन अधिकार अधिनियम** हा भारतातील पर्यावरणाचे शाश्वत व्यवस्थापन व स्थानिक लोकसमुहांचे नैसर्गिक साधन संपत्तीवर अधिकार विषयक कायद्यांपैकी एक आहे. याचे अधिकृत नाव *अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्क मान्य करणे) अधिनियम २००६ व नियम २००८, २०१२* असे आहे. ५० टक्के पेक्षा जास्त भूभाग जिथे जंगलाने व्याप्त आहे व १५ ते २० टक्के इतक्या अत्यल्प भूभागावर मागास पद्धतीने केली जाणारी शेती आहे अशा जिल्ह्यांतील लोकांची उपजिवीका परंपरेने व यापुढेही वनावरच अवलंबून असणार आहे. अशा वननिवासी समाजांना **अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वन हक्क मान्यता) अधिनियम -२००६** अंतर्गत सामूहिक वन हक्काच्या माध्यमातून वनाचे व्यक्तिगत व सामुहिक अधिकार दिले गेले आहेत. सरकारद्वारा प्रकाशीत पुस्तिकेत कायद्याची पार्श्वभूमी व प्रधान उद्दिष्टे ज्यातून अंमलबजावणीसाठी व्यापक दृष्टी मिळू शकते,ती खालीलप्रमाणे आहेत –

- हा कायदा अशा वननिवासी अनुसूचित जमाती व पारंपारिक वननिवासींकरीता केला आहे, ज्यांचे वास्तव्य पिढ्यानपिढया जंगलात असूनही त्यांच्या हक्कांची कोणत्याही प्रकारची नोंद घेतली गेली नाही, आणि अधिकारांना मान्यता दिली गेली नाही. असे वनहक्क न्याय्यपणे नोंदवून त्याचे अभिलेख तयार करण्याची रचना निर्माण करून त्यासाठी आवश्यक अशा विविध पुराव्यांचे स्वरुप सुनिश्चित करण्याची हमी हा कायदा देत आहे.

- वनहक्कांमध्ये संसाधनाचे शाश्वत वापरासाठीचे अधिकार व जबाबदारी यांचा समावेश होतो. तसेच वापराच्या क्षेत्रातील जैवविविधतेचे संरक्षण व पर्यावरणाचे संतुलन राखण्याच्या दृष्टीने संवर्धन करण्याचे अधिकार गाव समाजाला देऊन वनव्याप्त क्षेत्राची विकासप्रक्रिया मजबूत केली आहे. त्याचवेळी त्यात सहभागी असलेल्या स्थानिक जनतेची उपजिवीका व अन्न सुरक्षा यांची खात्री हा कायदा देत आहे. अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासींचे त्यांच्या परंपरागत जमिनी व वास्तव्य असलेल्या भूप्रदेशावरील वनहक्क हे ब्रिटीश वसाहतकाळात आणि स्वातंत्र्योत्तर काळातही झालेले बंदोबस्त व इतर धोरणांत योग्य प्रकारे मान्य न केल्यामुळे या वननिवासी वर ऐतिहासिक अन्याय झाला आहे. कारण वननिवासींचे जीवनच मुळी

`वन` या पर्यावरणीय परिसंस्थेच्या अस्तित्वाशी व त्याच्या टिकावू विकासाशी एकात्म झालेले आहे.

- अशाप्रकारे प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असलेल्या हक्कांविषयीची असुरक्षिततेची भावना योग्यप्रकारे संबोधित करून ती दुर करणे हे अत्यंत आवश्यक झाले आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विकासाच्या योजनांमुळे जबरदस्तीने ज्यांचे त्यांच्या उपजिवीका क्षेत्रामधुन विस्थापन झाले अशांनाही न्याय देणे हे कायद्याचे उद्दिष्ट आहे.

- ज्या ज्या वनहक्कांपासून वंचित ठेवल्यामुळे वननिवासींवर ऐतिहासीक अन्याय झाला, त्या वनहक्कांना मान्यता देऊन तो अन्याय दूर करण्याचे मुख्य ध्येय कायद्याच्या वरील प्रस्तावनेतून स्पष्ट होते. वनाजवळ परंपरागत वास्तव्य असणाऱ्या गावसमाजांची शाश्वत उपजिवीका व विकास हा परंपरेने वापरात असलेल्या सामूहिक वनस्त्रोतांवरच अवलंबून आहे. म्हणूनच वौयक्तिक हक्कांपेक्षा अधिक महत्व व प्राधान्य हे सामूहिक वन हक्काच्या अंमलबजावणीला नियमांतही दिलेले आहे. परंतु दुर्दैवाने लोकांचा व शासन यंत्रणेचा सारा भर हा फक्त वैयक्तिक जमिनीच्या (पट्टा) दाव्यावर आहे. सामूहिक वनहक्क म्हणजे गावातील शाळा, दवाखाने यासारख्या सार्वजनिक वापराच्या जागांचा हक्क असा चुकीचा समजही सर्व ठिकाणी पसरला आहे.

- वननिवासी गावसमाज हे परंपरेने सामूहिक हक्कांचा उपभोग घेत आहेत, त्यांचे अस्तित्वच मुळी त्यावर टिकून आहे. अर्थात आता हे वनहक्क शासनाकडे मागायचे किंवा त्यासाठी प्रस्ताव करायचा असे नसून कायद्यात म्हटल्याप्रमाणे आपण त्यावर दावा करायचा व शासनाने त्याला मान्यता द्यावयाची आहे. तरी अशा क्षेत्रांतील ग्रामसभांनी जागृत होऊन तातडीने सर्वांच्या सहभागाने कायद्याची समज बनविणे, सामूहिक वनसंसाधनांचे क्षेत्र निश्चित करणे, दावा तयार करण्यासाठी आवश्यक माहिती व कागदपत्र मिळविणे, अभ्यासगट तयार करून सर्व महसूल / वन अभिलेख वाचणे इत्यादी प्रक्रिया सुरू करणे अत्यावश्यक आहे.

**पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986-**

- पर्यावरण संरक्षण अधिनियम कायदा 23 मे 1986 ला संमत करण्यात आला.
  19 नोव्हेंबर 1986 पासून लागू करण्यात आला. मानव, प्राणी, जंगले इत्यादींचे पर्यावरणीय संरक्षण आणि संकटापासून रक्षण करण्याच्या हेतूने कायदेशीर तरतुदी करण्यासाठी आणि पर्यावरण संरक्षण प्राधिकरण निर्मिती आणि त्यांच्या कार्यात समन्वय निर्माण करण्याच्या उद्देशाने हा कायदा संमत करण्यात आला.

- हा कायदा एकूण चार विभाग आणि 26 कलमांमध्ये विशद केलेला आहे.

**पर्यावरण संरक्षण अधिनियम ऐतिहासिक पार्श्वभूमी-**

- या कायद्याच्या पाठीमागे फार मोठी पार्श्वभूमी आहे.
  5 जून 1972 रोजी संयुक्त राष्ट्र संघटनेने स्टॉकहोम येथे मानव पर्यावरण परिषद आयोजित केली होती. या परिषदेत भारताने देखील भाग घेतला. या परिषदेने पर्यावरण

संरक्षणाबद्दल कायदे करण्यासाठी सदस्य राष्ट्रांनी पावले उचलावीत असे आवाहन केले होते. या परिषदेच्या प्रभावाने भारत सरकारने हा कायदा केला.

- 1984 मध्ये भोपाळ शहरात युनियन कार्बाइड कारखान्यातील विषारी वायू गळतीमुळे मोठ्या प्रमाणावर जीवित आणि वित्तहानी झाली. या घटनेमुळे पर्यावरण संरक्षण कायदा करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर भारत सरकारवर दडपण आल्यामुळे राजीव गांधी पंतप्रधान असताना हा कायदा केला गेला.

**पर्यावरण संरक्षणाबद्दल घटनात्मक तरतुदी-**

- घटनेच्या 253 व्या कलमानुसार आंतरराष्ट्रीय कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी कायदा करण्याचा अधिकार संसदेला बहाल केलेला आहे याच कलमाच्या आधारावर पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 संमत करण्यात आला.
- घटनेच्या कलम 48(A) नुसार राज्य पर्यावरणाचे संरक्षण आणि सुधारणा तसेच देशातील जंगले आणि वन्यजीवांचे संरक्षण करण्यासाठी प्रयत्न करेल
- कलम 51 (A) नुसार प्रत्येक नागरिक पर्यावरणाचे रक्षण करेल.
- घटनेतील वरील कायदेशीर तरतुदींमुळे पर्यावरण संरक्षण कायदा संमत करण्याच्या प्रक्रियेला बळ मिळाले.

**पर्यावरण संरक्षण कायद्यातील तरतुदी-**

- कलम 1 -नुसार हा कायदा संपूर्ण भारतासाठी लागू असेल.
- कलम 2-मध्ये पर्यावरण, पर्यावरणीय प्रदूषण, घातक वस्तू, व्यापार इत्यादींच्या व्याख्या दिलेल्या आहेत
- कलम 3- मध्ये पर्यावरण प्रदूषण, पर्यावरणीय सुधारणा व कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याचा आणि पर्यावरणीय गुणवत्ता टिकवण्यासाठी मापदंड निश्चित करण्याचा अधिकार सरकारला दिलेला आहे.
- कलम 4 ते 6 मध्ये पर्यावरण संरक्षणासाठी नेमलेल्या अधिकाऱ्यांचे अधिकार आणि जबाबदारी यांचे वर्णन केलेले आहे.
- कलम 8 ते 17 मध्ये पर्यावरण प्रदूषण प्रतिबंध, नियंत्रण आणि सुधारणा विषयक तरतुदी आहेत.
- कलम 18 ते 26 मध्ये पर्यावरणाच्या संबंधातील गुन्हा दाखल करण्यासंबंधी तरतुदी दिलेल्या आहेत.

**पर्यावरण संरक्षण कायद्याची वैशिष्ट्ये-**

- या कायद्याने केंद्र सरकारला राज्य सरकारांच्या सहकार्याने पर्यावरण संरक्षण आणि सुधारणा करण्याच्या हेतूने आवश्यक उपाययोजना करण्याचा अधिकार दिलेला आहे,
- पर्यावरण प्रदूषण, प्रतिबंध आणि नियंत्रणाबाबत देशव्यापी कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याचा अधिकार केंद्र सरकारला दिलेला आहे.

munotes.in

- पर्यावरण संरक्षण आणि व्यवस्थापनासाठी केंद्रीय पातळीवर रचनात्मक यंत्रणेची उभारणी करण्याचा अधिकार केंद्राला दिलेला आहे.
- पर्यावरण संरक्षणासाठी व्यापक नियमावलीची निर्मिती करण्याचा केंद्र सरकारला अधिकार दिला आहे.
- पर्यावरण संरक्षणाची संबंधित नियम आणि कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यास व्यक्ती आणि संस्थेस शिक्षा देण्याचा अधिकार शासनाला दिलेला आहे. उदा. पाच वर्षे शिक्षा किंवा एक लाख रुपयांपर्यंतचा दंड
- पर्यावरणासाठी धोकेदायक ठरणाऱ्या उद्योगांचे परीक्षण करण्याचा अधिकार शासनाला दिलेला आहे.
- प्रदूषण नियंत्रण मंडळ स्थापना करण्याची शिफारस करण्यात आलेले आहे.
- पर्यावरण प्रदूषण नियंत्रण, सुरक्षितता आणि आरोग्य संवर्धनासाठी अनेक महत्त्वपूर्ण तर तुदी कायद्यात केलेले आहेत.
- सजीव प्राणी, वनस्पती आणि इतर साधनसंपत्तीच्या रक्षणासाठी तरतुदी करण्याचा अधिकार शासनाला दिलेला आहे.
- पर्यावरणीय प्रदूषणाबाबत मानके निश्चित करण्याचा अधिकार सरकारला या कायद्याने दिलेला आहे.
- पर्यावरणीय प्रयोगशाळा उभारणे, पर्यावरण संरक्षण आणि सुधारणेसाठी संशोधनाची जबाबदारी प्रयोगशाळांकडे सोपवण्यात आलेली आहे. पर्यावरण संदर्भातली माहिती जमा करण्याची जबाबदारी त्यांच्याकडे सोपवण्यात आली.

निसर्गाची एकतर्फी लूट न करता त्यांचे संवर्धन व संरक्षण करून निसर्ग आणि मानव यात सुसंवाद निर्माण करणे हे पर्यावरण चळवळीचे मुख्य ध्येय आहे.

## ६.३ जैवविविधतेस असणारे धोके

सध्याचा जाति विलोपनाचा वेग वाढला आहे. हा वाढलेला वेग ध्यानात घेतला तर कित्येक जाति ओळखण्याआधी विलुप्त होण्याची शक्यता अधिक आहे.गेल्या शतकात जैवविविधतेमधील घट मोठ्याप्रमाणात लक्षात आली. २००७मध्ये जर्मन फेडरल प्रशासनातील एक मंत्री सिग्मार गॅब्रिएल यानी सध्या अस्तित्वात असलेल्या प्रजातीमधील ३०% प्रजाति २०५०पर्यंत नष्ट होतील असे विधान केले. यापैकी ठाऊक असलेल्या वनस्पतींपैकी एक अष्टमांश विलोपनाच्या मार्गावर आहेत. हा विलोपनाचा वेग दरसाल १,४०,००० जाती एवढा प्रचंड आहे. हा धोका मुख्यत्वेकरून पर्यावरणातील असंतुलित बदलांमुळे आहे. आजपर्यंत कधी नव्हे एवढ्या वेगाने विलोपनाचा वेग वाढला आहे यावर बहुतेक वैज्ञानिकांचे एकमत झाले आहे.

अधिवास नाहिसा होणे, अतिशिकार, नव्या अधिवासात नव्या जातींचा प्रवेश, आणि द्वितीय विलोपन यामुळे जैवविविधतेस धोका उत्पन्न होतो असे जेअर्ड डायमंड या निसर्गतज्ज्ञाने वर्णन केले आहे. एडवर्ड ओ विल्सन यानी जैवविविधतेच्या घोक्याचे संक्षिप्त रूप हिप्पो असे केले आहे. हॅबिटॅट डिस्ट्रक्शन(अधिवास नाश), इन्व्हॅझिव स्पिशीज(नव्या ठिकाणी नको

munotes.in

त्या जातीचा प्रवेश), ह्यूमन ओव्हर पॉप्युलेशन(मानवी लोकसंख्येची वाढ) आणि ओव्हर हार्वेस्टिंग(कृषि क्षेत्राची अनिर्बंध वाढ) असे केले आहे. "इंटरनॅशनल युनियन ऑफ कॉंझरव्हेशन ऑफ नेचर"(आययूसीएन) या आंतरराष्ट्रीय संघटनेनुसार हे सर्व जैवविविधतेचे प्रत्यक्ष धोके आहेत.

जैवविविधता विलोपनामध्ये अधिवास बदल किंवा अधिवास नाहीसा होण्याचा मोठा धोका उद्भवतो. सहाहरित जंगलामध्ये होत असलेली वृक्षतोड, लोकसंख्या वाढ, जंगलाच्या जमिनीमध्ये खाणकाम, हवा प्रदूषण, मृदा प्रदूषण आणि जलप्रदूषण याशिवाय जागतिक हवामान वाढ या सर्वाचा अधिवास बदलाशी संबंध येतो. अधिवासाचे क्षेत्रफळ आणि त्या अधिवासामध्ये असणाऱ्या जातींची संख्या परस्परांवर अवलंबून आहेत. त्यांतल्या त्यात आकाराने मोठ्या जाति व समुद्रसपाटीलगत असणाऱ्या जंगलातील जाति-अधिवासबदलास संवेदनक्षम आहेत. दक्षिण भारतातील सलग जंगलांचे पट्टे नष्ट झाल्याने पश्चिम घाट जंगलामधील हत्ती उन्हाळ्यात पीक क्षेत्रामध्ये घुसतात. ऊस हे त्याना त्यांचे नैसर्गिक खाद्य वाटल्याने ते तेथेच राहतात. त्याना हुसकून लावण्याचा प्रयत्न केल्यास ते परत परत तेथेच येत राहतात. मोठ्या प्रमाणात वृक्षतोड झाल्यानंतर पुनर्वनीकरणामध्ये अस्तित्वात असलेल्या सर्व वनस्पति परत कधीच लावता येत नाहीत. एकाच प्रकारच्या वृक्षांचे पट्टे लावण्याने त्या परिसरामध्ये असलेली विविधता नष्ट होते. नॅशनल सायन्स फाउंडेशन यानी केलेल्या २००७ मधील अभ्यासामधून असे समजले की जैवविविधता आणि जनुकीय विविधता यांचा परस्पर संबंध आहे. जातींमधील विविधतेसाठी जातींमध्ये जनुकीय विविधता असणे आवश्यक आहे. एका घटकाचा अभाव म्हणजे दोन्हीमधील संतुलन संपणे. अशा वेळी परिसरामध्ये एकच जाति प्रबळ ठरते. पाळीव प्राण्यांच्या बाबतील हे सहज समजून येते. पशुपालनासाठी राखीव कुरणे म्हणजे फक्त दूध किंवा मांसासाठी जनावरे पाळणे. हाच प्रकार कृषिव्यवस्थेमध्ये घडतो. उत्पादन घटण्याच्या भीतीने दुसरी वनस्पति म्हणजे तण शेतामध्ये वाढू दिले जात नाही.

## ६.४ सहकारी कायदा-१९०४

**प्रस्तावना:**स्वातंत्र्यपूर्व काळात म्हणजेच १९व्या शतकाच्या अखेरीस भारतात सहकारी चळवळीथा उगम झाला. सर फ्रेडरिक निकोलसन यांनी भारतात कृषी वित्तपुरवठा करणाऱ्या सहकारी सोसायट्या स्थापन कराव्यात अशी शिफारस आपल्या अहवालात केली होती. या अहवालाये कामकाज चालू असतानाच अपनरेवा नावाच्या उच्च शासकीय अधिकाऱ्यास पंजाब आणि बंगाल राज्यातील निवडक जिल्ह्यांत भूका स्थापन करण्यास पुढाकार घेण्यास सांगण्यात आले होते. त्याने १९०० साली (Peoples Bank for Northern India) या नावाचे पुस्तक लिहिले. निकोलसन यांनी याच धर्तीवर काही भूविकास बैंका सुरू केल्या. पुढे सरकारने स्वतः पुढाकार घेऊन सहकारी संस्था स्थापन करायचे ठरवले. त्यानुसार सहकारी संस्थांसाठी अनुकूल कायदा करण्याची गरज भासू लागली, निकोलसन, मधुपरनेक्स याचे अनुभव, तसेच संस्थांच्या प्रतिनिधींच्या अनुभवाचा विचार करून भारतातील ग्रामीण आणि शहरी भागात सहकारी संस्था स्थापन करण्यासंबंधी एक मसुदा तयार करण्यात आला. या मसुद्यारी पुढे कायचात रूपांतर करण्यात आले हा कायदा म्हणजे १९०० चा पतसंस्था निर्माण करण्याचा कायदा होय. या कायद्यानुसार सहकारी संस्थांचे ग्रामीण आणि शहरी असे दोन प्रकारे वर्गीकरण करण्यात

आले. ग्रामीण भागात सहकारी पतसंस्था किंवा इतर प्रकारच्या संस्था स्थापन करताना मर्यादित देवता तत्त्वावर स्थापन कराव्यात. शहरी भागातील सहकारी संस्थांना असे बंधन घालण्यात आले नाही. खाजगी संस्थांप्रमाणे सहकारी संस्थांना मर्यादित प्रमाणात कायदेशीर दर्जा देण्यात आला. स्वतःचे भांडवल आणि इतर निधी उभारण्यास परवानगी देण्यात आली. सभासदांनी वैयक्तीक आणि पुरेशा तारणावर कर्जपुरवठा करण्याची परवानगी या कायद्याने सहकारी संस्थांना देण्यात आली.

**सहकाराची संकल्पना** सहकार हे (co-operation ) या इंग्रजी शब्दाचे भाषांतर आहे. (co-operari) या लॅटिन शब्दापासून (co-operation) हा शब्द बनला आहे. या दोन्ही शब्दाचा अर्थ एकत्रित काम करणे किंवा परस्पर सहकार्याने काम करणे असा होतो. सहकार ही लोकशाही, चारित्रा, भाव शांतता आणि प्रगती या अधिष्ठानावर आधारलेली अशी एक आदर्श समाज व्यवस्था आहे की, जिच्यामध्ये समान निष्ता असनारे लोक आपल्या कल्याणासाठी एकत्र येत असतात.

१) व्ही. एल. मेहतासमान आर्थिक उद्दिष्ट साध्य करण्याकरिता समान गरज असणाऱ्या अनेक व्यक्ती स्वखुशीने ज्या चळवळीत सामील होतात त्यास सहकार असे म्हणतात.

२) हेनी कल्बर्टराहकार हा संघटनेवा असा प्रकार आहे ज्यामध्ये व्यक्ती स्वेच्छेने आणि मानव म्हणून एकत्र येतात आणि मानवतेच्या तत्वाध्या आधारे आपले आर्थिक हितसंबंध सुधारतात.

३) प्रो. पॉल लेबर्टसहकार ही स्वतः उपयोग करणारांनी स्थापन आगि नियंत्रित केलेली संस्था आहे. या संस्थेमध्ये लोकशाहीचे नियम पाळले जातात. ही संस्था सभासदांची आणि समाजाची सेवा करते.

**सहकाराची वैशिष्टे**

व्याख्यांवरून सहकाराची वैशिष्टे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. सहकार ही काही व्यक्तींची संघटना आहे.

२. आर्थिकदृष्टा दुर्बल घटकांनी एकत्रित येऊन सहकारी संस्था स्थापन करून सहकाराचा पाया घातला आहे.

३. सहकाराची स्थापना संयुक्त सहकाराची स्थापना संयुक्त व्यवहारातून होते.

४. सहकारी संस्थेचा कारभार निःस्वार्थी भूमिकेतून केला जातो.

५. सहकारी संस्थेची जबाबदारी सर्व सभासदांवर असते.

६. सभासदांना त्यांनी संस्थेशी केलेल्या व्यवहाराच्या प्रमाणात लाभ दिला जातो.

७. सहकार म्हणजे स्वेच्छेने एकत्रित आलेल्या व्यक्तींची संघटना आहे.

८. आर्थिकदृष्टा दुर्बल घटकांसाठी सहकार चळवळ उपयोगी आहे.

९. सभासदांना सहकारामध्ये समान दर्जा प्राप्त होतो त्यांची उद्दिष्टे समान असतात. सहकारामध्ये समानता महत्त्वाची आहे.

१०. सहकारामध्ये लाभापेक्षा स्वावलंबन, सेवाभाव आदी तत्त्वांवर प्राधान्य देण्यात येत

११. सहकारमध्ये नीतिमूल्यांना विशेष स्थान आहे.

१२. सहकार म्हणजे सामाजिक व आर्थिक परिवर्तनाची चळवळ आहे.

१३. सहकारी संस्थेचा मुख्य उद्देश संस्थेच्या सभासदांचे आर्थिक हित जोपासणे.

१४. सहकारी संस्थेचा कारभार लोकशाही पद्धतीने चालतो आणि एक व्यक्ती एक मत हे तत्त्व पाळले जाते.

१५. भांडवलशाही अर्थव्यवस्थेला पर्याय म्हणून सहकार चळवळ उदयास आली. मोठ्या प्रमाणात वाढली.

१६. सहकाराच्या माध्यमातून सभासदांचा सर्वांगीण विकास होतो / होऊ शकतो.

१७. सहकार चळवळीच्या माध्यमातून सभासदांना बचत, आर्थिक काटकसर यांची शिकवण देण्यात येते आणि ही शिकवण प्रत्यक्ष अनुभवातून मिळते.

१८. सहकार चळवळ ही मानवनिर्मित मानवहिताची चळवळ आहे.

१९. सहकारामध्ये सभासदांची जात, धर्म, पंथ, गरीब, श्रीमंत असा भेदाभेद करण्यात येत नाही.

२०. सहकार हा भांडवलशाही अर्थव्यवस्था आणि समाजवादी अर्थव्यवस्था यांना जोडणारा महत्त्वपूर्ण आर्थिक दुवा आहे.

२१. सहकार संदर्भात अनेक प्रकारचे कायदे कालानुरूप तयार करण्यात आले आसून, त्यामध्ये परिस्थितीनुरूप बदल करण्यात आलेला / झालेला आहे.

**सहकाराचे ग्रामीण विकासातील महत्त्व**

शोषणमुक्त समाज निर्माण करणे, गरजू आणि दुर्बल घटकांना एकत्रित करून संघटनेच्या माध्यमातून आवश्यक त्या सेवा उत्पादन हाती घेणे 'ना नफा ना तोटा' या तत्वावर चालविणे. सर्व गरजूंना मुक्त प्रवेश देणे, लोकशाही पद्धतीने कारभार चालविणे या मूलसिद्धांतावर सहकारी चळवळ आधारित आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत सहकारी चळवळीचे स्थान व सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेत, समाजवादी समाजरचनेच्या ध्येयानुसार खाजगी व सार्वजनिक उपक्रमाबरोबर ,सहकारी अर्थव्यवस्थेचाही मोठा वाटा आहे. सहकारी चळवळीतील सहकारी पतपुरवठा दुग्धउत्पादन, साखरउत्पादन, कृषीमालाचे उत्पादन, कृषी मालाचे विपणन, सहकारी गृहनिर्माण संस्थांबरोबरच मजूर, जंगल कामगार, आदिवासी, मच्छीमार, बदकेपालन, ससेपालन यांसारख्या दुर्बल घटकांच्या सहकारी संस्थांनी कृषिग्रामीण व नागरी भागाच्या विकासात मोलाची भर टाकली आहे.

सहकारी संस्था आपल्या सदस्यांच्या सामाजिक गरजांकडे वाढत्या प्रमाणात लक्ष घालू लागल्या आहेत. बालस्वास्थ्य व वृद्धांसाठी दिवसभराची काळजी घेणाऱ्या केंद्राची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. अशा संस्थांना आवश्यक ते अर्थसाहाय्य व सुविधा पुरविण्याचा प्रयत्न सहकारी ग्रामीण व नागरी समाजामध्ये क्रीडास्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून संपूर्ण समाजाचे जीवन समृद्ध करू लागल्या आहेत.

आर्थिक क्षेत्रात पिळवणूक करणाऱ्या वाढत्या विघातक प्रवृत्तींना आळा घालण्याचे आणि ग्रामीण भागातील लोकांचे विशेषतः कमकुवत वर्गाचे हितरक्षण करण्यासाठी सहकारी चळवळ ही एक प्रभावी आघाडी बनत चालली आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या मालाची योग्य किंमत मिळवून देण्याच्या दृष्टीने सहकारी संस्थांची भूमिका अधिक महत्त्वाची ठरली आहे.

आपापल्या क्षेत्रामध्ये सहकाराने स्वतःचे संघटन निर्माण केलेले आहे. सहकारी संस्था या स्थानिक लोकांनी निर्माण केलेल्या असून सहकारात असलेल्या संस्थेचा मालक म्हणजे सभासद होय. संस्थेचा कर्मचारीवर्ग हा स्थानिक असून त्यांना संस्थेच्या अडीअडचणी व संस्थेच्या बलस्थानाची चांगली माहिती असते. इतर सहकारी संस्थांबरोबरच दैनंदिन गरजेच्या स्वच्छ व निर्भेळ वस्तू ग्राहकांना वाजवी किमतीत कशा प्राप्त होतील यासाठी ग्राहक भांडाराच्या माध्यमातून काही सहकारी संस्था कार्यरत आहेत. सुशिक्षित लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी संस्था कार्य करीत आहेत.

आज महाराष्ट्रामध्ये समाजजीवनाच्या विविध अंगांमध्ये सहकार चळवळीने पदार्पण केले आहे. ग्रामीण शेती सेवा, सहकारी संस्था, दुग्धव्यवसाय संस्था, शेती, पाणीपुरवठा संस्था, सहकारी साखर कारखाने, सुतगिरण्या, विविध प्रकारच्या औद्योगिक सहकारी संस्था, ग्राहक भांडारे, गृहबांधणी संस्था अशा अनेक प्रकारच्या सहकारी संस्था कार्यरत आहेत.

आज आपल्याकडे विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात ग्रामीण विकासामध्ये सहकारी चळवळीचे स्थान फार मोठे आहे. शेती आणि ग्रामीण विकासाची जबाबदारी असलेल्या शासनाच्या कामगिरीपेक्षा महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासात सहकारी चळवळींचा सिंहाचा वाटा आहे. सहकारी यंत्रणेद्वारा प्रत्यक्ष शेतकऱ्याचा सहभाग ग्रामीण विकासात महत्त्वाचा ठरला आहे. शासनाच्या विकास योजनांचा पुरेपूर फायदा घेण्यासाठी सहकारी यंत्रणा अधिक उपयोगी ठरते. जेथे सहकाराचा अभाव असेल तर तेथे शासनही अपुरे पडते. शासनाने पूर्ण केलेल्या विकास योजनांचा काही वेळा पाठपुरावा न केल्याने अशा योजना भविष्यामध्ये बंद पडतात. म्हणून ग्रामीण भागात सहकार चळवळ समर्थपणे उभी राहिली पाहिजे.

पश्चिम महाराष्ट्रात गावागावांतून विविध कार्यकारी शेती सेवा संस्था उत्तमरीतीने कार्य करीत आहेत. शेतकरी सभासदांच्या सर्व प्रकारच्या गरजा सहकारी संस्थांमार्फत भागविण्याचे कार्य या संस्था पार पाडीत आहेत. ग्रामीण समाजामध्ये असे एकही क्षेत्र नाही की ज्याला सहकार चळवळीने स्पर्श केलेला नाही. शेतीसाठी खते, औषधे, कीटकनाशके, अवजारे, जीवनोपयोगी वस्तू वगैरे सर्व सेवा सहकारी संस्थांमार्फत पुरविल्या जातात. तसेच अल्प, मध्यम व दीर्घ मुदतीचा कर्जपुरवताही मोठ्या प्रमाणात सेवा सहकारी संस्थांमार्फत केला जातो. त्याचप्रमाणे दुग्धव्यवसाय व उपसासिंचन योजनाद्वारे शेतीसाठी पाणीपुरवठा करण्याचे महान कार्यही सहकारी संस्थाच करीत आहेत. गूळउत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यासाठी सहकारी गुऱ्हाळ घर, मार्केटिंगसाठी खरेदी-विक्रीसंघ, सहकारी साखर कारखाने व उसापासून उपपदार्थ बनविण्यासाठी सहकारी अर्कशाळा, कागद कारखाने किंवा विविध उपयोगी रसायने तयार करणारे कारखानेही उभारले जात आहेत. शेतीला संलग्न अशा प्रकारची यंत्रणा सहकारी तत्त्वावर आज वापरली जात आहे. सहकार चळवळीशिवाय ग्रामीण भागातील असंघटित दुर्बल व छोट्या शेतकऱ्यांना स्पर्धेच्या या

आधुनिक युगात वाटचाल करणे केवळ अशक्य झाले असते म्हणून सहकार चळवळ हा शेतीनिष्ठ ग्रामीण समाजाचा आधारस्तंभ ठरला आहे.

## ६.५ सहकारी कायदा-१९१२

सहकारी चळवळीची बाप्ती आणि कार्यक्या वादविणे महत्त्वाचे होते तसेच सहकारी संस्थांना संरक्षण देणेही तितकेच महत्त्वाचे होते. याकरिता १९१२ साली सहकारी सोसायटीचा दुसरा व्यापक स्वरूप असलेला कायदा देशात पास करण्यात या कायद्याची वैशिष्ट्ये

१) सभासदांच्या आर्थिक गरजांची पूर्तता करणारी आणि निष्ठांची जोपासना करगारी कोणत्याही प्रकारची (उदा. पतपुरवठा, ग्राहक भांडारे, विक्री व्यवस्था, उत्पादन संस्था वगैरे) सहकारी संस्था स्थापन करता येईल.

२) १९०४ च्या कायद्यातील सहकारी संस्थांचे ग्रामीण व नागरी हे वर्गीकरण र करण्यात येऊन त्याऐवजी त्यांचे स्वरूप सभासदांना असणाऱ्या देयता तत्वानुसार ठरविण्यात आले. त्यानुसार सहकारी संस्थांचे संघ (federation) किंवा युनियन अशा उच्चस्तरिय सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या अशा उच्चस्तरिय किंवा केंद्रीय सहकारी संस्थांचे स्वरूप मर्यादित तत्त्वावर होते.

३) स्थानिक सरकारांना सहकारी संस्थांचे नियम आणि पोटनियम तयार करण्याची परवानगी देण्यात आली.

४) पतपुरवठा संस्थांबरोबर विगर पतपुरवता संस्थांची नोंदणी करण्यास कायद्याने मान्यता देण्यात आली.

५) या कायद्याने प्राथमिक सहकारी बैंकाया संघ तयार करून त्यांची शिखर जैक म्हणून मध्यवर्ती सहकारी बँकेच्या स्थापनेची शिफारस करण्यात आली.

६) या कायद्यानुसार जबाबदारीचे तत्व स्वीकारण्यास आले यात मध्यवर्ती बँका मर्यादित जबाबदारीच्या तत्वानुसार चालतील तर प्राथमिक सहकारी बैंका अमर्यादित तत्वानुसार चालतील अशी सूचना करण्यात आली.

७) सहकारी संस्थेच्या सभासदावर भाग खरेदीची मर्यादा घालून जास्तीत जास्त रु. १०००/ अथवा एकूण भागोडवलापैकी १/५ ऐवढे भाग खरेदी करता येतील, अशी अट घालण्यात आली.

८) सहकारी संख्येने आपल्या नफ्याच्या ११४ माग राखीव निधीत जमा करणे अत्यावश्यक तरविण्यात आले. यामुळे सहकारी संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ शकतील.

९) सभासदाने कर्ज घेतले असेल आणि त्याच्याकडून सदर कर्जाधी वेळेत परतफेड होत नसेल. अशा परिस्थितीत त्याच्या भागभांडवलावर आणि ठेव रकमेवर सहकारी संस्थेची मालकी राहील.

१०) १९०० च्या सहकारी संस्था कायद्याप्रमाणे या कायद्यातही सहकारी संस्थांना प्राप्तीकर नोदणीशुल्क, मुद्रांक शुल्क इत्यादीबाबत सूट देण्यात येईल अशी तरतूद करण्यात आली.

११) सहकारी संस्थांच्या सभासदांनी खरेदी केलेले भाग न्यायालयात जप्त करता येणार नाहीत. असे कायद्यात नमूद करण्यात आले.

१२) १९०४ च्या सहकारी संस्था कायद्यातील हिशोब तपासणी नियंत्रण व इतर मूळ तरतुदी याही कायद्यात तशाच ठेवण्यात आल्या.

१९१२ च्या सहकारी कायद्याचे खास वैशिष्टा महणजे सहकारी संस्थांच्या उच्चस्तरीय स्था निर्माण झाल्या आणि सोसायटीच्या विभागणीचा ग्रामीण अणि शहरी असा प्रादेशिक निधर्ष र होऊन जबाबदारीचे देयता तत्व लागू करण्यात आले. या कायद्यामुळे सहकारी संस्थांच्या वाढीस चालना मिळाली.

## ६.६ स्वाध्याय

१. जैवविविधता कायदा-2002- नैसर्गिक संवर्धन तपशीलवार माहिती लिहा

२. जैवविविधतेस असणारे धोके टिप्पणी करा

३. **टिपा लिहा**

**i)** सहकारी कायदा-2004

**ii)** सहकारी कायदा-2012

## ६.७ संदर्भग्रंथ


- पंचायतसंबंधीचे उपबंध 1996 अधिनियम (अनुसूचित क्षेत्रात विस्तार करणे बाबत), *संचालक, मुद्रण व लेखन सामग्री, महाराष्ट्र शासन -२००४*
- *कर्वे, इरावती, मराठी लोकांची संस्कृति, पुणे, १९६२.*
- *महाराष्ट्र लोकसाहित्य समिति, महाराष्ट्र लोकसाहित्य माला, पुष्प चौथे, पुणे, १९६०.*
- *संगवे, विलास, आदिवासींचे सामाजिक जीवन, मुंबई, १९७२.*
- *https://mr.vikaspedia.in/social-welfare*
- *Shri. Sarvesh Kulkarni, Central Right to Information Act 2005*
- *Forest Right Act, Chaudhari Publications*
- *Co-operative Act. 2009 Chaudhari Publications*
- *Biodiversity, Act 2002 Chaudhari Publications*
- *PESA Act 1996 Chaudhari Publications*


❖❖❖❖

# ७

# माहिती अधिकार कायदा-2005-I

**घटक रचना**


७.० उद्दिष्टे

७.१ प्रस्तावना

७.२ परिचय-संकल्पना

७.३ उगम

७.४ कायद्याची उद्दिष्टे

७.५ महाराष्ट्र माहिती अधिकार कायदा - 2005

७.६ माहिती अधिकार कायद्यातील महत्त्वाच्या तरतुदी

७.७ केंद्र सरकारने सुचवलेल्या बदलांचा परिणाम आणि महत्व

७.८ सारांश

७.७ स्वाध्याय

७.८ संदर्भग्रंथ


## ७.० उद्दिष्टे

१. माहितीच्या अधिकाराचे उगम समजून घेणे.

२. माहिती अधिकार कायदा 2005 ची विविध उद्दिष्टे जाणून घेणे.

३. माहिती अधिकारअर्ज कसा दाखल करायचा हे जाणून घेणे.

४. माहिती अधिकार चे महत्व समजून घेणे.

५. देशातील प्रणालींवर माहिती अधिकाराचा प्रभाव जाणून घेणे.

## ७.१. प्रस्तावना

भारत हा लोकशाही प्रधान देश आहे. जनतेची - जनतेचे - जनतेसाठी चालवलेली राज्य यंत्रणा खरोखरच आदर्श करावयाची असेल तर त्यामध्ये पारदर्शकता हवी. कोणत्याही प्रशासकीय व्यवहारात पारदर्शकता आणण्यासाठी एक महत्त्वाचे शस्त्र म्हणून माहिती अधिकाराला महत्त्व प्राप्त होत आहे.  " शासनाकडे किंवा सार्वजनिक संस्थांकडे असलेली

munotes.in

माहिती मिळवण्यासाठी नागरिकांना दिलेला कायदेशीर अधिकार म्हणजे माहितीचा अधिकार होय " . नागरिकांनी कोणतीही माहिती मागावी आणि ती शासनाने पुरवावी असाच केवळ या अधिकाराचा अर्थ नसून शासकीय अधिकाऱ्यांनी आणि सार्वजनिक संस्थांनी अशा प्रकारची माहिती स्वतःहून ( स्यू - मोटो ) जनतेसमोर उघड केली पाहिजे हे अपेक्षित आहे. त्यासाठी कोणत्याही नागरिकाकडून विचारणा येण्याची वाट पाहण्याची गरज नाही.

## ७.२ परिचय-संकल्पना

भारतासारख्या लोकशाही राष्ट्रात सार्वजनिक जीवनातील प्रत्येक महत्वाच्या गोष्टीवर हिरीरीने मतप्रदर्शन करून, नागरिकांकडून राज्य कारभारात उत्स्फूर्त सहभाग अपेक्षित आहे. राज्यघटनेने त्यासाठी नागरिकांना अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य मूलभूत हक्क म्हणून बहाल केले आहेत. अर्थात, नागरिकांना त्यांचे माहिती पूर्ण मत मांडण्यासाठी शासनाच्या कार्यपद्धतीची माहिती व सार्वजनिक हिताच्या बाबी कशा हाताळल्या जातात याची माहिती मिळणे आवश्यक आहे. ही माहिती नागरिकांना प्राप्त व्हावी हा माहिती अधिकाराचा मुख्य उद्देश आहे.

केंद्र शासनाचा माहिती अधिकार 2005 हा कायदा महाराष्ट्रासह संपूर्ण देशभर 12 ऑक्टोबर 2005 पासून लागू झालेला आहे. हा कायदा राज्य शासनाच्या शासकीय, निमशासकीय कार्यालये, जिल्हा परिषदा, महापालिका, नगरपरिषदा इत्यादी बरोबरच ज्या संस्थांना शासनाकडून मदत किंवा अनुदान मिळते त्या सर्वांना लागू झालेला आहे. माहितीच्या अधिकारामुळे देशातील लोकशाही अधिक मजबूत होणार असून सर्व संस्थांच्या कामकाजात पारदर्शकता येणार आहे. भारतीय राज्यघटनेनुसार, देशातील जनतेला मूलभूत अधिकार प्रदान करणारा हा कायदा ऐतिहासिकदृष्ट्या महत्वाचा आहे.

## ७.३ उगम

"माहितीचा कायदा" ही संकल्पना सर्वप्रथम स्विडनने सर्व जगाला दिली. 1776 साली स्वीडनने आपल्या देशातील नागरिकांना माहितीचा अधिकार देणारा कायदा मंजूर केला. देशाचा कारभार अत्यंत पारदर्शकपणे चालविण्याचा उत्तम नमुना म्हणून या देशाकडे पाहिले जाते. त्यानंतर 1789 मध्ये फ्रेंचने माहितीचा अधिकार प्रसिद्ध केला. यामध्ये देशाचे अंदाजपत्रक तपासण्याचा अधिकार देशातील सर्व नागरिकांना देण्यात आला. एकूण निधी, त्याचा वापर इत्यादी सर्व माहिती सर्वसामान्य जनतेला मिळावी व पारदर्शक कारभार व्हावा हा त्याचा हेतू होता. त्यानंतर 1795 मध्ये नेदरलँडने माहिती अधिकार देण्याचे जाहीर केले. देशातील नागरिकांना सार्वजनिक प्रशासनातील सर्व गोष्टींची माहिती मिळेल अशी व्यवस्था केली. संयुक्त राष्ट्रसंघाने (UNO) 1946 साली "माहितीचा अधिकार" हा मानवाचा मुलभूत अधिकार असल्याचे एका ठरावाने प्रसिद्ध केले. त्यानंतर 1951मध्ये फिनलँड, 1966 मध्ये अमेरिका, 1970 मध्ये नॉर्वे आणि डेन्मार्क, 1982 मध्ये ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड, 1983 मध्ये कॅनडा, इंग्लंड - 2000 मध्ये ग्रेट ब्रिटन या प्रमाणे 56 देशांमध्ये हा कायदा लागू केला गेला.भारत हा कायदा बनवणारा 57 वा देश असून सध्या जगात 70 पेक्षा जास्त देशांनी या कायद्याचा स्वीकार केला आहे.

munotes.in

1990 मध्ये श्रीमती अरुणा रॉय यांनी राजस्थानात "मजदूर किसान शक्ती संघटना" चळवळ उभी केली. गरीब मजुरांना माहितीच्या अधिकारात त्यांनी काम केल्याची बिले, हजेरी पत्रक व इतर माहिती मिळावी म्हणून रॉय यांनी ही चळवळ सुरू केली. येथूनच खऱ्या अर्थाने माहितीच्या अधिकाराची सुरुवात भारतात झाली. यानंतर मध्यप्रदेश मधील बिलासपूर विभागीय आयुक्त श्रीयुत हर्ष मंडर यांनी सप्टेंबर 1996 मध्ये "अन्नधान्य वितरण व्यवस्था रोजगार विनिमय" याबाबतची माहिती उघड करण्यासाठी प्रयत्न केले. 1997 मध्ये गोवा व तामिळनाडू सरकारने माहितीचा हक्क हा मंजूर करण्याची मोहीम हाती घेतली. भारतात सर्वप्रथम हा कायदा तेव्हाच्या कर्नाटकच्या राज्यपाल श्रीमती व्ही. एस. देवी यांनी कर्नाटकमध्ये 2000 मध्ये हा कायदा मंजूर केला. महाराष्ट्रात अण्णा हजारे यांनी 2001 चाली माहितीच्या अधिकारासाठी आंदोलन केले. महाराष्ट्र राज्य माहिती अधिकार 2002 हा कायदा महाराष्ट्र शासनाने 2003 साली संमत केला आणि अंमलात आणला. अशा अनेक चळवळीनंतर केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार कायदा 12 ऑक्टोबर 2005 पासून संपूर्ण देशभर लागू करण्यात आला व इतर राज्यातील माहिती अधिकार कायदे निरसित म्हणजेच बंद करून संपूर्ण भारतासाठी हाच एकमेव कायदा लागू केला गेला.

## ७.४ कायद्याची उद्दिष्टे

1) सार्वजनिक प्राधिकरणाच्या कार्यात मोठ्या प्रमाणावर पारदर्शकता आणणे.

2) निर्णय प्रक्रियेत जनता व शासन यांचा सहभाग विकास करणे.

3) शासनाचे उत्तरदायित्व व कार्यक्षमता यामध्ये वाढ करणे.

4) शासकीय व निमशासकीय विभागातील भ्रष्टाचार कमी करणे.

**अधिकाधिक पारदर्शकता:-**

अधिकाधिक पारदर्शकता म्हणजे शासकीय कामकाजातील जास्तीत जास्त माहिती जनतेसमोर मांडणे. यामध्ये शासकीय नियम, नियंत्रण आणि निर्णय प्रक्रिया अहवाल इत्यादी माहिती जतन करून माहितीच्या अधिकारात देण्यासाठी तयार ठेवणे. सार्वजनिक प्राधिकरणाने जनतेसाठी ही सर्व माहिती आपणहून स्वयंप्रेरणेने जाहीर केली पाहिजे.

स्वयंप्रेरणेने जाहीर करावयाची माहिती (pro - active disclosures) प्रोॲक्टीव्हली म्हणजेच आपणाहून आणि डीसक्लोजर म्हणजे जाहीर केलेली माहिती प्रो ऍक्टिव्ह क्लोजर म्हणजे स्वयंप्रेरणेने जाहीर केलेली माहिती.

1) प्राधिकरणानी आपल्या संबंधित विभागातील माहिती फलकावर जाहिरात करणे.

जसे ,

* प्रत्येक कार्यालयाची संरचना, कार्य, कर्तव्ये, त्याच्या कार्यपद्धती, उद्दिष्टे व उद्दिष्टपूर्ती.

* प्रत्येक कार्यालयात उपलब्ध असलेल्या संचिका.

* प्रत्येक कार्यालयात उपलब्ध असलेल्या कागदपत्राची सूची

* कार्यालयात कार्यरत असलेल्या व्यक्ती व त्यांचा तपशील.

* कार्यालयात उपलब्ध झालेला निधी.

* प्रत्येक कामावर खर्च होणारा निधी, कार्यन्वित असलेले प्रकल्प, लाभार्थीची यादी.

* परवाना प्राप्त व्यक्तींची यादी, इत्यादी.

* वरील सर्व माहिती नागरिकांना पाहण्यासाठी खुली असेल, त्यासाठी कोणतीही फी आकारली जाणार नाही.

**2) इतर संगणकीय सुविधा :-**

* आपण ईमेल द्वारा माहिती मागणीचा अर्ज अशी सुविधा तयार झाल्यावर करू शकतो.

* जर आपण मागितलेली माहिती संगणकावर उपलब्ध असल्यास, ती संगणकावर उपलब्ध असल्याबाबतची प्रसिद्धी सदरच्या कार्यालयाने करावयाची आहे.

* तुम्ही अशा माहितीची सॉफ्ट कॉपी मागू शकता. त्यासाठी निश्चित केलेली फी आपणाला द्यावी लागेल.

* माहिती मिळणे सोपे व्हावे, म्हणून कार्यालयातील शक्यतो सर्व माहिती संगणकीकृत करण्यासाठी प्रत्येक प्रधिकाऱ्याने संगणकीकरणाचा कृती आराखडा करून, ते प्रसिद्ध करावयाचा आहे.

**3) गुप्ततेची कालमर्यादा:-**

20 पेक्षा जास्त कालावधीची कोणतीही माहिती गुप्त राहू शकत नाही. कायद्याच्या अपवादात मोडणाऱ्या माहिती सुद्धा काही गुप्त स्वरूपाची माहिती वगळता, 20 वर्षानंतर नागरिकास पाहण्यास खुली असेल.

## ७.५ महाराष्ट्र माहिती अधिकार कायदा - 2005

केंद्रशासनाने 12 ऑक्टोबर 2005 रोजी संसदेत मंजूर करून घेतलेला "माहितीचा अधिकार अधिनियम, 2005" पुढील प्रमाणे आहे.

"प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजामध्ये अधिकाधिक पारदर्शकता आणणे आणि उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने, सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील माहिती नागरिकांना मिळवता यावी म्हणून, नागरिकांच्या माहिती मिळवण्याच्या अधिकाराची व्यवहार्य शासन पद्धत आखून देण्याकरिता केंद्रीय माहिती आयोग आणि राज्य माहिती आयोग गठित करण्याकरिता आणि तत्संबंधीत किंवा तद अनुषंगिक बाबीकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम".

वरील कायद्यामध्ये सार्वजनिक प्राधिकरण (Public Authority) म्हणजेच नागरिकांचा ज्या ज्या सरकारी व निमसरकारी कार्यालयांशी, महामंडळांशी, सार्वजनिक बँकांशी किंवा नगरपालिका, महानगरपालिका सारख्या संस्थाशी संबंध येतो त्या संस्थांचा, कार्यालयांचा आणि संघटनांचा यामध्ये समावेश होतो.

माहिती अधिकार आणि पारदर्शकता (RTI & Transparency) माहिती अधिकार अधिनियम मसुद्यात या कायद्याची उद्दिष्टे सांगितली आहेत.

सर्व सार्वजनिक प्राधिकरणातील कामकाजामध्ये अधिकाधिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निर्माण करण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणातील माहिती सर्व नागरिकांना मिळवता येते. म्हणजेच कायद्यामध्ये पारदर्शकता आणि उत्तरदायित्व ( Transparency and Accountability ) याचा स्पष्ट उल्लेख आहे.

**माहिती अधिकार कायद्यातील महत्त्वाच्या तरतुदी**

भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद - 19 अन्वये बहाल केलेल्या माहितीच्या अधिकाराची अंमलबजावणी करण्यासाठी माहितीचा अधिकार अधिनियम चांगले काम करेल. अधिनियमात एकूण- 31 विभाग (कलम) दिलेले आहेत. त्यापैकी अतिमहत्वाच्या तरतुदींचा किंवा विभागांचा आपण अभ्यास करणार आहोत.

**1) कलम - 4 सार्वजनिक प्राधिकरणातील आबंधने:- प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण :**

अ) या कायद्यानुसार देण्यात आलेल्या माहितीचा अधिकार मिळणे योग्य होईल अशा रीतीने आणि स्वरूप सर्व अभिलेख / रेकॉर्ड योग्य रीतीने सूचीबद्ध करीत आणि त्यांची निर्देशसूची तयार करील आणि ज्यांचे संगणकीकरण करणे योग्य आहे अशा सर्व अभिलेखांचे योग्य कालावधीत संगणकीकरण केले जाते आणि देशातील विविध प्रणालीमध्ये नेटवर्कमार्फत जोडले जातात याची चौकशी करील.

ब) हा नियम झाल्यापासून एकशे वीस दिवसाच्या आत -

- आपली रचना कार्य व कर्तव्ये यांचा तपशील;
- आपले अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्य;
- निर्णय प्रक्रियेत अंमलबजावण्यात येणारी कार्यपद्धती, तसेच पर्यवेक्षण आणि उत्तरदायित्व प्रणाली ;
- त्याच्याकडे असलेले किंवा त्यांच्या नियंत्रणात असलेले किंवा त्यांची कार्य पार पाडण्यासाठी त्यांच्या कर्मचारी वर्गाकडून वापरण्यात येणारे नियम, विनियम, सूचना, नियमपुस्तिका आणि अभिलेख ;
- आपल्या अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची निर्देशिका ;
- ज्या व्यक्तींना सवलती, परवाने किंवा प्राधिकारपत्रे दिलेली आहेत अशा व्यक्तींचा तपशील.

munotes.in

- माहिती मिळवण्यासाठी नागरिकांना उपलब्ध असणाऱ्या सुविधांचा तपशील, तसेच सार्वजनिक वापरासाठी चालविण्यात येत असलेल्या ग्रंथालयाच्या किंवा वाचनालयाच्या कामकाजाच्या वेळांचा तपशील

क) ज्यामुळे लोकांना बाधा पोहोचते अशी महत्त्वाची धोरणे आखताना आणि तसे निर्णय जाहीर करताना सर्व संबंधित वस्तुस्थिती प्रसिद्ध करील.

ड) आपल्या प्रशासकीय किंवा न्यायांकित निर्णयाबाबतची करणे बाधित व्यक्तीला कळवील.

**2) कलम - 5. जन माहिती अधिकाऱ्याना पदनिर्देशित करणे:**

* प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण, हा अधिनियम अधिनियमित झाल्यापासून शंभर दिवसांच्या आत, या अधिनियमाच्या आधारे माहिती मिळण्याची विनंती करणाऱ्या व्यक्तींना माहिती देण्यासाठी, त्यांच्या अधिकारातील सर्व प्रशासकीय युनिटांमध्ये किंवा कार्यालयांमध्ये आवश्यक असतील तेवढ्या जास्तीत जास्त अधिकाऱ्यांना, यथास्थिती केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी म्हणून निर्देशित करील.

* वरील नियमात बाध येऊ न देता, प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण, हा नियम अधिनियमित झाल्यापासून शंभर दिवसाच्या आत, या अधिनियमाच्या आधारे माहिती मिळवण्यासाठी केलेले अर्ज किंवा अपिले स्वीकारून, ती लगेच केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्यास किंवा राज्य जन माहिती अधिकाऱ्यास किंवा कलम 19 (1) नुसार विनिर्दिष्ट वरिष्ठ अधिकाऱ्यास अथवा केंद्रीय माहिती आयोगास किंवा यथास्थित, राज्य माहिती आयोगास पाठविण्यासाठी, प्रत्येक उपविभागीय स्तरावर किंवा अन्य उपजिल्हा स्तरावर एखाद्या अधिकाऱ्यास केंद्रीय सहाय्यक जन माहिती अधिकारी किंवा यथास्थित राज्य सहाय्यक जन माहिती अधिकारी म्हणून पदनिर्देशित करील.

* प्रत्येक केंद्र किंवा राज्य जन माहिती अधिकारी, माहिती मिळवण्याची विनंती करणाऱ्या व्यक्तींशी केलेल्या विनंतीवर कार्यवाही करेल आणि अशी माहिती देणाऱ्या व्यक्तींना योग्य ती मदत करील.

* प्रत्येक केंद्र किंवा राज्य जन माहिती अधिकाऱ्यास त्याची किंवा तिची कर्तव्ये योग्य प्रकारे पार पाडण्यासाठी त्याला किंवा तिला आवश्यक वाटेल अशा अन्य कोणत्याही अधिकाऱ्याचे सहाय्य मागता येईल.

**3) कलम - 6 माहिती मिळण्याकरीता विनंती करणे:**

या कायद्याअंतर्गत माहिती मिळवण्यासाठी व्यक्तीने मागणी केलेल्या माहितीचा तपशील इंग्रजीमध्ये किंवा हिंदीमध्ये अथवा अर्ज ज्या क्षेत्रात करण्यात येत असेल त्या क्षेत्रांच्या राज्यभाषेमधील लेखी स्वरुपात किंवा इलेक्ट्रॉनिक साधनांद्वारे विहित नमुन्यात, योग्य फी सह.

अ) संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाच्या केंद्रीय किंवा राज्य जन माहिती अधिकाऱ्याकडे

ब) अशी माहिती मिळवण्यासाठी एखाद्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे अर्ज करण्यात आला असेल त्याबाबतीत, ज्याच्याकडे हा अर्ज करण्यात आला आहे ते सार्वजनिक प्राधिकरण असा अर्ज अशा अन्य सार्वजनिक प्राधिकरणाकडे हस्तांतरित करेल आणि अशा हस्तांतरणाबाबत अर्जदारास त्वरित माहिती देईल.

परंतु अर्जाचे हस्तांतर शक्यतो लवकरात लवकर करण्यात येईल. मात्र कोणत्याही परिस्थितीत अर्ज मिळाल्याच्या तारखेपासून पाच दिवसांपेक्षा अधिक विलंबाने करता येणार नाही.

**4) कलम - 7 विनंतीचा अर्ज निकालात काढणे:**

* केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी माहिती मिळण्याची विनंती करणारा अर्ज मिळाल्यावर शक्य तितक्या लवकर आणि कोणत्याही परिस्थितीत विनंती केल्यापासून 30 दिवसांच्या आत विहित करण्यात येईल अशा फीचे प्रदान केल्यावर माहिती देईल अथवा विनिर्दिष्ट कारणांपैकी कोणत्याही कारणांसाठी विनंतीचा अर्ज फेटाळील.

* विनंतीचा अर्ज फेटाळण्यात आला असेल तर त्याबाबतीत संबंधित केंद्रीय अथवा राज्य जन माहिती अधिकारी, माहिती मिळण्याची विनंती करणाऱ्या व्यक्तीस -

i) विनंतीचा अर्ज फेटाळण्याची कारणे.

ii) ज्या कालावधीत असा विनंतीचा अर्ज फेटाळल्याच्या विरोधात अपील करता येईल तो कालावधी.

iii) अपील प्राधिकरणाचा तपशील कळवेल.

**5) कलम - 8 माहिती प्रगट करण्याबाबत अपवाद:**

या कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही नागरिकाला पुढील माहिती देता (पुरवता) येणार नाही.

* ज्या माहितीमुळे भारताच्या सार्वभौमत्वाला किंवा एकात्म, राज्यांच्या सुरक्षेला, युद्धतंत्रविषयक, वैज्ञानिक व आर्थिक हितसंबंधांना, परकीय राज्यांच्या संबंधांना बाधा पोहोचेल अशी माहिती.

* न्यायालयाने किंवा न्यायाधीकरणाने जी माहिती प्रकाशित करण्यात स्पष्टपणे मनाई केली आहे अशी माहिती.

* जी माहिती प्रकट केल्याने संसदेच्या किंवा विधानमंडळाच्या विशेषाधिकारांचा भंग होईल अशी माहिती.

* वाणिज्य क्षेत्रातील विश्वासार्हता, व्यवसायिक गुपिते, किंवा बौद्धिक संपदा यांचा समावेश असलेली माहिती, जी प्रगट केल्याने त्रयस्थ पक्षाच्या स्पर्धात्मक स्थानाला हानी पोहोचेल अशी माहिती.

munotes.in

* विदेशी शासनाकडून विश्वासपूर्वक मिळालेली माहिती.

* विदेशी सरकारकडून गुप्तपणे प्राप्त झालेली माहिती.

* जी माहिती प्रगट केल्याने संसदेच्या किंवा विधानमंडळाच्या विशेषाधिकारांचा भंग होईल अशी माहिती.

* या कायद्याने मनाई केलेली अशी कोणतीही माहिती देता येणार नाही.

* जी माहिती उघड केल्याने व्यक्तीच्या खाजगीपणाचे विनाकारण उल्लंघन होईल अशी वैयक्तिक स्वरूपाची माहिती.

**6) कलम- 9 विविक्षित प्रकरणात माहिती देण्यास नकार देण्याची कारणे :**

* एखादी माहिती पुरवण्याचा विनंतीमुळे जर, रज्याव्यातिरिक्त अन्य एखाद्या व्यक्तीच्या कॉपीराईटचे उल्लंघन होत असेल तर, कलम 8 च्या तरतुदींना बाधा येऊ न देता, यथास्थिती, केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्यास किंवा राज्य जन माहिती अधिकाऱ्यास अशी माहिती पुरवण्याची विनंती नाकारता येईल.

**केंद्र सरकारने सुचवलेल्या बदलांचा परिणाम आणि महत्व.**

**कलम - 12 केंद्रीय माहिती आयोग :**

* केंद्र सरकार, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे " केंद्रीय माहिती आयोग" ( सेंट्रल इंफॉर्मेशन कमिशन ) माहितीच्या अधिकाराचा वापर करण्यासाठी व त्याला नेमून दिलेली कार्य पार पाडण्यासाठी स्थापन करते.

* केंद्रीय माहिती आयोग पुढील व्यक्तींची मिळून बनलेला असेल.

अ) मुख्य माहिती आयुक्त,घरगुती गॅस वापरातील काळा बाजारावर नियंत्रण ठेवता येते ग्राहकांना वेळेत गॅस उपलब्ध होतो रोजगार हमी योजनेतील भ्रष्टाचार कमी करण्यास मदत होते त्यामुळे गरीब मजुरांना कामाची उपलब्धता होते वाद मिटण्यास व गैरसमज दूर होण्यास मदत माहिती अधिकारामुळे शासकीय-निमशासकीय विभाग तसेच स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये निर्माण होणारे वाद व गैरसमज दूर होण्यास मदत होते निर्णय प्रक्रियेची माहिती प्रगट करणे निवेदन विषयी माहिती जाहीर करणे विकास विकासकांचे देणे कर्ज प्रक्रिया व आकारणी कर आकारणी वसुली इत्यादी विषयीचे दावे व गैरसमज मी ठेवण्यास मदत होते गरीब व गरजू लोक सरकारी योजनांचा लाभ केंद्र व राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ गरजू व गरीब लोकांना मिळवून देण्यासाठी माहिती अधिकार फार उपयुक्त ठरत आहे मोफत वैद्यकीय अन्नसुरक्षा रोजगार हमीची कामे घरकुल योजना निराधार अपंग लोकांचा लोकांचा योजना विविध योजनांसाठी दिले जाणारे अनुदान व त्याचे वितरण घरगुती गॅसवरील सवलत रेशन कार्ड विमा योजना वृद्धांसाठी पेन्शन योजना इत्यादी विविध योजनांचा लाभ गरीब व गरजू लोकांना होत आहे गावकऱ्यांना विकासाचा नवीन मार्ग सापडला माहिती अधिकार यामुळे गावाच्या विकासाचा मार्ग होण्यास मदत झाली आहे रस व रस्ते व गटारांचे बांधकाम त्याचा दर्जा व मंजूर खर्च

विविध योजनांचे लाभार्थी इंदिरा आवास योजना राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे लाभार्थी शासकीय व त्याचे वितरण वीज व पाणीपुरवठा आरोग्य व शिक्षण विभाग ग्राम स्वच्छता पर्यावरण संरक्षण आधी विविध कामांमध्ये सुधारणा व पारदर्शकता येण्यास मदत होत आहे भ्रष्टाचार नियंत्रण ठेवणे शक्य होऊ लागले आहे एकूणच गावाच्या विकासाला मदत होऊ लागली आहे मुख्य आयुक्त इतर केंद्रीय आयोग त्यांच्या मदतीने चालवितात.

मुख्य माहिती आयुक्त आणि माहिती आयुक्त हे कायदा, विज्ञान व तंत्रज्ञान, समाजसेवा, व्यवस्थापन, पत्रकारिता जनसंपर्क माध्यम किंवा प्रशासन आणि शासन या विषयांचे व्यापक ज्ञान व अनुभव असलेल्या सार्वजनिक जीवनातील प्रख्यात व्यक्ती असतील.

**8) कलम - 15 राज्य माहिती आयोग :**

प्रत्येक राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेप्रमाणे ……….. (राज्याचे नाव) माहिती आयोग, माहितीच्या अधिकाराचा वापर करण्यासाठी आणि त्याला नेमून दिलेली कार्य पार पाडण्यासाठी स्थापन करेल.

* राज्य माहिती आयोग पुढील व्यक्तींचा मिळून बनलेला असेल.

अ) राज्य मुख्य माहिती आयुक्त

ब) आवश्यकतेप्रमाणे, दहापेक्षा अधिक नसतील इतके राज्य माहिती आयुक्त.

* राज्याच्या मुख्य माहिती आयुक्तांची आणि राज्य माहिती आयुक्तांची नियुक्ती, राज्यपाल पुढील व्यक्तींनी मिळून बनलेल्या समितीच्या शिफारशीनुसार करील.

अ) मुख्यमंत्री, या समितीचे अध्यक्ष असतील.

ब) विधानसभेतील विरोधी पक्षनेता

क) मुख्यमंत्र्याने नामनिर्देशित केलेला एक कॅबिनेट मंत्री.

सर्व कामकाज व नियुक्त्या केंद्रीय माहिती आयोगाप्रमाणेच असतात.

9) कलम - 18 माहिती आयोगांचे अधिकार व कार्ये :

केंद्रीय माहिती आयोग व राज्य माहिती आयोग या कायद्यानुसार पुढील व्यक्तींकडून तक्रार स्वीकारणे व त्यांची चौकशी करणे हे त्यांचे कर्तव्य असेल.

* या कायद्यानुसार माहिती आयोग किंवा राज्य माहिती आयोगाने संबंधित अधिकारी नियुक्त केलेला नसेल तर, किंवा संबंधित अधिकाऱ्यांकडे अपिलाचा अर्ज उपलब्ध करून दिला नसेल तर, किंवा संबंधित अधिकाऱ्याने तो अर्ज नमूद केलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे पाठवलेला नसेल तर किंवा माहिती अधिकाऱ्याकडे विनंतीचा अर्ज सादर करण्यास जी व्यक्ती असमर्थ ठरली असेल अशी व्यक्ती :

* या कायद्यांतर्गत मागणी करण्यात आलेली कोणतीही माहिती मिळण्यास नकार मिळालेली कोणतीही व्यक्ती,



munotes.in

* या कायद्यांतर्गत माहिती मिळवण्यासाठी व्यक्ती अर्जास विशिष्ट मुदतीत प्रतिसाद न मिळालेली व्यक्ती.

* अवाजवी फी भरण्यास भाग पाडेल अशी व्यक्ती.

* आपल्याला मिळालेली माहिती खोटी किंवा दिशाभूल करणारी आहे असे जिला वाटत असेल अशी व्यक्ती ;

* या कायद्यांतर्गत अभिलेख मिळवता येण्याच्या किंवा त्यासाठी विनंती करण्याच्या संबंधातील इतर कोणत्याही बाबीविषयी तक्रार करणारी व्यक्ती.

**10) कलम - 20 शास्ती (Penalty) :**

या कायद्याखाली राज्य किंवा केंद्र माहिती आयोग कर्मचारी दोषी आहेत असे आयोगाचे मत झाले तर त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई होते. माहिती देण्यास विलंब झाला तर संबंधित कर्मचाऱ्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिली आहे. त्यामध्ये तो दोषी आढळल्यास त्याच्याकडून प्रत्येक दिवसाकरीता रुपये 250 व जास्तीत जास्त रुपये 25000 एवढा दंड आकारण्यात येतो.

* दंडाची कारवाई करण्याचा अधिकार केंद्रीय माहिती आयोगास व राज्य माहिती आयोगास आहे.

**11) कलम -23 न्यायालयांच्या अधिकारीतेस आडकाठी :**

कोणतेही न्यायालय या कायद्यांतर्गत दिलेल्या कोणत्याही आदेशाच्या संबंधातील कोणताही दावा, अर्ज किंवा इतर कारवाई दाखल करून घेणार नाही आणि या अधिनियमानुसार केलेल्या अपीलाद्वारे असेल त्याखेरीज असा आदेश प्रश्नास्पद करता येणार नाही.

**माहिती अधिकाराचे महत्व / परिणाम :-**

**1) माहिती मिळवण्याचा कायदेशीर अधिकार:**

माहिती अधिकारामुळे देशातील नागरिकांना शासकीय व निमशासकीय कामकाज विषयी माहिती मिळवण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. आपणास माहिती मागविण्याचे कारण कोणीही विचारू शकणार नाही. कारण, माहिती हा तुमचा अधिकार आहे आणि योग्य कारणाशिवाय तो कोणालाही नाकारता येणार नाही. आवश्यक असलेली माहिती एखाद्या जीवित रक्षणाच्या दृष्टीने अथवा मुक्ततेच्या दृष्टीने आवश्यक असल्यास आपणास ती 48 तासांच्या आत तातडीने मागता येइल. मागितलेली माहिती योग्य मुदतीत मिळाली नाही अथवा झालेल्या उशिराबद्दल स्पष्टीकरणही विहित मुदतीत देण्यात आले नाही तर, सदर माहिती मोफत मिळत अधिकार असतो आपण जर दारिद्र्यरेषेखालील नागरिक असेल असलो तर माहिती आपणास मोफत पुरविण्यात येते. नागरिकांना लिहिता वाचता येत नसेल किंवा आपण अपंग असाल तर, माहिती अधिकारी योग्य ती सर्व मदत करेल.

**2) सार्वजनिक संस्था कामकाजातील पारदर्शकता:**

माहिती अधिकारामुळे सार्वजनिक संस्थांच्या कामकाजामध्ये पारदर्शकता दिसून येते. यामध्ये निर्णय प्रक्रिया, कामगार भरती प्रक्रिया, कर्मचाऱ्यांची निवड व बढती, निविदा विषयक माहिती, शासकीय सवलत योजनेचा लाभ घेणाऱ्यांची यादी, पाणीपुरवठा व विद्युत विभाग, स्थानिक गॅस प्रक्रिया, शैक्षणिक व आरोग्य सुविधा, रोजगार कार्यालयातील हजेरीपत्रक, गरिबांसाठी आरोग्य विमा किंवा सुविधा, खाद्यान्न सुरक्षा इत्यादी विषयीची माहिती सर्वसामान्य नागरिकांना पुरवली पाहिजे किंवा संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली पाहिजे जेणेकरून सार्वजनिक संस्थांमधील कामकाजात पारदर्शकता वाढेल.

**3) माहिती अधिकाराचा व्यवहारात उपयोग:**

माहिती अधिकाराचा व्यवहारात मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. दारिद्र्य निर्मूलन योजनेअंतर्गत संबंधित स्थानिक आमदार व खासदारांना मिळणारे अनुदान, संबंधित नेत्यांनी वापरलेला निधी, केलेली कामे, त्यांची जबाबदारी किंवा उत्तरदायित्व या विषयी सर्व माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्याची व्यवस्था असावी.

वैयक्तिक पातळीवर तुम्हाला तुम्ही तुमच्या आवश्यकतेनुसार हवी ती माहिती त्वरित प्राप्त होते. आ उदारणार्थ आवश्यक ती प्रमाणपत्रे, दस्तऐवज, दाखले आदि गोष्टी उपलब्ध होऊ शकतात. त्याचबरोबर कार्यालयात प्रलंबित असलेल्या तुमच्या अर्जाची किंवा प्रकरणाची सद्यस्थिती इत्यादी गोष्टींचा यात समावेश होतो. त्यामुळे कार्यालयात मारावे लागणारे हेलपाटे, संदिग्ध माहिती व दुरुत्तरे या जाचातून सुटका होते. आपल्याला हक्काची माहिती मिळवण्यासाठी कुणाची मनधरणी करावी लागत नाही.

**4) विविध खात्यातील भ्रष्टाचार उघड करणे :**

माहिती अधिकारामुळे सार्वजनिक क्षेत्रातील विविध सरकारी कार्यालयातील उदाहरणार्थ महसूल विभाग, पोलीस विभाग, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, समाज कल्याण विभाग इत्यादी विभागातील होणारा भ्रष्टाचार कमी करणे किंवा त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी माहिती अधिकार हे महत्त्वाचे अस्त्र आहे.

**5) सरकारी कामकाजाचे योग्य आकलन:**

प्रत्यक्षात शासकीय कामकाज कसे चालते, त्यांची कार्य व निर्णय पद्धती कशी आहे, हे या कायद्यामुळे प्रत्येक नागरिकाला समजून घेता येते. माहिती अधिकारामुळे नागरिकांना ही संधी प्राप्त झालेली आहे. निर्णय प्रक्रियेच्या सर्व नोंदी अचूक ठेवल्या जातात. त्याची माहिती जनतेसाठी प्रकट करावी लागते. सर्व स्तरावरील अधिकारी जनतेसाठी माहिती उपलब्ध करून देतात. योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे केली जाते. सर्वसामान्य नागरिकांना सेवा पुरवल्या जातात व त्यात सुधारणा होण्यास मदत होते.

**6) विकास कार्यक्रमात सुधारणा:**

माहिती अधिकार ग्रामीण व शहरी स्थानिक शासन संस्था मार्फत करण्यात येणाऱ्या विकास कार्यक्रमांवर तसेच सरकारी विभागातील विकास कामांवर देखरेख ठेवणे, त्यावर नियंत्रण

ठेवणे हा सर्वसामान्य नागरिकांना अधिकार प्राप्त झाल्यामुळे या विकास कामात सुधारणा घडून येण्यास मदत होत आहे.

**7) नागरिकांच्या सेवेत सुधारणा:**

माहिती अधिकारामुळे सर्वसामान्य जनतेला पुरवण्यात येणाऱ्या सेवांमध्ये गुणात्मक व संख्यात्मक वाढ झालेली दिसून येते. याची अनेक उदाहरणे सांगता येतील. शाळेतील शिक्षकांच्या नियमित तपासणीमुळे शिक्षकांच्या गैरहजेरीचे प्रमाण व मुलांच्या गळतीचे प्रमाण यांच्याकडे लक्ष ठेवता येते, प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर्स व नर्सेस याच्या नियमितपणामुळे रुग्णांना सेवा सुविधा वेळेत पुरविता येतात, घरगुती गॅस वापरातील काळ्या बाजारावर नियंत्रण ठेवता येते व ग्राहकांना वेळेत गॅस उपलब्ध होतो, रोजगार हमी योजनेतील भ्रष्टाचार कमी करण्यास मदत होते त्यामुळे गरीब मजुरांना कामाची उपलब्धता होते.

**8) वाद मिटण्यास व गैरसमज दूर होण्यास मदत:**

माहिती अधिकारामुळे शासकीय व निमशासकीय विभाग, तसेच स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादीमध्ये निर्माण होणारे वाद व गैरसमज दूर होण्यास मदत होते. निर्णय प्रक्रियेची माहिती प्रगट करणे, निविदांविषयी माहिती जाहीर करणे, विकासकांचे देणे, कर्ज प्रक्रिया व आकारणी, कर आकारणी वसुली इत्यादी विषयीचे दावे व गैरसमज मी ठेवण्यास मदत होते.

**9) गरीब व गरजू लोक सरकारी योजनांचा लाभ:**

केंद्र व राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ गरजू व गरीब लोकांना मिळवून देण्यासाठी माहिती अधिकार फार उपयुक्त ठरत आहे. मोफत वैद्यकीय सेवा, अन्नसुरक्षा, रोजगार हमीची कामे, घरकुल योजना, निराधार व अपंग लोकांच्या योजना, विविध योजनांसाठी दिले जाणारे अनुदान व त्याचे वितरण, घरगुती गॅसवरील सवलत, रेशन कार्ड, विमा योजना, वृद्धांसाठी पेन्शन योजना, इत्यादी विविध योजनांचा लाभ गरीब व गरजू लोकांना होत आहे.

**10) गावकऱ्यांना विकासाचा नवीन मार्ग सापडला:**

## ७.६ सारांश

माहिती अधिकारामुळे गावाच्या विकासाचा मार्ग खुला होण्यास मदत झाली आहे. रस्ते व गटारांचे बांधकाम, त्याचा दर्जा व मंजूर खर्च, विविध योजनांचे लाभार्थी, इंदिरा आवास योजना, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे लाभार्थी, शासकीय अनुदान व त्याचे वितरण, वीज व पाणीपुरवठा, आरोग्य व शिक्षण विभाग, ग्राम स्वच्छता, पर्यावरण संरक्षण, आदि विविध कामांमध्ये सुधारणा व पारदर्शकता येण्यास मदत होत आहे. भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवणे शक्य होऊ लागले आहे. एकूणच गावाच्या विकासाला मदत होऊ लागली आहे.

## ७.७ स्वाध्याय

1) माहिती अधिकाराचे महत्त्व किंवा परिणाम सांगा.

2) माहिती अधिकार कायद्यातील महत्त्वाच्या तरतुदी सांगा.

## ७.८ संदर्भग्रंथ


1) **माहितीचा अधिकार अधिनियम, *2005,* महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ - मुद्रक - प्रतीक ऑफसेट, मुंबई.**

2) **माहितीचा अधिकार - य. दि. फडके - अक्षर प्रकाशन - माहीम, मुंबई.**

3) **पायाभूत अभ्यासक्रम - *2* - प्रा. एम. एस. लिमण, सेठ पबलिकेशन, मुंबई.**

4) **माहितीचा अधिकार अधिनियम, *2005.* - उन्मेष गुजराथी, प्रगती बुक्स प्रा. लिमि., मिलिंद आर्ट प्रिंटर्स मुंबई.**


❖❖❖❖

munotes.in

# ८

# माहिती अधिकार कायदा-2005-II

**घटक रचना**

७.० उद्दिष्टे

७.१ प्रस्तावना

७.२ माहिती मागण्याची कार्यपद्धत

७.३ माहिती अधिकार जोडपत्र - "अ" जोडपत्र - "ब" जोडपत्र ' क'

७.४ ग्रामीण शासन व प्रशासन यंत्रणेवरील माहिती अधिकाराचे परिणाम / फायदे / महत्त्व

७.५ सारांश

७.६ स्वाध्याय

७.७ संदर्भग्रंथ

## ७.० उद्दिष्टे

१. माहिती मागण्याची कार्यपद्धत समजून घेणे.

२. माहिती अधिकार जोडपत्र - "अ" जोडपत्र - "ब" जोडपत्र ' क'जाणून घेणे.

३. ग्रामीण शासन व प्रशासन यंत्रणेवरील माहिती अधिकाराचे परिणाम जाणून घेणे.

४. माहितीचा अधिकार महत्व समजून घेणे.

## ७.१ प्रस्तावना

केंद्र शासनाचा 'माहिती अधिकार 2005', महाराष्ट्राबरोबरच इतर सर्व देशभर दिनांक 12 ऑक्टोबर 2005 पासून लागू करण्यात आला आहे. हा कायदा राज्य शासनाच्या सर्व शासकीय, निमशासकीय, कार्यालयाबरोबरच जिल्हा परिषदा, महापालिका, नगरपरिषदा, पंचायत समिती, ग्रामपंचायत तसेच ज्या संस्थांना शासनाकडून मदत अथवा अनुदान मिळते त्या सर्वांना लागू झाला आहे. माहितीच्या अधिकारामुळे देशातील लोकशाही अधिक मजबूत होणार असून सर्व आस्थापना व संस्थांच्या कामकाजात पारदर्शकता येणार आहे. भारतीय राज्यघटनेनुसार देशातील लोकांना मूलभूत अधिकार प्राप्त करून देणारा हा कायदा आहे. प्रशासनात लोकाभिमुखता व निर्णय क्षमता आणून, उत्तम प्रशासन कार्यान्वित करण्यासाठी माहितीचा अधिकार हा कायदा महत्त्वाचा आहे.

munotes.in

साधारणतः कोणतीही माहिती 30 दिवसाच्या आत अर्जदारास देणे बंधनकारक असते. या मर्यादित वेळेत माहिती देणे शक्य व्हावे यासाठी प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने त्या-त्या प्राधिकरणाच्या आकारानुसार किंवा कामकाजाच्या सोयीनुसार आवश्यक तितक्या माहिती अधिकाऱ्यांची नेमणूक करावयाची असते. एखाद्या सार्वजनिक प्राधिकरणाचा आकार लहान असल्यास तेथे एकच माहिती अधिकारी नेमलेला चालतो. मात्र एखाद्या प्राधिकरणाचा आकार मोठा असेल किंवा अनेक प्रकारचे विभाग असतील अशा प्रत्येक विभागासाठी वेगवेगळे प्राधिकरण घोषित करून एक किंवा अधिक स्वतंत्र माहिती अधिकारी नेमणे अपेक्षित असते.

एकाच प्राधिकरणातील कोणत्याही विभागातील माहिती, माहिती अधिकाऱ्याला त्याच प्राधिकरणाच्या दुसऱ्या विभागातील (दुसऱ्या खात्यातील) कामांची माहिती सुद्धा देणे अपेक्षित असते. या व्यतिरिक्त दुसऱ्या सार्वजनिक प्राधिकरणासंबंधित अर्जही त्याला स्वीकारावाच लागेल आणि यानंतर पाच दिवसांच्या कालावधीत तो संबंधित प्राधिकरणाकडे हस्तांतरित करावा लागेल, त्याची लेखी सूचना अर्जदाराला द्यावी लागेल.

कोणत्याही व्यक्तीस माहिती हवी असल्यास त्याने लेखी अर्ज करणे आवश्यक असते. अशा लेखी अर्जाचे उत्तर माहिती अधिकाऱ्याने त्यानुसार लेखी देणे अनिवार्य आहे. अर्जदाराने जर माहितीची मागणी सीडी, फ्लॉपी, व्हिडीओ कॅसेट या स्वरूपात केली असेल किंवा साधन सामग्रीची सॅम्पल किंवा मॉडेल अशा स्वरूपात मागणी केल्यास ती माहिती त्या स्वरूपात पुरवावी लागेल. परंतु कोणत्याही परिस्थितीत फक्त तोंडी उत्तर न देता लेखी उत्तर देणे आवश्यक आहे.

अर्जदार किंवा माहिती अधिकारी यांनी अर्ज देताना व स्वीकारताना पुढील काळजी घेणे आवश्यक आहे.:-

१) अर्जदार यांचे पूर्ण नाव:

२) संपूर्ण पत्ता पिन कोड सह

या दोन्ही गोष्टी व्यवस्थित लिहिलेल्या आहेत का ? याची खात्री करून घ्यावी. कारण पत्ता अपुरा किंवा चूकीचा असल्यास पोस्टाने पाठवलेले उत्तर वेळेवर मिळाले नाही तर माहिती अधिकारी अडचणीत येऊ शकतो. तसेच अर्जदाराला माहिती मिळण्यास विलंब होऊ शकतो.

३) विचारलेल्या माहितीचा विषय :- किमान ढोबळमानाने तरी विषय लिहिलेला असावा. उदाहरणार्थ - सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी किंवा माहिती मिळवण्यासाठी संबंधित योजनेचे नाव.

४) कोणत्या काळातील माहिती हवी आहे तो कालावधी:- उदाहरणार्थ 1920 ते 1921 साल.

munotes.in

५) नेमकी कोणत्या प्रकारे माहिती हवी आहे, हे लिहिले असल्याची खात्री करून घेणे. उदाहरणार्थ : मु.पोस्ट......, तालुका. ........ जिल्हा. ........ येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत किती विद्यार्थी आहेत व त्यांच्यासाठी किती शिक्षक नेमले आहेत ?

६) माहिती पोस्टाने हवी आहे की अर्जदारा माहिती घेण्यास स्वतः येणार आहे, हेही लिहिलेले आहे याची खात्री करावी.

७) माहिती पोस्टाने हवी असेल तर साध्या पोस्टाने, रजिस्टर पोस्टाने, स्पीड पोस्टाने हवे ते लिहिले असल्याची खात्री करून घ्यावी. तसेच पोस्टाचा खर्च हा माहितीच्या खर्चा व्यतिरिक्त पोस्टेजचा खर्च वेगळा आकारला जातो याची अर्जदाराला कल्पना द्यावी.

८) अर्जदार दारिद्र्यरेषेखालील आहे का हेही अर्जात लिहिलेले असावे.

९) जर अर्जदार दारिद्र्यरेषेखालील असेल तर त्या पुराव्याची झेरॉक्स कॉपी जोडावी.

१०) अर्जावर तारीख व ठिकाण लिहिलेले असावे.

११) अर्जखाली स्वाक्षरी करणे अनिवार्य आहे.

वरील सर्व गोष्टींची खात्री करून, चुका किंवा त्रुटी असल्यास लगेचच पूर्ण करून घ्यावी त्यामुळे माहिती वेळेत मिळणे, पाठविणे सोयीचे होते.

## ७.२ माहिती मागण्याची कार्यपद्धत

१) कलम सहाव्या पोटकलम (१) अन्वये माहिती मिळवण्याचा अर्ज जोडपत्र "अ" मध्ये दिलेल्या नमुन्यात साध्या कागदावर, संबंधित राज्य शासकीय माहिती अधिकाऱ्याकडे करण्यात येईल व त्याबाबत यथोचित पावती घेऊन रोख स्वरूपात किंवा सार्वजनिक प्राधिकरणास प्रदेय असलेल्या दर्शनी धनाकर्षाच्या (demand draft) स्वरूपात किंवा बँकर्स धनादेशाच्या (चेक) स्वरूपात, दहा रुपये इतके अर्ज शुल्क प्रदान करण्यात येईल किंवा त्यावर दहा रुपयांचा न्यायालय फी मुद्रांक (court fee stamp) लावण्यात येईल. अर्जदाराने माहिती मिळवण्यासाठी भरावयाची रक्कम खालीलप्रमाणे आकारण्यात येईल.

१) जेव्हा संबंधित विभागाने काही दस्तऐवज, नकाशे इत्यादींची किंमत आधीच निश्चित केलेली असेल - अशा माहितीसाठी निश्चित केलेली किंमत अधिक टपाल खर्च. २) जेव्हा माहिती छायाप्रतीच्या (photo copy) स्वरूपात किंवा अन्य स्वरूपात (प्रतीत) चटकन मिळण्याजोगी असेल - तयार केलेल्या किंवा नक्कल केलेल्या प्रत्येक पृष्ठांसाठी (ए-४ किंवा ए-३) आकाराच्या कागदासाठी एका प्रतीचा प्रत्यक्ष खर्च दोन रुपये अधिक टपाल खर्च किंवा मोठ्या आकाराच्या कागदांमधील एका प्रतीचा प्रत्यक्ष खर्च किंवा खर्चाची किंमत अधिक टपालखर्च.

३) अभिलेखांचे निरीक्षण करण्यासाठी - पहिल्या एका तासात करिता कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. आणि त्यानंतरच्या प्रत्येक पंधरा मिनिटांसाठी पाच रुपये इतके शुल्क आकारले जाईल.

४) डीस्केट किंवा फ्लॉपीसाठी पुरवलेल्या माहितीसाठी प्रत्येक डीस्केटसाठी किंवा फ्लॉपीसाठी पन्नास रुपये अधिक टपाल खर्च.

५) छापील नमुन्यात पुरवलेल्या माहिती, अशा प्रकाशनासाठी निश्चित केलेली किंमत किंवा अशा प्रकाशनातून घेतलेल्या उताऱ्याच्या (extracts) छायाप्रतींच्या प्रत्येक पृष्ठास दोन रुपये अधिक टपाल खर्च

६) अर्जदाराने स्वतः जाऊन माहिती घेतली असेल तर, कोणताही टपाल खर्च आकारला येणार नाही.

## ७.३ माहिती अधिकार जोडपत्र - "अ" जोडपत्र - "ब" जोडपत्र ' क'

**जोडपत्र - "अ"**

**( नियम 3 )**

येथे दहा रुपयांचा न्यायालय फी मुद्रांक लावावा.

माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अन्वये माहिती मिळण्याबाबतच्या अर्जचा नमुना

प्रति,

राज्य शासकीय माहिती अधिकारी,

(कार्यालयाचे नाव पत्ता)

...........

...........

(१) अर्जदाराचे पूर्ण नाव : ................

(२) अर्जदाराचा पूर्ण पत्ता : ................

(३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील : ..........

(एक) माहितीचा विषय : ................

(दोन) माहिती ज्याच्याशी संबंधित असेल तो कालावधी : ............

(तीन) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन : .............

(चार) माहिती टपालाने मिळणे आवश्यक आहे किंवा स्वतः घेऊन जाणार आहात किंवा कसे : ...........

( साध्या, नोंदणीकृत किंवा शीघ्र डाकने )

(४) अर्जदार, दारिद्र्य रेषेखालील आहे किंवा असे ; ................ होय / नाही.

( असल्यास त्याच्या पुराव्यादाखल छायाप्रत जोडावी ). ठिकाण :

दिनांक: अर्जदाराची सही



munotes.in

**2) अपील - पहिले:**

ज्या व्यक्तीस, कलम 7 च्या पोटकलम (1) मध्ये किंवा पोटकलम (3) च्या खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत निर्णय प्राप्त होत नसेल अशी व्यक्ती. किंवा जी व्यक्ती राज्य शासकीय माहिती अधिकाऱ्याच्या आदेशाने व्यथित झाली असेल अशी व्यक्ती, राज्य शासकीय माहिती अधिकाऱ्याचा आदेश प्राप्त झाल्याच्या तारखेपासून तीस दिवसाच्या कालावधीत ज्या आदेशाविरुद्ध अपील दाखल असेल अशा आदेशाच्या आदेशाच्या प्रतिसह "जोडपत्र - ब" मध्ये दिलेल्या नमुन्यात, साध्या कागदावर, संबंधित अपील प्राधिकाऱ्याकडे अपील करू शकेल व त्यासोबत, यथोचित पावती घेऊन, रोख स्वरूपात किंवा सार्वजनिक प्राधिकरणास प्रदेय असलेल्या दर्शनी धनेकर्षाच्या (demand draft) स्वरूपात किंवा बँकर्स धनादेशाच्या ( Cheque) स्वरूपात वीस रुपये इतके अपील शुल्क प्रदान करील किंवा त्यावर वीस रुपयांचा न्यायालय फी मुद्रांक ( Court fee Stamp) लावावा.

**जोडपत्र - "ब"**

**( नियम 5 (1) पाहा**

येथे वीस रुपयांचा न्यायालय फी मुद्रांक लावावा.

माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 याच्या कलम १९ (१) अन्वये अपील.

प्रेषक,

……………..

……………..

(अर्जदाराचे नाव व पत्ता)

प्रति,

……………..

……………..

……………..

(अपील प्राधीकाऱ्याचे नाव / पदनाम/ पत्ता)

(1) अपिलकाराचे पूर्ण नाव :

(2) अपिलकाराचा पूर्ण पत्ता :

(3) राज्य शासकीय माहिती अधिकाऱ्याचा तपशील :

(4) ज्या आदेशाविरुद्ध अपील केले असेल तो आदेश प्राप्त झाल्याची तारीख (आदेश दिलेला असेल तर) :

(5) अपील दाखल करावयाची शेवटची तारीख :

(6) अपिलाची कारणे :

(7) माहितीचा तपशील :

(एक) आवश्यक असलेल्या माहितीचे स्वरूप व विषय :

(दोन) माहिती ज्याच्याशी संबंधित आहे त्या कार्यालयाचे किंवा विभागाचे नाव :

ठिकाण : अपिलकराची सही

दिनांक :

**3) अपील - दुसरे :**

जी व्यक्ती कलम 19 च्या पोटकलम (1) अन्वये अपील अधिकाऱ्यांच्या आदेशाने कथित व्यथित झाली असेल अशी व्यक्ती प्रथम अपील अधिकाऱ्याचा आदेश प्राप्त झाल्याच्या तारखेपासून 90 दिवसांच्या कालावधीत, ज्या आदेशाविरुद्ध दुसरे अपील केले असेल अशा आदेशाच्या प्रतीसह, जोडपत्र (@क) मध्ये दिलेल्या नमुन्यात साध्या कागदावर राज्य माहिती आयुक्ताकडे दुसरे अपील करू शकेल व त्यासोबत यथोचित पावती घेऊन रोख स्वरूपात किंवा सार्वजनिक प्राधिकरणास प्रदेय असलेल्या दर्शनी धनाकर्षच्या (demand draft) स्वरूपात किंवा बँकर्स धनादेशाच्या (cheque) स्वरूपात वीस रुपये इतके शुल्क प्रदान करील किंवा त्यावर 20 रुपयांचा न्यायालय फी मुद्रांक ( court fee stamp ) लावील.

**जोडपत्र 'क'**

नियम 5 (2) पहा

येथे वीस रुपयांचा न्यायालय फी मुद्रांक लावावा.

माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 याच्या कलम १९ (३) अन्वये अपील.

प्रेषक,

……………..

……………..

(अपिलकाराचे नाव व पत्ता)

munotes.in

प्रति,

……………..

……………..

……………..

( राज्याच्या माहिती आयोगाच्या आयुक्तांचे प्नाव / पदनाम/ पत्ता)

(1) अपिलकाराचे पूर्ण नाव :

(2) अपिलकाराचा पूर्ण पत्ता :

(3) राज्य शासकीय माहिती अधिकाऱ्याचा तपशील :

(4) ज्या आदेशाविरुद्ध अपील केले असेल तो आदेश प्राप्त झाल्याची तारीख (आदेश दिलेला असेल तर) :

(5) अपील दाखल करावयाची शेवटची तारीख :

(6) अपिलाची कारणे :

(7) माहितीचा तपशील :

(एक) आवश्यक असलेल्या माहितीचे स्वरूप व विषय :

(दोन) माहिती ज्याच्याशी संबंधित आहे त्या कार्यालयाचे किंवा विभागाचे नाव :

ठिकाण : अपिलकराची सही

दिनांक :

**पहिले अपील करण्याची कार्यपद्धत :-**

संबंधित कार्यालयाने अर्जदाराला अर्ज जाणून-बुजून किंवा गैरसमजामुळे स्विकारण्यास नकार दिला किंवा माहिती वेळेवर मिळाली नाही, किंवा मिळालेली माहिती चुकीची असेल किंवा माहिती मिळण्यासाठी आकारलेली रक्कम अवाजवी वाटत असेल अवाजवी वाटत असेल अशा वेळी अर्जदाराने 45 दिवसात "अपिलीय प्राधिकारी" (अपिलेट अथोरिटी) याकडे लेखी अपील करावयाचे आहे. यालाच पहिले अपील म्हणतात.

पहिल्या अपीलीय अधिकाऱ्याकडे कोऱ्या कागदावर अर्ज करावा (हस्तलिखित किंवा टायपिंग) अपील करताना खालील गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

munotes.in

(1) ज्या अपिलीय प्राधिकाऱ्याकडे अपील करत आहात, त्या अपिलीय प्राधिकारी याचे नाव / पदनाम / पूर्ण पत्ता (शक्यतो पिन कोड सह) : ही माहिती तुम्हाला माहिती अधिकार मिळू शकते.

(2) अपील करणाऱ्या अर्जदाराचे संपूर्ण नाव संपूर्ण पत्ता (शक्यतो पिन कोड सहित)

(3) माहिती अधिकाऱ्याचा तपशील : नाव / पदनाम.

(4) ज्या निर्णयाबद्दल अपील करत आहात, तो निर्णय मिळाल्याची तारीख :

(5) अपील दाखल करण्याची अंतिम तारीख :.

(6) जी माहिती मागितली होती किंवा जी माहिती मागता आहात तिचा तपशील :

अ) माहिती चा विषय व स्वरूप : उदाहरणार्थ अवर्षणग्रस्तांना मिळणाऱ्या अनुदानाबाबत चौकशी करायची असेल, तर येथे विषय म्हणून अवर्षणग्रस्तांना मिळणाऱ्या अनुदानाची चौकशी असे लिहावे.

ब) माहिती ज्या सार्वजनिक प्राधिकरणाशी किंवा विभागाशी संबंधित आहे, त्या कार्यालयाचे वा विभागाचे नाव :

क) अपिलाचे कारण : येथे तुमच्या अपिलाचे नेमके कारण लिहा. उदाहरणार्थ - अर्ज स्वीकारला नाही किंवा माहिती द्यायला नकार मिळाला, माहिती मिळायला उशीर झाला किंवा माहिती मिळाली नाही किंवा अव्वाच्यासव्वा रक्कम मागितली गेली. जे काही कारण असेल ते.

(7) अपील केल्याची तारीख :

(8) अपील केल्याचे ठिकाण :

(9) अर्जदाराची सही अथवा अंगठा :

(10) प्रति, असे लिहून अर्जाच्या खाली, पाठीमागे किंवा एका नव्या कोऱ्या कागदावर खालील मजकूराचा समावेश असलेले प्रतिज्ञापत्र लिहा.

**प्रतिज्ञा पत्र**

मी …….. (अपील करणाऱ्याचे पूर्ण नाव) ……. चा मुलगा / ची मुलगी / ची पत्नी याद्वारे घोषित करतो की, अपिलामध्ये दिलेला मजकूर माझ्या माहितीप्रमाणे व विश्वासानुसार सत्य व अचूक आहे. मी वरील मजकुराखाली :

(1) अपील केल्याची तारीख :

(2) अपील केल्याचे ठिकाण :

(3) अर्जदाराची माहिती अथवा अंगठा :

(4) प्रति असे लिहून त्याखाली ज्या अपीलीय अधिकाऱ्याकडे अपील करत आहात, त्या अपिलीय प्राधिकारी याचे नाव / पदनाम / संपूर्ण पत्ता (शक्यतो पिनकोड सह) लिहावा.

अर्जदारास अपिलीय प्राधिकाऱ्याचा निर्णय मान्य नसेल किंवा त्या निर्णयाने त्याचे समाधान होत नसेल, तर अर्जदार आवश्यकतेनुसार राज्य माहिती आयुक्त कडे किंवा केंद्रीय माहिती आयुक्ताकडे 90 दिवसांच्या कालावधीत दुसरे अपील करू शकतो. माहिती आयुक्तांना यासंबंधीचा निर्णय खालील प्रमाणे घेता येतो :

(1) माहिती अधिकाऱ्याची बाजू योग्य असल्यास त्याची बाजू उचलून घेणे.

(2) त्याला माहिती देण्याचा आदेश देणे.

(3) आवश्यक वाटल्यास योग्य तो दंड ठोठावणे.

येथे एक गोष्ट महत्त्वाची सांगावीशी वाटते की अर्जदाराला अपिलीय प्राधिकरणाच्या निर्णयाविरुद्ध माहिती आयुक्ताकडे दुसरे अपील करायचे असेल, तर त्या अपीलासाठी लागणारी सर्व कागदपत्रे अपिलीय प्राधिकाऱ्याने ताबडतोब माहिती आयुक्ताला पुरवायला हवी.

**दुसरे अपील करण्याची कार्यपद्धत :**

दुसऱ्या अपीलीय अधिकाऱ्याकडे म्हणजेच राज्य माहिती आयुक्ताकडे कोऱ्या लेझर पेपर वर अर्ज करावा (हस्तलिखित किंवा टायपिंग). दुसरे अपील करताना खालील गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

पहिल्या अपिला प्रमाणेच याही अपिलासाठी आवश्यक फॉर्म छापलेला नाही. त्यामुळे साध्या कागदावरच तक्रार अर्ज लिहावा. हा लिहिताना त्यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश असणे मात्र आवश्यक आहे.

(1) प्रति ,

माहिती आयुक्त,

महाराष्ट्र राज्य.

(2) अपील करणाऱ्या अर्जदाराचे संपूर्ण नाव व संपूर्ण पत्ता ( शक्यतो पिन कोड सह) :

(3) माहिती अधिकाऱ्याचा तपशील : नाव / पदनाम.

(4) ज्या निर्णयाबद्दल अपील करत आहात, तो निर्णय मिळाल्याची तारीख.

(5) अपील दाखल करण्याची अंतिम तारीख :

(6) जी माहिती मागितली होती, किंवा जी माहिती मागता आहात तिचा तपशील.

munotes.in

(अ) माहितीचा विषय व स्वरूप : उदाहरणार्थ, अवर्षणग्रस्तांना मिळणाऱ्या अनुदानाबाबत चौकशी करायची असेल तर येथे विषय म्हणून 'अवर्षणग्रस्तांना मिळणाऱ्या अनुदानाची ' चौकशी असे लिहावे.

(ब) माहिती ज्या सार्वजनिक प्राधिकरणाशी किंवा विभागाशी संबंधित आहे, त्या कार्यालयाचे वा विभागाचे नाव :

(क) अपिलाचे कारण : येथे तुमच्या अपिलाचे नेमके कारण लिहा. उदाहरणार्थ, अर्ज स्वीकारला नाही किंवा अव्वाच्यासव्वा रक्कम मागितली गेली. जे काही कारण असेल ते लिहावे.

(7) अपील केल्याची तारीख :

(8) अपील केल्याचे ठिकाण :

(9) अर्जदाराची सही किंवा अंगठा :

(10) प्रति,असे लिहून त्याखाली माहिती आयुक्त, महाराष्ट्र यांचा संपूर्ण पत्ता लिहावा.

दुसऱ्या अपिलाच्या अर्जाखाली अगदी पहिल्या अपिलासारखाच पाठीमागे किंवा एका स्वतंत्र पांढऱ्या शुभ्र पेपरवर खालील मजकूर असलेले प्रतिज्ञापत्र लिहावे.

**प्रतिज्ञापत्र**

मी …….. (अपील करणाऱ्याचे पूर्ण नाव) ……. चा मुलगा / ची मुलगी / ची पत्नी याद्वारे घोषित करतो की, अपिलामध्ये दिलेला मजकूर माझ्या माहितीप्रमाणे व विश्वासानुसार सत्य व अचूक आहे. मी वरील मजकुराखाली :

(1) अपील केल्याची तारीख :

(2) अपील केल्याचे ठिकाण :

(3) अर्जदाराची माहिती अथवा अंगठा :

(4) प्रति,असे लिहून त्याखाली माहिती आयुक्त, महाराष्ट्र यांचा संपूर्ण पत्ता लिहावा.

या कायद्यात माहिती आयुक्तांचे स्थान आणि अधिकार हे निवडणूक आयुक्तांच्या दर्जाचे असतात. त्यांनी दिलेले आदेश शासनावर बंधनकारक असतात.

* अकारण माहिती देण्याचे नाकारल्यास,

* जाणूनबुजून अर्धवट अथवा दिशाभूल करणारी माहिती दिल्यास,

* माहिती नष्ट केल्यास,

* माहिती मिळण्यास कोणत्याही प्रकारे अडथळा आणल्यास,

माहिती आयुक्त हे माहिती अधिकाऱ्याला रु. 250/- प्रतिदिन याप्रमाणे जास्तीत जास्त रु.25000/- पर्यंत दंड ठोठावून शकतात. तसेच अशा प्रकारे एखाद्या माहिती अधिकाऱ्याकडून वारंवार माहिती देण्यास कसुरू होत असल्यास, त्याच्या विरुद्ध खातेनिहाय कार्यवाहीची शिफारसही करू शकतात. इतकेच नव्हे, तर अर्जदाराचे अपरिमित नुकसान झाले आहे, अशी माहिती आयुक्तांची खात्री झाली, तर संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडून तसे नुकसान ताबडतोब भरून देण्याचेही ते आदेश देऊ शकतात.

## ७.४ ग्रामीण शासन व प्रशासन यंत्रणेवरील माहिती अधिकाराचे परिणाम / फायदे / महत्त्व:-

माहिती अधिकारामुळे माहिती सामान्य माणसाच्या दारात आली आहे. माहिती प्राप्त करण्याच्या दृष्टीने सर्व नागरिकांना लोकसभा, विधानसभा सदस्यांइतकेच अधिकार प्राप्त झाले आहेत. या अधिकारामुळे कार्यालयीन गोपनीयतेचे वातावरण दूर करत करता येईल. तसेच शासकीय यंत्रणेस ते करीत असलेल्या, कामाबद्दल उत्तरदायी ठरवता येईल. त्याचप्रमाणे गावातील लोकांना जागरुक करून, संघटित करून, भ्रष्टाचाराबाबत, बेकायदेशीर कामाबाबत चालू असलेल्या अपप्रवृत्तीं विरुद्ध लढा देता येईल. व गावाच्या सर्वांगीण विकासाला हातभार लावता येईल.

**फायदे / महत्त्व / परिणाम:-**

(1) या कायद्यामुळे ग्रामीण भागातील प्रत्येक नागरिकाला शासनाच्या प्रशासकीय विभागाच्या वेगवेगळ्या खात्यांच्या किंवा विभागाच्या फाईलची माहिती घेऊन ती पाहता येईल.

(2) ग्रामीण भागातील नागरिकांना शासकीय विभागात कशी कामे करतात, कोणत्या कार्यपद्धती अवलंबितात आणि जनतेस कशा प्रकारे सेवा देतात हे जाणून घेता येते.

(3) आपल्या गावात किंवा परिसरात चालू असलेल्या विकासकामांची माहिती आपल्याला मिळू शकते.

(4) आपल्या गावात चालु असलेल्या रस्त्यांच्या बांधकामाचा दर्जा आणि त्याची वैधता पडताळून पाहता येते.

(5) आपल्या गावात किंवा वाडीत निवडणुकीसाठी उभ्या असलेल्या उमेदवारांची संपत्ती व चारित्र्य जाणून घेता येते.

(6) शासकीय योजनेतील लाभार्थ्यांच्या निवडीबाबत ची माहिती आपणास यामुळे मिळते.

(7) तुम्हाला कोणत्याही कामाच्या निविदांचा तुलनात्मक तक्ता प्राप्त होऊ शकतो.

(8) तुम्हाला तुमच्या परिसरातील शासकीय दवाखाने किंवा हॉस्पिटलमधील औषधांच्या साठयाबाबतची माहिती मागवता येते.

(9) तुम्हाला तुमच्या गावातील किंवा परिसरातील स्वस्त धान्य दुकानातील अन्नधान्याचा साठायाचीही माहिती करून घेता येते.

(10) वयक्तिक पातळीवर तुम्हाला तुमच्या आवश्यकतेनुसार हवी ती माहिती प्राप्त करून घेता येते. आवश्यक ती प्रमाणपत्रे, दस्तऐवज, विविध कार्यालयातून प्राप्त करण्यापासून, कार्यालयामध्ये प्रलंबित असलेल्या तुमच्या अर्जाची किंवा प्रकरणाच्या सद्यस्थिती पर्यंतच्या अनेक गोष्टींचा यात समावेश होतो. त्यामुळे कार्यालयात घालावे लागणारे हेलपाटे, संदिग्ध अथवा दुरुत्तरे या जाचातून मुक्तता होते. तसेच आपल्या हक्काची माहिती मिळवण्यासाठी साहेबांची हाजीहाजी करणे, त्यांची विनवणी करण्याची गरज राहत नाही.

(11) या अधिकारामुळे तुम्हाला जागरूक व प्रगल्भ नागरी करण्याचे सामर्थ्य प्राप्त होते.

(12) दारिद्र्य रेषेखालील एखाद्या व्यक्तीने आधी मिळवलेली माहिती पुन्हा मागितली तरी त्यासाठी पैसे आकारता येत नाही. कोणतीही माहिती तो मोफत मागू शकतो.

(13) आपल्या गाव परिसरातील शासकीय विकासाची बांधकामे चाललेली असतील त्या कामांची आवश्यकतेनुसार माहिती देऊ शकता.

(14) आपल्या गाव - तालुका - जिल्हा स्तरावर होणाऱ्या शासकिय अन्नधान्य पुरवठा, रॉकेल पुरवठा, गॅसपुरवठा यासारख्या जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा याबाबत माहिती मिळवू शकतो.

(15) केवळ शासकीय कार्यालये नाही, तर नीमसरकारी कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय अनुदानाचा लाभ घेणाऱ्या कंपन्या, शासकीय अनुदान घेणाऱ्या शिक्षण संस्था, धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी झालेल्या संस्था व ट्रस्ट, सहकारी बँका अशा कार्यालयांची माहिती मिळवू शकतो.

(16) सार्वजनिक कोणतेही बांधकाम ज्या कामासाठी सरकारी तिजोरीतील पैसा खर्च होतो, अशा कामांची पाहणी प्रत्यक्ष जागेवर जाऊन करता येईल. त्या कामासाठी वापरलेला माल व कामाचा दर्जा याचीही माहिती घेता येईल. इतकेच नव्हे तर एखाद्या कार्यालयाने किंवा संस्थेने खरेदी केलेल्या मालाची तपासणी सुद्धा नागरिकांना करता येईल.

(17) कोणत्याही नागरिकाला शासनाचे अभिलेख, दस्ताऐवज, लॉगबुक, मस्टररोल, परिपत्रके, आदेश, अहवाल यांच्या नकला - प्रती घेता येतील. कोणत्याही कार्यालयातील इलेक्ट्रॉनिक उपकरणावर साठवलेली, ई - मेलवरील माहिती घेता येईल.

(18) शैक्षणिक संस्था, सहकारी संस्था, सार्वजनिक बँका, स्वयंसेवी संस्था यांनी त्यांच्याकडील सर्व अभिलेखांची विषयवार विभागणी करुन, ती सूचीबद्ध पद्धतीने करून ठेवायची आहे. त्याचबरोबर जनतेला जनतेला परस्पर माहिती घेण्यासाठी वेबसाईटवर सर्व माहिती उपलब्ध करून द्यायची आहे.

munotes.in

(20) जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची पटसंख्या व शिक्षकांची संख्या, त्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या या विषयीची माहिती तुम्ही घेऊ शकता.

(21) गावातील गरीब लोकांसाठी असलेल्या घरकुल योजना, अन्न सुरक्षा योजना, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, इत्यादी योजनांबाबत वंचित राहणाऱ्या गरीब लोकांना न्याय मिळवून देणे व त्यातील भ्रष्टाचार उघडकीस आणून त्याला आळा घालणे यामुळे शक्य होणार आहे.

## ७.५ सारांश

माहितीच्या अधिकाराचा कायदा म्हणजे जनतेच्या हातात मिळाले शस्त्र आहे. या शास्त्राचा वापर गावातील नागरिकांनी आपल्या मूलभूत हक्कासाठी, सुदृढ आणि निकोप लोकशाहीसाठी, गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि पर्यायाने देशाच्या विकासासाठी केला पाहिजे.

## ७.६ स्वाध्याय

1) माहिती अधिकाराचे फायदे सांगा.

2) माहिती अधिकाराची कार्यपद्धती स्पष्ट करा.

## ७.७ संदर्भग्रंथ


***1) माहितीचा अधिकार अधिनियम, 2005, महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ - मुद्रक - प्रतीक ऑफसेट, मुंबई.***

***2) माहितीचा अधिकार - य. दि. फडके - अक्षर प्रकाशन - माहीम, मुंबई.***

***3) पायाभूत अभ्यासक्रम - 2 - प्रा. एम. एस. लिमण, सेठ पबलिकेशन, मुंबई.***

***4) माहितीचा अधिकार अधिनियम, 2005. - उन्मेष गुजराथी, प्रगती बुक्स प्रा. लिमि., मिलिंद आर्ट प्रिंटर्स मुंबई.***


❖❖❖❖